

उत्तरायण

भाग : ३

डॉ. सुहास पेठे

।।श्री।।

उत्तरायण

भाग : ३

(जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ. पेठे यांनी दिलेली उत्तरं)

डॉ. सुहास पेठे

एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

उत्तरायण : भाग : ३

पुस्तकरूपाने प्रकाशित शेवटची आवृत्ती : मार्च, २०१६
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)



जीवन प्रत्यक्ष जगताना जिज्ञासेची ज्योत
वर्षानुवर्षं जागृत ठेवून
प्रश्नरूपानं, उत्तरांच्या माध्यमातून
त्या विचारांचा लाभ इतरांना देणाऱ्या
सर्व जिज्ञासू साधकांना -

आणि

प्रश्नांच्या उत्तरांची बुद्धी देणाऱ्या
श्री परमेश्वराला व श्री संतांना -

कृतज्ञतापूर्वक अर्पण...

...सुहास पेठे

उत्तरायण

भाग : ३

माणसाच्या शिकण्याच्या प्रक्रियेत जिज्ञासा, शंका, प्रश्न, निरसन यांना मोलाचं स्थान आहे. याची सुरुवात अगदी लहानपणापासून होते. ती प्रक्रिया मनानं जिज्ञासू व्यक्तींच्या बाबतीत उत्तरायुष्यातही सुरू राहाते.

तिच्या स्वरूपात काही वेळा चिकित्सेला एक विशिष्ट अपरिहार्य स्थान असलं तरी ते तिचं उद्दिष्ट नसतं, असू नये. कारण नुसत्या चिकित्सेनं पदरात काही न पडता अखेर 'संशयात्मा विनश्यति' एवढं झालेली कित्येक माणसं आपल्याला दिसतील. मूळ उद्दिष्ट जर ज्ञानप्राप्तीचं असेल, प्रपंचाचं स्वरूप, व्यवहार, शेवट समजून घेऊन, तो नेटकेपणानं करून परमार्थाकडं जाण्याचं असेल तर अशा शंका-प्रश्नांची खूप मदत होते. डोक्यात अडकलेले विचार मोकळे होऊन जीवन व विचारप्रवास सुखरूप होत राहातो.

तेच परमार्थातल्या शंकाप्रश्नांचंही आहे. तिथंही असलेल्या शंकांचं ध्येय हे उत्तर मिळाल्यावर त्यावर विचार करून प्रत्यक्ष कृतीचा-साधनेचा मार्ग चालण्याचं असतं. म्हणजे एकेक पाऊल देवाकडं जात राहाता येतं. अशांती, क्षोभ, संदेह कमी कमी होऊन समाधान-शांती वाढत जाते.

म्हणून इथं शंका-प्रश्नांना शिबिरांत, महिन्याच्या उपासनेत सवडीप्रमाणं एक दिवस, पत्रव्यवहाराच्या रूपानं व अन्य व्यक्तिगत भेटींत एका मर्यादेत आवश्यक ते स्थान देण्यात आलेलं आहे. या शंकांची उत्तरं काही कुठला अभ्यास करून दिलेली नाहीत. उत्स्फूर्त आहेत, आयत्या वेळची आहेत. ती उत्तरं संपादित स्वरूपात अशा भागांतून देण्यात येत आहेत. प्रश्न वेळोवेळी येत जातील तसे महत्त्वानुसार संकलित केलेले असल्यामुळं विषयवार देण्यांतली अडचण लक्षात घेऊन त्या त्या पुस्तकात प्रश्नांबरोबर विषयसूचीही देण्याचा प्रयत्न केला आहे.

ही उत्तरं म्हणजे मी अंतिम शब्द किंवा निकाल समजत नाही. अनेकदा उत्तरांना वेळेच्या व सामूहिकतेच्या मर्यादा असतात. त्यामुळं अनेक

मुद्यांचा समावेश उत्तरांत होऊ शकला नाही, हे वाचकांनी कृपा करून समजून घ्यावं अशी प्रार्थना आहे. माझी भूमिकाही कुणा मार्गदर्शकाची नाही. शोधकाची आहे. शोधताना, जाताना सापडलं ते समोर ठेवलं आहे. म्हणून याला शंकानिरसन म्हटलं असलं तरी काहींचं पूर्ण निरसन कदाचित होणार नाही, पण उत्तराच्या दिशेनं विचारसूर्याचा प्रवास - उत्तरायण - तरी सुरू व्हावं, एवढी नम्र भूमिका आहे.

प्रश्न मोकळेपणानं विचारता यावा म्हणून, इथं प्रश्नकर्त्याला प्रश्नाखाली स्वतःचं नाव द्यावं लागत नाही. संतनगरीतील उपासनेच्या संतछाया हॉलमध्ये असलेल्या प्रश्नपेटीत आपली शंका कागदावर लिहून टाकता येते. महिन्याच्या प्रश्नोत्तरसत्राच्या दिवशी, शिबिरात प्रश्नोत्तरसत्राच्या वेळी पेटी उघडून त्या प्रश्नांची उत्तरं उपासनेच्या वेळीच नेहमीच्या साप्ताहिक निरूपणाऐवजी दिली जातात. त्यामुळं प्रश्न विचारणाऱ्या बरोबरच, इतर तशाच शंका असणाऱ्यांचं व भविष्यात तशा शंका येऊ शकणाऱ्यांचंही समाधान होतं.

अगदीच व्यक्तिगत प्रश्न असतील तर त्यांचा समावेश त्यात केलेला नसतो. नुसत्या बौद्धिक, तांत्रिक शंकांनाही सकारणच विशेष स्थान नसतं. प्रापंचिक व पारमार्थिक असं वेगळं विषयांचं बंधन मुद्दामच ठेवलेलं नाही. कारण दोन्हीही, विशेषतः प्रापंचिक प्रश्न पारमार्थिक प्रवास करणाऱ्याला भेडसावीत असतात. कारण तोच अधिक सावधपणे जगायचा प्रयत्न करतो, असा अनुभव आहे. म्हणून अनेक प्रश्नांच्या विषयांना बंधन दिसणार नाही. पण त्याचा उपयोग होतो, म्हणून ते तसेच ठेवले आहेत.

प्रश्नकर्ते प्रश्न लिहून टाकल्यानंतर उत्तराच्या सत्राच्या वेळी उपस्थित असतीलच असं नाही. पण त्यांचे प्रश्न सार्वत्रिक स्वरूपाचे असतील तर नंतरही सवडीप्रमाणं त्यांना त्यांची उत्तरं प्राप्त व्हावीत, तसंच त्या आणि इतर प्रश्नांच्या उत्तरांचा लाभही कायमस्वरूपी सर्वांना असावा यासाठी ही पुस्तकरूपानं संपादित स्वरूपात प्रसिद्ध होत आहेत. अनेक जिज्ञासूंना याचा उपयोग झाल्याचं कळून आनंद वाटला. कुणा जिज्ञासूंना, हे सारं असंच उपयोगी पडत राहिलं तर, ईश्वरानं केलेल्या कृपेबद्दल मला धन्यता वाटेल. प्रकाशनाशी निगडित सर्वांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे.

संतनगरी *- सुहास पेठे*

प्रश्नानुक्रम...

१. आपण परमार्थ झळ सोसण्याचा आहे असा उल्लेख करता. त्याचा अर्थ आणि महत्त्व काय ? ..१३

२. मी पेशानं डॉक्टर आहे. माझं वय आता बहात्तर वर्षं आहे. आधीपासूनच उपासना करायला पाहिजे होती हे मला आत्ता पटतंय. पण माझी वेळ गेलेली आहे, असं मला वाटतं. मी तुमची पुस्तकं वाचतो, त्याचा आनंद घेतो. पण साधन म्हणून त्या अर्थानं काही करत नाही. कारण आता या वयात उपासना करून त्याचा काय उपयोग होणार ? ..१७

३. युगे अठ्ठावीस विटेवरी उभा.. असं पांडुरंगाच्या आरतीत म्हटलं आहे. युगं तर कृत - त्रेता - द्वापार - कली अशी चार आहेत. मग या अठ्ठावीस युगांचा अर्थ कोणता ? ..२०

४. आजच्या उत्पन्नाचा विचार करता मुलांच्या भावी शिक्षणासाठी किती साठवलं तर ते पुरेल, हे कळत नाही किंवा हा विचारही मनातून सुटत नाही. काळजी वाटते. याबाबतीत काय व कसं ठरवावं ? ..२१

५. अनेकदा उपासनेच्या सात्त्विक हेतूनं एकत्र आलेली माणसं काही काळ दोन - पाच वर्षं कधी दहा - बारा वर्षं ते करतात. पण, असं आढळतं की दुसऱ्या तिसऱ्या वर्षातच त्या उपासनेला उपाधी ग्रासू लागते. त्यामुळं, असे अनेक उपक्रम सुरू होतात आणि दोन - तीन वर्षांत कधी पाच - दहा वर्षांत कमी होऊन बंद पडतात. असं का व्हावं ? ..२७

६. आपल्या 'चिंतनसूक्ति' मधील समीचीन या शब्दाचा अर्थ काय? ..३१

७. आमचं साधन, सातत्य, भाव, निष्ठा यादृष्टींनी कमकुवत आहे. अशा साधनांमुळं आम्हाला मुक्ती कशी मिळणार ? त्यासाठी आम्ही दुबळ्या माणसांनी काय करावं ? ..३२

८. श्री गोंदवलेकर महाराज एके ठिकाणी म्हणाले आहेत की, ज्यांनी माझी निंदा केली त्यांना मी कळलो नाही, आणि ज्यांनी माझी स्तुती केली त्यांना तर मी नक्कीच कळलो नाही, या वचनांचा अर्थ अवघड वाटतो. तो कसा घ्यावा ? ..३३

९. अनेकदा बाहेरगावी गेल्यावर उपासनेत खंड पडतो. याबाबतीत काय करावं ? ..३७

१०. एखाद्या प्रसंगी आपल्या अत्यंत आप्त व्यक्तीनं कसं वागावं, याबाबत आपण नकळत अपेक्षा करतो आणि ती व्यक्ती त्याप्रमाणं वागली नाही तर स्वतःला दुर्दैवी समजून मनाला उदासीनता येते. तर अशा परिस्थितीत मनाची समजूत कशी काढावी ? ..३९

११.'ज्याचा जसा अधिकार, तसं त्यानं नाम घ्यावं' असं श्री महाराजांचं वचन आहे. त्यासाठी त्यांनी, वैद्य रोग्याला निरनिराळ्या माध्यमांतून औषध घ्यायला सांगतात, असा दृष्टान्त दिला आहे. याचा कृपया खुलासा करावा. ..४२

१२. मी एक व्यावसायिक आहे. माझ्या व्यवसायामध्ये खूप स्पर्धा आहे,त्यामुळे व्यवसायात यश मिळालं,तर लोकांच्या असूयेचा सामना करावा लागतो. त्यापोटी, काहीवेळा वेगवेगळ्या मार्गांनी त्रास देण्याचा प्रयत्नसुद्धा समव्यावसायिकांकडून होतो. अशावेळी मी काय करावं ? ..४४

१३. अलीकडं मुलं - मुली तशी चारचौघांसारखी असताना, परिस्थिती बरी असतानासुद्धा उशीरा लग्न करण्याची प्रवृत्ती दिसते. तसंच, काहीवेळा अविवाहित राहण्याची प्रवृत्ती वाढताना दिसते.त्यामुळं,अनेक कुटुंबांमध्ये अस्वास्थ्य निर्माण झालेलं दिसतं. याला आजचा काळ, जीवनपद्धती, प्रारब्ध, परिस्थिती की आणखी काही कारणं आहेत ? ..४६

१४. आजकाल जीवन रोज अधिकाधिक गतिमान होत चाललेलं आहे.काही क्षेत्रांतली गती,तर कल्पनेच्या पलीकडची आहे. त्यामुळं येणाऱ्या यंत्रांनी - साधनांनी जीवन सुखाचं झालं आहे. तसंच, इकडं जीवनात कोरडेपणा, संवादांचा अभाव, वैफल्य, मानसिक आजारांचं वाढतं प्रमाण - अशी अनेक दु:खंही समोर येत आहेत. याबाबतीत काय करावं ? ..५२

१५. कोणतंही कर्म करताना फळाची अपेक्षा ठेवायची नाही आणि कर्म केल्यावर ते अर्पण करायचं. त्यामुळं आपण मुक्त होतो, हे कळतं. पण तसं ठरवलं तरी, कर्माच्या फळाचे विचार मनातून जात नसल्यामुळं, फळाविषयीच्या चिंता उद्‌भवतात. फळाच्या अपेक्षेतूनही सुटका होत नाही. तेव्हा या अपेक्षा आणि अर्पण करणं, यांत येणाऱ्या अडचणींच्या चिंतनातून कसं मोकळं व्हावं, हे कृपया स्पष्ट करावं. ..५९

१६. आम्ही अनेक कुटुंबांत, नातेवाईकांत, समाजात आणि वेगवेगळ्या काळातही पाहातो की, काही नात्यांत विशेषतः सासू-सुनांच्यामध्ये असलेले संघर्ष वर्षानुवर्षं अनेक ठिकाणी तसेच आहेत. उलट,अलीकडं त्यांना अधिक तीव्रता आलेली दिसते. कुटुंबं विभक्त झालेली दिसली तरी, या नात्यातले संघर्ष त्यामुळं कमी झालेले आढळत नाहीत. असं का होतं, याला काही मार्ग आहेत की, हे असंच राहणार ? ..६४

१७. आपल्याला माणसाचा जन्म देव मिळवण्यासाठी येतो. मग आपण मागच्या जन्मीच देव का नाही मिळवला ? ..६८

१८. अलीकडं दहावी - बारावी किंवा त्याबरोबर येणाऱ्या विविध प्रकारच्या सीईटीज् यांचं प्रस्थ खूप वाढलं आहे. त्या परीक्षांमुळं घरोघरी तणाव निर्माण होताना दिसतात.आम्हाला पालकांनाही ते सहन करावे लागतात.एवढे तणाव का निर्माण होतात आणि ते कसे दूर करावेत ? ..६९

१९. आमच्या सुनांची माहेरं गावातच आहेत. पहिल्यांदा त्यामुळं एकमेकांना सोपं होईल असं वाटलं, पण प्रत्यक्षात मात्र त्यामुळं उलट अनेक प्रकारचे त्रास वाढले आहेत, असा अनुभव येतो. असं का व्हावं ?

..७६

२०. मी एक वयोवृद्ध गृहस्थ आहे. आता माझ्या आयुष्याचे शेवटचे दिवस आले आहेत.आयुष्यभर मी सचोटीनं राहण्याचा प्रयत्न केला. आता आयुष्याच्या शेवटी मागं पाहिल्यावर लक्षात आलं की, माझी काही ज्ञात - अज्ञात अशी देणी राहिली आहेत.काही लक्षात आहेत.ती सुमारे दहा हजारांची आहेत. पण ती ज्यांची आहेत असं आठवतं, ती माणसं कुठं आहेत किंवा आहेत की नाहीत, हेही मला माहीत नाही. त्यामुळं ती देता येत नाहीत. शिवाय,अनवधानानं माझ्याकडून अजूनही काही राहिली असतील, तर आता मी ती फेडून कशी संपवावी ? जेणेकरून मला त्यासाठी पुन्हा जन्म घ्यावा लागू नये किंवा त्याची अपराधी भावना मला जाताना राहू नये.

..८०

२१. आजकाल पुढच्या करिअरच्या दृष्टीनं मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांत घालण्याची प्रवृत्ती आहे, वेळी तसा दबावही येतो. आपण अनेकदा मराठी माध्यमाच्या गरजेचा उल्लेख करता. तेही पटतं. अशावेळी काय करावं ?

..८२

२२. आपण अनेकवेळा शुद्धीकरणाचा, विशेषतः पैसा, इस्टेट इत्यादीबद्दलच्या संदर्भात उल्लेख केला आहे. त्याचा अधिक खुलासा करता येईल का ? ..८७

● परिशिष्ट

प्रश्नोत्तरांच्या जिज्ञासूंसाठी 'उत्तरायण' च्या पूर्वीच्या दोन भागांतील प्रश्न ..९४



*** मुखपृष्ठ संकल्पना ***

सागराचं अथांग हलतं पाणी विचारांचं सततचं मंथन दर्शवतं. पाण्यावरच्या लाटा, जगताना निर्माण होणारे विविध व निरंतर प्रश्न दर्शवतात. तर लाटांवर उत्तरांच्या रूपानं पडणारे सूर्याचे किरण, त्या प्रश्नांवरचा ईशकृपेचा प्रकाश दर्शवतात.



(अकरा)

उत्तरायण - भाग : ३

वि ष य सू ची

(संदर्भासाठी विषयापुढे प्रश्नक्रमांक दिला आहे.)

- अगतिकता : साधन दुबळं असणं/ ७
- अर्थ - खुलासे : युगे अठ्ठावीस../ ३, चिंतनासूक्ति दोहा/६, श्रींच्या वचनाचे खुलासे / ८,११
- आप्तांमुळं त्रास : उदासीनता, उपाय / १०
- उपासनेतले खंड : उपाय / ९
- कर्म : फळाची अपेक्षा - मुक्तीशी संबंध - मार्ग / १५
- काळजीचे विषय : पैसा - भविष्याची तरतूद / ४
- गतिमानता : उपयोग, उपद्रव - विचार, उपाय / १४
- ताणतणाव : दहावी - बारावी इत्यादी बद्दल - उपाय / १८ देणी राहिल्याची अपराधी भावना - उपाय /२०
- देव : प्राप्ती का होत नाही / १७
- परमार्थ : झळ सोसण्याचा / १, करण्याची वेळ निघून जाणं /२, उपक्रम बंद पडण्याची कारणं / ५
- माध्यमाचा प्रश्न : इंग्रजी माध्यम / २१
- विवाह : उशीरा विवाहाची प्रवृत्ती, त्यामुळं अस्वास्थ्य / १३
- शुद्धीकरण : गरजा, व्याप्ती, परिणाम, उपाय / २२
- स्पर्धा : व्यावसायिक व इतर - त्रास, उपाय / १२
- सासू-सुनांचे संघर्ष : कारणं व उपाय/ १६, सासर माहेर गावातच असणं / १९

१. आपण परमार्थ झळ सोसण्याचा आहे असा उल्लेख करता. त्याचा अर्थ आणि महत्त्व काय ?

➛ परमार्थ करताना झळ सोसायला हवी, हे सत्य विधान स्वीकारायला प्रथम जरा अवघड वाटेल. पण त्याचे विविध अर्थ आणि कारणं पाहिली, तर ते बरोबर का आहे ते पटेल. काही मुद्दे पाहू -

झळ सोसणं म्हणजे तोशीस सोसणं, त्रास सोसणं, कष्ट पडणं. आपण व्यवहारातसुद्धा कुठली गोष्ट मिळवायची झाली, तर त्यासाठी झळ सोसल्याशिवाय ती आपल्याला मिळत नाही, हे आपण पाहतो. वस्तूची किंमत म्हणजे आर्थिक झळच असते. वस्तूच्या किंमतीच्या प्रमाणात ती आपल्याला सोसावी लागते. नातं किंवा इतर संबंधांतही घेणं आहे तसं देणंही असतं. पण, काही घेतलं तर त्याची झळ आपण देण्यानं सोसतो. साधी विद्या मिळवायची झाली, तरी त्यासाठी फीची झळ सोसतोच. पण त्याचबरोबर जाणं-येणं, अभ्यासाचे कष्ट, परीक्षांचं तंत्र, त्यासाठी तयारी -अशी अनेक झळ आपण या आणि इतर प्रकारांनीही सोसतो. हे जर आपण हरघडी पाहात असतो, करीत असतो, मान्य असतं, तर मग परमार्थ तेवढा आयता, फुकट, तयार - बिनझळीचा हाती पडावा म्हणणं व्यवहारालासुद्धा धरून नाही. परमार्थ म्हणजे, देव मिळवणं किंवा आपणच अंतर्यामी देवरूप आहोत, हे आकलन होऊन तसा व्यवहार होणं. यासाठी सोसावी लागणारी झळ, तिचं स्वरूप वेगळं असेल. त्यात साधना असतील, मनाचे निग्रह असतील, ज्ञानाची प्राप्ती असेल, आज्ञापालन असेल-ज्याच्या त्याच्या आवश्यकतेनुसार पडणारी झळ वेगवेगळी असेल. पण झळ पडल्याशिवाय देव,समाधान, परमार्थ काय -मिळावा म्हणणं किती अयोग्य आहे, हे लक्षात येईल.

दुसरं असं की, व्यवहारातसुद्धा आपल्याला कुणी बिनकष्टाचं काही देतो, फुकट देतो, काही झळ न लागता देतो - असं म्हटलं तर ते कोणत्याही सामान्य स्वावलंबी, स्वाभिमानी माणसाला नको वाटतं, ओझं वाटतं. क्वचित एखाद्याला अशा मार्गानं एखादी गोष्ट फुकट मिळाली, तर त्याचा आनंद होणारा माणूस अपवादभूत आणि सहसा आळशीच, ऐतखाऊ म्हणला जातो. झळ सोसताना ती अमुकच प्रकारानं आपण सोसू असं नाही. पण, कुठल्या ना कुठल्या प्रकारानं ती सोसणं आपल्याला रास्त वाटतं, नाहीतर तसं काही घेणं ओझं वाटतं. वाटावंही. मग परमार्थ तेवढा, काही झळ न लागता, तो करणाऱ्या सध्याच्या प्रापंचिक, देहवादी मनाला धक्कासुद्धा न लागता व्हावा, अशी अपेक्षाही कुणी व्यवहारी, विवेकी मनुष्य करणार नाही.

रस्त्यावरून जाताना पडलेली पानं, फुलं, फळं जरी गोळा करून एखाद्यानं आणली, त्याचा वापर केला तरी, त्याही अर्थानं दोन गोष्टी घडतात. एक म्हणजे, ते सारं वापरताना, ते फुकट मिळालं आहे ही भावना मनात कुठंतरी असते आणि त्यापोटी त्यातलं काही दुसऱ्याला द्यावं असंही नकळत वाटतं. आणि दुसरं असं की, ते असं मिळालं असलं, तरी ते वेचण्याचे, सांभाळण्याचे, वाहून आणण्याचे कष्ट त्यांना पडलेले असतात. म्हणजे त्याअर्थानं, तशीही ती झळ पडतेच. प्रमाण कमी असेल एवढंच !

शिवाय हे लक्षात घ्यावं की, त्यातूनही एखादी गोष्ट आपल्याला विशेष झळ न पडता मिळाली, ती फुकट किंवा भेट म्हणून मिळाली, तर तिचं एवढं महत्त्व वाटत नाही. कारण, झळ म्हणजे एक प्रकारचं मूल्य. आपण एखाद्या गोष्टीचं मूल्य दिलेलं नसेल तर, एक प्रकारचा निष्काळजीपणा ती वस्तू जपण्यात, वापरण्यात येतो. त्याचबरोबर, जी

वस्तू खूप मूल्यवान असते, जिच्यासाठी खूप झळ सोसावी लागली असते, ती जपताना, वापरताना आपल्याकडून स्वाभाविक, अधिक आणि योग्य काळजी घेतली जाते. परमार्थ आणि त्यामुळं साधायचा परमात्मा, या माणसाच्या आयुष्यातल्या सर्वांत मौल्यवान गोष्टी आहेत. त्यामुळं, तो झळीचा असणं स्वाभाविक आहे.

मनुष्याचा प्रपंच कितीही लहान-मोठा आणि कितीही वर्षं चाललेला असला, तरी तो म्हणजे बहुतांशी काळज्या, चिंता, भय, अपरंपार कष्ट - यांची फक्त एक बदलत जाणारी साखळीच असते. कधीतरी एखादी वाऱ्याची झुळूक येऊन जावी आणि एरवी फुफाट्यात चालत असावं, तसं बाह्यतः प्रपंच ठीक चाललेले दिसले, तरी त्यांच्या अवस्था या साऱ्या टोचणी देणाऱ्या, अस्वस्थ करणाऱ्या साखळीच्या कड्यांमध्ये, एखादी सुखाची कडी लागून जावी, तशा असतात. मानवी आयुष्याचा खरा अर्थ जाणून, मनुष्य जेव्हा हाच प्रपंचाचा मार्ग, परमार्थाची दृष्टी लक्षात ठेवून, देवप्राप्तीचं ध्येय धरून चालतो - त्यावेळी हेच चालणं, हाच प्रपंच, दुतर्फा सावली धरलेल्या झाडाखालून आणि तेही हिरवळीवरून स्वानंदात चालल्यासारखा बनतो. ही विद्या मिळवून देणारा परमार्थ, ती विद्या देणारे कुणी गुरू-ग्रंथ आणि अशा मार्गानं येणाऱ्यांवर कृपाळूपणे छत्र धरणारा भगवंत - यांचं महत्त्व किती मोठं आहे, याची कल्पनाच करावी.

एवढी 'अमोलिक वस्तू' मिळण्यासाठी झळ लागणं तर स्वाभाविकच आहे. पण, मिळणाऱ्या वस्तूचं मोल पाहाता, कितीही झळ लागली तरी ती सोसावी, अशी ही वस्तू आहे, हे आपल्या लक्षात येईल आणि पटेल. 'आहे तसा राहीन - आहे त्याजागी राहीन आणि गावालाही जाईन' हे म्हणणं जसं न्याय्य नाही, तसं झळ न लागता देव

मिळावा हेही न्याय्य नाही. मग ती झळ सोसायची आपली तयारी बरोबर आहे, हे आपल्याला पटेल. ती झळ साधनांची असेल, निंदा-स्तुती सोसण्याची असेल, लोभ-असूया-मत्सर सोडण्याची असेल, आर्थिक असेल किंवा शेवटी सर्वस्व दान करण्याची असेल, शरणागतीची असेल.

हे मात्र अवश्य लक्षात घ्यावं की, झळ सोसायला लावणं अशी काही परमेश्वराची इच्छा नाही. ती सोसण्याच्या आपल्या तयारीनं, खरा भगवंत मिळवण्याची पात्रता आपल्या अंगी येते. ती पात्रता यावी, अशी भगवंताच्या व्यवस्थेची इच्छा असते. मग, आपण आनंदानं झळ सोसत राहतो आणि भक्तावरच्या प्रेमामुळं ती झळ आपल्याला कमीत कमी लागावी, याची काळजी भगवंत घेत राहतो. झळ सोसण्यातला प्रपंचातला संबंध सक्तीचा आणि दुःखद असतो तर परमार्थातला तोच संबंध समजुतीचा आणि स्वेच्छेचा असतो. त्यामुळं तो सुखद असतो, तो असा !

२. **मी पेशानं डॉक्टर आहे. माझं वय आता बहात्तर वर्षं आहे. आधीपासूनच उपासना करायला पाहिजे होती, हे मला आत्ता पटतंय. पण माझी वेळ गेलेली आहे, असं मला वाटतं. मी तुमची पुस्तकं वाचतो, त्याचा आनंद घेतो. पण साधन म्हणून त्याअर्थानं काही करत नाही. कारण आता या वयात उपासना करून त्याचा काय उपयोग होणार ?**

➛ तुमच्याकडं ज्यावेळेला पेशंट येतो, तेव्हा त्याची परिस्थिती गंभीर असली तरी, तुम्ही त्याला तपासता. एक दिवस, दोन दिवस किंवा पंधरा दिवस प्रयत्न करता. त्याची वेळ गेलेली आहे, त्याच्यात काही राहिलेलं नाही, आता काही करायला नको - असं तुम्ही म्हणत नाही. अगदी व्हेंटिलेटरवर जरी असला, तरी तुम्ही प्रयत्न करता. यात सुधारणा होऊ शकते, असं वाटत असल्यामुळं, जोपर्यंत श्वासोच्छ्वास चालू आहे, तोपर्यंत तुम्ही प्रयत्न करत राहता. आजाराला जोपर्यंत औषध आहे, तोपर्यंत तुम्ही देत राहता. तुमच्या प्रयत्नांमुळं पेशंट आपल्या पायांनी चालत जाऊ शकतो, हेही तुम्ही पाहिलं असेल. ज्याची वेळ गेलेली आहे असं वाटतं, तोच पेशंट पुढं एक दिवस, दोन दिवस कदाचित पुढं दहा वर्षंसुद्धा जगू शकतो.

मग साधनेच्या बाबतीत असं का म्हणत नाही ? आपली वेळ गेलेली आहे, हे आपण ठरवू नये. काय केल्यानं बरं होईल, हे आपल्याला माहीत नाही. कदाचित, जसं तुम्ही पेशंटची वेळ गेली नाही, असं समजून औषधोपचार केले आणि त्यामुळं त्याला बरं वाटलं, असं होऊ शकतं,तसंच,तुम्ही थोडं नाम घेतलं आणि ते भगवंतापर्यंत पोचलं असंही

होऊ शकतं. कदाचित, तुम्ही या आधी नव्व्याण्णव वेळा नाम घेतलं असेल आणि तुमचं एकच राहिलं असेल ! पण समजा, स्वतःच्या अशा कल्पनेनं तुम्ही आपली वेळ गेली असं समजून, जर ते 'एक' नामसुद्धा घेतलं नाही, तर ती नव्व्याण्णव तशीच राहून गेल्यामुळं परत एकदा जन्म घ्यावा लागेल. त्यापेक्षा, आत्ता आपण नाम घेत राहू. पेशंटवर उपचार करताना, तो वाचेल की नाही हे तुम्हाला माहीत नसतानासुद्धा तुम्ही उपचार करता. त्याच दृष्टीनं इकडं पुढं काय होईल, याची चिंता न करता, प्रयत्न करीत राहावं.

परमार्थात काय केल्यानं काय होतं, हे आपल्याला कळत नाही. तसं कळत असतं किंवा होत असतं, तर तेरा कोटी नाम घेतलेले लोक देव झालेले दिसले असते. तसं तर ते दिसत नाही. म्हणजे, त्यावर ते अवलंबून नाही. या मार्गात राहण्यासाठी, सातत्य टिकवण्यासाठी साधन म्हणून संख्येचा किंवा अशा तऱ्हेच्या संकल्पांचा उपयोग आहे. त्यानं होत नाही असं नाही, पण त्यानंच होतं असंही नाही.

प्रयत्नांनी मनुष्य साधना, उपासना करू शकतो, पण उद्धरत नाही. उद्धार हा गुरूंच्या कक्षेतला विषय आहे. त्यांनी मुक्त करायचं ठरवलं, तर ते अडाण्यालासुद्धा मुक्त करतात. भाव पाहायचा, निष्ठा पाहायची की त्याचं आज्ञापालन पाहायचं - तो त्यांचा प्रश्न आहे. किंवा तुम्ही खूप साधन केलं, कमी साधन केलं - तर ते कसं गोड मानून घ्यायचं, हाही त्यांचा प्रश्न आहे. या अर्थानं, आपला उद्धार आपण करीत नाही, गुरू करतात. कृपा जशी गुरू करतात, तसंच उद्धारसुद्धा तेच करतात. कृपेला पात्र होण्याचे प्रयत्न मात्र आपण करीत असतो. तिथपर्यंत आपल्या हातात आहे.

जसं तुम्ही पेशंटच्या बाबतीत प्रयत्न करताना, तो वाचेलच याची

खात्री नसते. तरीसुद्धा तुम्ही प्रयत्न करता, नातेवाईकांना कल्पना देऊन ठेवता, यश आलं तर येईल, नाही आलं तर तुम्ही मनाची तयारी ठेवा, असं सांगता. तसंच समजा, तुम्ही या परिस्थितीत वयस्कर आहात, तरीसुद्धा तुम्ही थोडे प्रयत्न करून बघा, म्हणजेच थोडं नाम घेऊन बघा. कदाचित तुमचं साध्य तुम्हाला मिळेल. आणि त्यातूनसुद्धा नाही झालं, तर तुमच्या एखाद्या पेशंटचं जसं होतं तसं होईल फारतर ! तो जाईल अशी तयारी ठेवून, इतरांना तसं सांगूनसुद्धा, तुम्ही प्रयत्न सोडीत नाही ना ? तेवढंच इथं करावं.

एकवेळ पेशंटच्या बाबतीत घेतलेले प्रयत्न, शरीर टिकवायच्या दृष्टीनं वाया जातील, पण थोडंसं घेतलेलं नामसुद्धा वाया जात नसतं. ते तर मृत्यूनंतरही तुमच्याबरोबर येत असतं. या साध्या शारीरिक घटनेच्या बाबतीतसुद्धा तो जाईलच असं नसतं. कदाचित, तुमच्या उपचारांना यथाकाल प्रतिसादही मिळू शकतो. त्याच्या प्रकृतीत सुधारणा होत जाते. मृत्यू टळतो. तर आत्ता या वयात काही होणार नाही, आमची वेळ गेली असं म्हणता येणार नाही. असं पेशंटच्या बाबतीत म्हणता आणि उपचार करता, तेच इथंही म्हणावं लागेल !

अमुक केल्यानं उद्धार होतो, असा परमार्थात सिद्धांत नाही. तसं असतं तर ठराविक संख्या, नाम किंवा पारायणं केल्यावर मुक्त होता आलं असतं. व्यवहारात जसं दहा पायऱ्या चढल्यावर एक-दोन-तीन राहिल्या असं असतं, तसं इथं नसतं. इथं, तुम्हाला उचलून थेट तेराव्या पायरीवरसुद्धा ठेवता येऊ शकतं.

जरी लौकिकदृष्ट्या काळ कमी असला, त्यामुळं आपल्याकडून पुरेसे प्रयत्न होतील की नाही असं वाटत असलं, तरी परमार्थात, अशा तऱ्हेनं कोणाचीच वेळ कधी टळून गेलेली नसते. त्याला हा उलगडा

होऊन का होईना, नामाचे - साधनेचे प्रयत्न करायचे आहेत की नाही आणि त्याला मुक्तीची - भगवंताची ओढ आहे की नाही, हा खरा प्रश्न आहे. हे प्रयत्न आणि ओढ असेल तर मग आपल्याच कल्पनेचा अडथळा न आणता, नामाला लागणं उत्तम !



३. युगे अठ्ठावीस विटेवरी उभा.. असं पांडुरंगाच्या आरतीत म्हटलं आहे. युगं तर कृत-त्रेता-द्वापार-कली अशी चार आहेत. मग या अठ्ठावीस युगांचा अर्थ कोणता?

➢ आपली कालगणना ब्रह्मदेवाचा एक दिवस आणि एकूण आयुष्य शंभर वर्षं या भाषेत आहे. आपण उल्लेखलेली युगं कृत १७.२८ लाख वर्षं, त्रेता १२.९६ लाख, द्वापार ८.६४ लाख, कलि ४.३२ लाख म्हणजे ४३ लाख २० हजार वर्षांचं महायुग होतं.

या महायुगांचे एकूण १४ नियंत्रक मनू आहेत, असे मनू ७१ महायुगं सांभाळतात. त्या १४ मनूंतले सहा झाले, सातवा वैवस्वत मनू सध्या सुरू आहे. या मनूची जी ७१ महायुगं, त्यांतली सत्तावीस झाली आणि सध्या अठ्ठाविसावं सुरू आहे. म्हणून, युगे अर्थात 'महायुगे अठ्ठावीस', इतकं हे दैवत पुरातन कालापासून आपल्याला सांभाळीत आहे आणि तसा उल्लेख आरतीत केला आहे.



४. आजच्या उत्पन्नाचा विचार करता मुलांच्या भावी शिक्षणासाठी किती साठवलं तर ते पुरेल, हे कळत नाही किंवा हा विचारही मनातून सुटत नाही. काळजी वाटते. याबाबतीत काय व कसं ठरवावं ?

➛ याविषयी आपण इथं परमार्थाच्या बैठकीवर विचार करीत असलो, तरी या प्रश्नाला असलेली व्यावहारिक बाजूच मोठी आहे आणि आपल्याला त्यात पारमार्थिक व प्रापंचिक सर्वच लोकांना उपयोगी पडावा असा विचार करण्याचा प्रयत्न आहे, हे प्रथमच लक्षात घेऊ.

हा विषय शिक्षणाची क्षेत्रं, आपल्या शिक्षणानंतरच्या नोकरीतून पैशाच्या अपेक्षा, बाहेरच्या जगात देशात आणि विदेशांत होणाऱ्या तेजी - मंदीच्या परस्परांच्या व्यवसाय - उद्योग अशा क्षेत्रांवर परिणाम करणाऱ्या हालचाली, विशिष्ट नोकऱ्यांना - क्षेत्रांना असलेली कौटुंबिक - सामाजिक प्रतिष्ठा, नोकऱ्यांच्या इथं व परदेशात उपलब्ध असलेल्या संधी - अशा अनेक गोष्टींशी मूळ प्रश्न निगडीत आहे.

यात विचार करणाऱ्या लोकांचा म्हणजे, उदाहरणार्थ, प्रापंचिक, इतरांनी केलं म्हणून करणाऱ्या, त्याचबरोबर काही वेगळा - नवीन - भविष्याचा वेध घेऊन विचार करणाऱ्या - अशा लोकांचा जसा समावेश आहे, तसाच त्यात पारमार्थिकदृष्ट्या श्रद्धेनं, निष्ठेनं आणि प्रपंचाला किंवा अशा काळजींना योग्य तेवढंच मूल्य देणाऱ्या, खऱ्या भक्तिमान लोकांचाही समावेश आहे. यांत, या मनाच्या ठेवणीतल्या फरकांमुळं होणाऱ्या विचारांत, निर्णयांतही तसा फरक असणं, हेही गृहीत धरावं लागेल, हे स्पष्ट आहे.

प्रापंचिकाच्या दृष्टीनं ज्या क्षेत्रांत जाऊन पैशाच्या - मानाच्या,

परदेशवारीच्या संधी मिळतील, तशा पद्धतीच्या शिक्षणाच्या क्षेत्रात आपल्या मुलांना जायला मिळावं, एवढंच ध्येय असतं. त्यामुळं, पूर्वीच्या काळातलं मेडिकलचं, आत्ताच्या काळातलं इंजिनिअरिंगचं किंवा सी.ए. होण्याचं क्षेत्र मिळवण्यासाठी प्रवेश, क्लासेस आणि त्यासंबंधित सर्व खर्च एवढेच विचार डोळ्यांसमोर असतात. त्याचा साधारणपणे अनुभव, प्रत्येक क्षेत्र क्रमाक्रमानं अधिकअधिक पैसा लागणारं ठरत चाललेलं आहे. त्यातूनही कितीही पैसा साठवून, वेळी कर्जवेच करूनसुद्धा एकेक क्षेत्र, त्यात प्रवेश मिळवण्याच्या दृष्टीनं अवघड अर्थात, बाद होत चाललेलं आहे. शिवाय, ज्यांनी ते कसंही करून साधायचा प्रयत्न केला आहे, त्यांच्यामुळं त्या त्या क्षेत्रांतल्या स्पर्धा वाढल्या. संधी कमी होत गेल्या आणि इतक्या जिकिरीच्या प्रयत्नांनंतरही, एखादी त्यामानानं साधारण असलेली नोकरी पत्करणं, एवढाच पर्याय अनेकांना स्वीकारावा लागलेला दिसेल. केंद्राच्या किंवा राज्याच्या सरकारच्या पातळीवरच्या स्पर्धेच्या नोकऱ्या, हे तर स्वप्नवत् राहिलं आहे.

दुसऱ्या बाजूनं, अनेक कारणांनी संगणकीकरणाचा आपल्या देशाला खरंतर बऱ्याच कारणांसाठी न परवडणारा पर्याय, दबावाचा होऊन बसला आहे. त्याचा परिणाम अशा विविध आकर्षक क्षेत्रांतल्या संधींवर झाला आहे. त्यामुळं, त्याही संधी कमी होत आहेत. त्या निर्माण करण्याचे प्रयत्न शासकीय पातळीवर होत असतात, पण ते गरजेच्या मानानं फार तुटपुंजे पडतात, हे आपणा सर्वांना माहीत आहेच. याचा परिणाम, पुन्हा आपल्या या आर्थिक विचारांवर आणि त्यासंबंधीच्या काळजींवर आणखीच विपरीतपणे होत आहे. थोडक्यात, आपण त्यासाठी अशा विचारांनी तरतुदी करीत राहिलो तर, हे गणित कधी जमणार नाही, अशी अवस्था आहे, याचा अनुभव आपण घेतला असेल.

जे बुद्धिवादी लोक फक्त तर्क, परिस्थिती, विचार, निर्णय - या मार्गांनी जाऊ इच्छितात, त्यांना या प्रश्नांची उत्तरं शोधण्यात येणाऱ्या मर्यादा उघड आहेत. कारण, परिस्थिती बदलत असते, पैशाचं मूल्य बदलतं, पुढं तो मिळू शकण्याच्या शक्यतासुद्धा सारख्या बदलत असतात. मुलांच्या आपल्याला अपेक्षित असलेल्या कुवती, त्यांतल्या चुका, शिवाय ही शिक्षणाची वाटचाल करताना त्यांच्यावर येणाऱ्या बाह्य आकर्षणांचा प्रभाव, त्यामुळं त्यांच्या शैक्षणिक कामगिरीवर होणारे विपरीत परिणाम, शिवाय या साऱ्या परिस्थितीला अपेक्षित - चांगलं वळण देण्याच्या आपल्या प्रयत्नांवरच्या मर्यादा - हे सारं, आपल्या बुद्धीला विचार करायला लावायला पुरेसं आहे.

पण ते घडायचं, तर त्यासाठी आपल्या बुद्धीवरच्या मर्यादा लक्षात घेण्याचा प्रांजळपणा लागतो. बुद्धी प्रभावी असेल, तर ती बहुधा आपल्याला बेसावध ठेवते आणि या प्रश्नांवर आपण जरूर मार्ग काढू, मात करू असं सांगते. अर्थातच, आपण ते ऐकलं तर वर सांगितली ती बुद्धीची मर्यादा, ती ओळखण्यासाठी लागणारा प्रामाणिकपणा, प्रांजळपणा अशा बुद्धिमंतांच्या ठायी उरत नाही. त्याला काही पर्यायही नाही.

मग त्यांच्यासाठी या प्रश्नाचं उत्तर कोणतं आहे, तर आपल्याला आपल्या बुद्धीनं जमेल ते पैसे साठवण्याचे, प्रगतीचे प्रयत्न करीत राहावं आणि येईल ते यशापयश स्वीकारावं. शक्यतो निराश, दुःखी होऊ नये.

श्रद्धावानांसाठीसुद्धा हा प्रश्न सारखाच असला, तरी उत्तर मात्र वेगळं आहे. त्याचा विचार करू. त्यात हे प्रथमच स्पष्ट करणं आवश्यक आहे की, श्रद्धावान म्हणजे परमेश्वरानं - निसर्गानं आपल्याला दिलेल्या मन - मेंदूतल्या सर्व शक्तींचा - बुद्धीचा, कल्पनेचा, विचाराचा, विवेकाचा, तर्कशक्तीचा, अनुभवाचा - अशा सर्व गोष्टींचा पूर्ण उपयोग

केल्यानंतर, त्या शक्ती म्हणजेच सर्वस्व किंवा अंतिम सत्य न मानता, प्रारब्ध, ईश्वरी सत्ता, आत्मानुभवी गुरूंचं साहाय्य, आपल्या खऱ्या हितकर्त्यांचा सल्ला, प्रपंचातल्या या साऱ्या गोष्टींतली अपूर्णता - त्यामुळं सूक्ष्माच्या सत्तेवर पूर्ण व अंतिम श्रद्धा असणं, असा मनुष्य, असं गृहीत धरलेलं आहे. त्या अर्थानं, काही बुद्धिवाद्यांना वाटतो, तसा श्रद्धावान मनुष्य म्हणजे कुणी अडाणी, भोंगळ, बुवाबाजी मानणारा, तंत्रमंत्र करणारा, कमी बुद्धीचा - अशी व्यक्ती नव्हे.

श्रद्धेच्या व्यक्तीला, श्रद्धेच्या बैठकीमुळं अनेक गोष्टी आधीच उपलब्ध असतात. त्यामुळं, ती व्यक्ती निर्णयही लवकर घेऊ शकते, कर्तव्याची वाटचालही करू शकते आणि मिळालेल्या फळावर समाधानीही असते. श्रद्धेमुळं, प्रथम स्वतःच्या खऱ्या कुवतीची जाणीव असते. आपल्या करिअरविषयी उगीच इतरांकडं बघून अशी व्यक्ती स्वप्नाळू होत नाही. निवडताना आपल्या कुवतीचं क्षेत्र निवडते. त्यात वर म्हटल्याप्रमाणं गुरूंचं, ईश्वराचं साहाय्य घेते.

खऱ्या सश्रद्ध माणसाला साधेपणाचं महत्त्व कळलेलं असतं. त्यात स्वतःचं आणि समाजाचंही भलं होत असतं, याची जाणीव असते. त्यामुळं आपलं राहणीमान अकारण वाढवावं, चैन - चंगळ करावी, त्यासाठी अधिकअधिक पैसा जग मिळवतं - तसा आपणही मिळवावा, असल्या भ्रामक कल्पनांत, असा मनुष्य वावरत नाही. त्यामुळं, त्याला त्याच्या गरजा खरोखर किती कमी असतात, याचं आकलन होऊ शकतं. ते असल्यामुळं त्या जीवनाला साहजिकच अशा अतिरिक्त पैशाची आणि त्या देणाऱ्या साईडला जाण्याची मुळातच गरज वाटत नाही.

श्रीमंत, भांडवलशाही देशांनी आपल्या बाजारात शिरकाव करून चैनीच्या वस्तू ओतीत राहण्याचा जणू कार्यक्रम हाती घेतला आहे, हे

श्रद्धावान मनुष्य सूक्ष्म दृष्टीनं ओळखू शकतो. त्याचबरोबर, अशा वस्तू घेणं, हे जणू प्रतिष्ठेचं आहे, असा धंदेवाईक देशांनी आपल्या समाजात समज पसरवला आहे आणि त्याला असंख्य लोक बळी पडताहेत, हे त्याच्या लक्षात येऊ शकतं. असल्या खोट्या प्रतिष्ठेची खरी किंमत, तो ओळखून राहू शकतो. शिवाय, आपलं खरं कल्याण श्रद्धेनं आणि ईश्वराच्या कृपेनं होणार, याची त्याला अढळ खात्री असते. म्हणून, जग चुकीच्या दिशेनं चाललं तरी, त्याच्याबरोबर जाण्याची आपल्यावर सक्ती नाही, याची त्याला जाणीव असते. आणि श्रद्धेमुळं, ती अमलात आणण्याचं धाडसही असतं.

या श्रद्धेच्या भूमिकेमुळंच श्रद्धावंतांचं या प्रश्नाचं उत्तर वेगळं आणि सोपं असतं. तो मुळात, कुवतीप्रमाणं आणि गरजेपुरता पैसा मिळवू इच्छीत असल्यामुळं, बहुतांश पालकांना आणि त्यांच्या मुलांना अशा तऱ्हेचे ताण कमी असतात. ते कुठलं काम, नोकरी, व्यवसाय कमी समजत नाहीत. पैसा जास्त मिळण्यापेक्षा, तो शुद्ध मार्गाचा आहे ना, याचा विचार करण्याची गरज श्रद्धावंतांना जास्त वाटते. असा पैसा कुणाला लुबाडून, फसवून मिळवलेला नसावा, याचा विचार तो जास्त करतो. त्यामुळं शिक्षणक्षेत्राची निवड, हाही प्रश्न त्याला सोपा होतो.

राहता राहिला शिक्षणासाठी लागणाऱ्या पैशाचा अंदाज आणि तो न पुरण्याची काळजी. हे दोनही प्रश्न श्रद्धेच्या मार्गानं अत्यंत सोपे होऊन जातात. कारण, व्यवहाराचा अनुभव या दोनही बाबतीत आपल्याला कुठलीच खात्री देत नाही. शिवाय, किती केलं तरी काळजीची तलवार आपल्या डोक्यावर टांगती ठेवतो, हे श्रद्धावंतांनी ओळखलेलं असतं. उलट, शिक्षण कुवतीचं आणि त्यातून मिळणारा पैसाही गरजेपुरता अपेक्षित असतो. शिवाय, या दोन्हींतही देव आपला सांभाळ करतो

आहे, काही चुकलं, कमी पडलं तर तो ते भरून काढील आणि आपल्या कल्याणाचं आहे ते आपल्याला देईल, याची खात्री त्याला असते. त्यामुळं, जो भविष्यातल्या काळजीचा मोठा प्रश्न, तोही त्याच्या बाबतीत उद्‌भवत नाही. उलट, योग्य ती कर्तव्यं करून पालक काय किंवा श्रद्धावान मुलं काय, निश्चिंतपणे नामाला - उपासनेला वेळ देऊ शकतात. शिवाय, रूढ शिक्षणानं होणारी व्यक्तित्वाची जी एकांगी वाढ होते, ती टाळणारं इतर जीवनशिक्षण अशी मुलं घेऊ शकतात, ज्यामुळं त्यांच्यात सद्‌गुणांची वाढ होते. ती वाढ त्यांच्या आयुष्यात स्वास्थ्य निर्माण करते - शिकतानाही आणि पुढं नोकरी - उद्योग करतानाही. शिवाय, याच स्वास्थ्याचा लाभ श्रद्धेमुळं त्यांच्याबरोबरच त्यांच्या पालकांनाही होतो.

त्यामुळं कुवत, परिस्थिती, स्वास्थ्य - अशा श्रद्धेच्या बैठकीवर कुठलीही साईड निवडली, कितीही पैसा आपल्या शक्यतेनुसार आपल्याला साठवता आला, तरी तो त्यावेळेला लागणाऱ्या गरजेला पुरणार, याची खात्री, फक्त श्रद्धा आणि निष्ठाच देऊ शकतात. यासाठी, व्यावहारिक दृष्ट्या विशिष्ट रक्कम साठवणं, ती त्यावेळेला पुरणं, विशिष्ट शिक्षणक्षेत्र निवडणं, हे प्रश्न सहजपणे गौण होतात. हा अनुभव प्रत्यक्ष ती परिस्थिती आल्यावरही खरा ठरतो. याबाबतीत, व्यक्तिनिरपेक्ष, बिनखर्चाची, तर्कशुद्ध मदत साईड निवडणं, पैसा साठवण्याची संख्या ठरवणं - अशा बाबतीत सश्रद्ध माणसांना 'पाउलवाट'सारख्या पुस्तकातून मिळू शकते.

पहिल्या वर्गातल्या माणसांना विवेक, यशापयश, क्वचित निराशेशी सामना, जगराहाटीप्रमाणं जाणं - राहाणं, अनिश्चितता - काळजी यांची तयारी ठेवण्याची गरज आहे, तर श्रद्धेच्या मार्गानं जाणाऱ्यांना निष्ठा टिकवण्याची गरज आहे, पण निश्चिंतता आणि स्वास्थ्य खात्रीचं आहे. आता निवड आपली आहे !

५. अनेकदा उपासनेच्या सात्त्विक हेतूनं एकत्र आलेली माणसं काही काळ दोन - पाच वर्षं, कधी दहा - बारा वर्षं ते करतात. पण असं आढळतं की, दुसऱ्या तिसऱ्या वर्षातच त्या उपासनेला उपाधी ग्रासू लागते. त्यामुळं, असे अनेक उपक्रम सुरू होतात आणि दोन - तीन वर्षांत कधी पाच - दहा वर्षांत कमी होऊन बंद पडतात. असं का व्हावं ?

➢ मूळ झरा हा शुद्ध पाण्याचा असतो. त्याच्या उगमाशी ते पाणी अगदी तीर्थासारखं असतं. पण, हाच झरा जसा पुढं वाहत जाईल तसा उताराकडून जाताना, त्याला पालापाचोळ्यापासून केरकचरा किंवा त्याहीपेक्षा इतर अनेक प्रकार त्यात मिसळून जातात. तेव्हा, तेच तीर्थासारखं पाणी पिण्याच्या पाण्याएवढंसुद्धा शुद्ध राहात नाही.

अशा तऱ्हेनं अनेक गोष्टी मिसळत जात राहाणं, हे जसं निसर्गातलं काम आहे, तसंच मनातल्या शुद्ध हेतूत उपाधी मिसळत जाणं, हे मनाचं काम आहे. ते काम मन करतं. ते मनाचा मॅकॅनिझम- मनाची कार्यपद्धती म्हणून बरोबर आहे, पण मूळ हेतूला बाधक आहे.

उपाधी नेहमी सामान्य माणसाला आवडणारी वाटते. पण ती पुढं अडचणीत आणते. उपाधी जेवढी भव्य असेल तेवढी ती आकर्षक असते आणि जास्त उपयोगी असते, असा माणसाचा भ्रम असतो, पण त्याच्या तो लक्षात येत नाही. उलट, ते बरोबर आहे असं वाटल्यामुळं तो अशा उपाधी वाढवीत सुटतो. त्याच्या हे लक्षात येत नाही की, उपाधी मूळ वस्तू झाकते, तिच्यामुळं मूळ वस्तूच्या हेतूला धक्का पोचतो. त्यामुळं, वस्तूची उपयुक्तता व प्रभाव कमी होतो.

समजा,नाम घेणं ही मूळ उपासना असली तर त्याठिकाणी मूर्ती

पाहिजे. त्याची आरास मग त्याची पूजा-अर्चा, त्यासाठी पुजारी, त्याचं साहित्य, देणग्या देणारे लोक, दानपेटी, त्याचा खर्च - हिशेब ठेवणं, माणसं वाढत जाणं, मग खाणं-पिणं आणि त्यामुळं खर्च वाढत जाणं - अशा अनेक उपाधी निर्माण होतात.

खर्चाला पर्याय म्हणून देणगीची पेटी ठेवली जाते. मग तिच्या हिशेबाचा प्रश्न येतो. त्यात विश्वास - अविश्वास निर्माण होतात. त्यावरून मतभेदही होतात. त्याठिकाणी कुठल्यातरी निमित्तानं ठेवायच्या विविध कार्यक्रमांचा आग्रह, त्यात तशा संधीची वाट पाहणारे लोक, वक्ते, भजनी मंडळं, कीर्तनकार, प्रवचनकार, त्यांच्या शिफारशी करणारे लोक - अशा अनेक मुद्द्यांवर कार्यक्रमाच्या आयोजकांत चर्चा होतात. अनेकदा त्या चर्चा टोकाला जातात, काही मंडळी त्यातून दुरावतात. काही बाबतीत तडजोडी होऊ लागतात.

सहसा असं आढळतं की, तिथल्या मूळ प्रमुख मंडळींपैकी कुणाचीच स्वतःला लागणारी कष्ट किंवा पैशाची झळ सोसायची तयारी नसते. मतभेदांतून तडजोडींना सुरुवात होते. प्रत्येकजण आपापल्या स्वभावाला थोडीथोडी मुरड घालत, ते ते उपक्रम निभावतात. पण कुणी त्यांची सहनशीलता संपून बाहेर पडतात, कुणी मतभेदानं बाहेर पडतात. उरलेले कामांच्या ओझ्याला कंटाळून बाहेर पडतात. असं करीत कार्यकर्त्यांची आणि कार्यक्रमांची संख्या रोडावते.

यात पुन्हा कार्यक्रमाला येणाऱ्यांची उपासनेपेक्षा कार्यक्रमांची अपेक्षा असते. त्यातसुद्धा ते कीर्तन असो, प्रवचन असो, भजन असो - ते सगळे त्यांच्या दृष्टीनं कार्यक्रम असतात. यात उपासनेचा मूळ विषय हळूहळू कधीच मागं पडतो. आता कार्यक्रमांचे श्रोते, प्रेक्षक - असा वर्ग एकदा त्यात यायला लागला की, त्याची अपेक्षा तेचतेच कार्यक्रम

नकोत, त्यांत व्हरायटी हवी, त्यांतसुद्धा पुन्हा मोठमोठ्या शहरांतले किंवा नामांकित लोक या निमित्तानं बोलवावेत - अशा स्वरूपाच्या अपेक्षा सुरू होतात, ते वेगळंच. हेही मूळ उपासनेवर उपाधींसारखंच नकारात्मक काम करतं. त्यांचं म्हणणं ऐकायला जावं, तर व्याप, खर्च, मनुष्यबळ अशा गोष्टी वाढतात. ते आधी सांगितलेल्या कारणांमुळं शक्य नसतं. बरं, अशा गोष्टी वाढवू नयेत असं म्हटलं तर, देणग्या कमी होत जातात, येणाऱ्यांची संख्या रोडावते. ती संख्या रोडावली, तर मग मूळ 'नामाला' कुणी नाही असं होतं !

आता याच बाबतीत निसर्गात काय घडतं ते बघूया. झऱ्याच्या बाबतीत नैसर्गिकरीत्या किंवा पशुपक्षी, माणसं यांच्यामुळं पाणी खराब होतं. पण, त्याच्या शुद्धीकरणाची प्रक्रियासुद्धा निसर्गच सांभाळीत असतो. जसं मुख्यतः तो झरा सतत प्रवाही ठेवतो. वाहतं पाणी वाटेतल्या अडथळ्यांनी आणि गाळ कडेला जाऊन, नैसर्गिकरीत्याच शुद्ध होतं. अनेकदा त्याचं रूपांतर पुढे नदीत झाल्यावर, त्यात शुद्ध प्रवाहसुद्धा येऊन मिसळतात. तसंच, वाटेत लागणारे शुद्ध पाण्याचे झरे या पाण्याची शुद्धता वाढवीत असतात. अनेकवेळा मोठमोठ्या उंचीवरून हे पाणी धबधब्यासारखं कोसळण्याची सहज यंत्रणा असते. यामुळं ते आणखी शुद्ध होतं. ऊन आणि जलचर हे पाण्याच्या शुद्धीकरणाचं काम करीत असतात.

आता,यात माणसानं ते पाणी अडवून किंवा त्याच्या या नैसर्गिक शुद्धीकरण प्रक्रियेत अवाजवी हस्तक्षेप केले तर त्याला माणसाचाच अविचार जबाबदार आहे. पण तसं झालं नाही तर, फार मोठ्या नदीला मिळताना किंवा नदी फार मोठी होऊन समुद्राला मिळताना, हे पाणी तीर्थासारखं शुद्ध राहू शकतं. म्हणून तर, हजारो वर्षं नदीच्या काठावर

नुसत्या वस्त्याच नव्हे तर आश्रम, तपश्चर्या आणि संस्कृती वाढत आलेल्या आहेत.

निसर्गाच्या या प्रक्रियांकडं बघून, उपासनेचा मूळ झरा उपाधींच्या अडथळ्यांपासूनसुद्धा शुद्ध राखण्याची प्रक्रिया माणसाला शक्य आहे ! निसर्गाप्रमाणंच मनाकडूनही, यात आधी म्हटली तशी अशुद्धी निर्माण होत असते. तरीही, निसर्गाप्रमाणंच उपासनासुद्धा अशा अशुद्धीपासून, उपाधींपासून दूर ठेवणं माणसाला शक्य आहे.

आता त्यासाठी उपासनासुद्धा प्रवाही, बदलक्षम, वेळी मूळ हेतूपुरतीच मर्यादित ठेवावी लागते. कधी मूळ हेतूला पूरक या दृष्टीनं विस्तारलेली अशी ठेवणंही आवश्यक असतं. प्रवाहीपणाच्या मूळ हेतूविषयी सुसंगत राहण्याचं भान ठेवावं लागतं. व्यक्तींमधले वृत्तीचे बदल होत आहेत ना, हेही सतत पाहात राहावं लागतं. असे बदलही समुद्राकडं जाण्यासारख्या - म्हणजे मनःशुद्धीकडं, चित्तशुद्धीकडं जाण्याच्या दिशेनं होत आहेत ना, यावर लक्ष ठेवणं गरजेचं असतं. सूर्यप्रकाशासारखी वेळी ताप देणारी पण उपकारक तपश्चर्येची प्रक्रिया घडते आहे ना हे पाहाणं - यांसारख्या गोष्टी केल्या जाव्यात.

जसं, पाण्यात जलचर वावरतात आणि पाण्याचं शुद्धीकरण करतात, तसं शुद्ध बुद्धीचे साधक किंवा वेळी लहान मुलं यांचा उपासनेत सहभाग राहतो आहे ना, अनावश्यक उपाधींना प्रवाहातून गाळ कडेला जाऊन अडकून तो जाण्यासारखं वळण या मूळ उपासनेला मिळतं आहे ना - अशा अनेक गोष्टी त्याच तत्परतेनं केल्या गेल्या, तर प्रवाहित राहून समुद्राचं ध्येय गाठणाऱ्या झऱ्यासारखी, उपासनाही निसर्गाप्रमाणं त्याच मनाच्या साहाय्यानं वर्षांनुवर्षं निर्वेधपणे सांभाळली जाईल. ती स्थिर राहील, क्वचित थोडी कमी होईल पण निराशजनकपणे बंद पडणार नाही.

उलट, एवढी काळजी घेतली, तर उपासना स्थिर आणि निश्चितपणे वाढत राहील. लोक कमी असतील पण, उपासना बंद पडणार नाही. उलट, उपासना एखाद्या विशाल वटवृक्षासारखी सावकाश पण नैसर्गिकरीत्या वाढत राहील. त्यातून, प्रश्नात मांडलेल्या मूळ अडचणी दूर होतील.अर्थात, हे घडायला मूळ उपासक निष्ठेचे, श्रद्धेचे, बाह्यांग कमीतकमी ठेवणारे, प्रसिद्धी-विन्मुख, सबुरीनं, मुळात फक्त स्वतःची उपासना वाढावी, आपला उद्धार व्हावा-या शुद्ध भूमिकेचे लागतील, हे उघड आहे. ते तसे असतील,तर मात्र उपासनेचे हेतू नक्की साध्य होतील आणि अशा उपासना असंख्य साधकांना प्रेरणादायीही ठरतील !

❖—❖

६. आपल्या 'चिंतनसूक्ति'मधील समीचीन या शब्दाचा अर्थ काय?

➛ मूळ सूक्ती अशी आहे -

'लाख शब्द गँवाकर कुछ भी, हाथ ना आए दीन ।
एक गँवाकर बीज, सृष्टि से, फल अविरत समीचीन ।'

समीचीन म्हणजे उचित, हितकर, चांगलं. भावार्थानं, या दोह्यामध्ये जगाच्या उद्‌बोधनासाठी संत जे शब्द वापरतात, त्यांचा जो अपेक्षित परिणाम होत नाही, त्याची खंत यात उदाहरणानं व्यक्त झाली आहे. म्हणजे असं, वृत्ती पालटाव्या, त्या देवाकडं लागाव्यात म्हणून लाखो शब्द आयुष्यभर निरपेक्षपणे बोलूनसुद्धा, त्याचा कुठला उचित, योग्य परिणाम लोकांत उगवत नाही. तुलना करताना स्मरण होतं की, आपण अचेतन मानतो त्या सृष्टीत मात्र, असं शब्दासारखं सामर्थ्य असलेलं एक बीज टाकलं, तरी त्याला उचित अशी फळं मात्र अविरत येत राहातात. एक माणसाचा व्यवहार आणि एक सृष्टीचा व्यवहार !

❖—❖

७. आमचं साधन, सातत्य, भाव, निष्ठा यादृष्टींनी कमकुवत आहे. अशा साधनांमुळं आम्हाला मुक्ती कशी मिळणार? त्यासाठी आम्ही दुबळ्या माणसांनी काय करावं?

➛ कुठलंही मनापासून केलेलं साधन दुबळं नसतं ! आपण ते दुबळं ठरवतो, ते मुळात इतरांच्या साधनांकडं बघून किंवा ग्रंथांतल्या साधनांच्या अपेक्षा वाचून. असं एकतर करू नये. कारण, विशिष्ट साधनानं भगवंत साधतो, असं काही ठरलेलं गणित नाही. अनेकदा तर, आपल्या हातून अपेक्षित साधन होत नाही याची मनापासून वाटणारी खंत, त्यापोटी निर्माण होणारी तळमळ - हीसुद्धा साधनं ठरतात आणि मनुष्य मुक्त होऊन जातो. मुक्ती, ही मुळातच भौतिक गणितात बसणारी गोष्ट नाही. कृपेनं ती घडते. ती घडायला लागणारे घटक - म्हणजे साधनं, सांभाळण्याचं साधकाचं काम असतं. पण ती घडवून आणण्याचं नसतं आणि तशी ती घडवून आणताही येत नाही. म्हणूनच तर, जबर साधना करणाऱ्यांनाही मुक्ती साधतेच, असं नाही. कारण, काहीवेळा हा सबळ साधनेचाच अहंकार आड येतो. त्यामुळं, अशा तऱ्हेच्या कमकुवततेची काळजी करू नये.

मुक्तीसाठी भगवंतापर्यंत जायचा आपला साधनेचा धागा भले दुबळा असेल, पण पोचण्याची इच्छा सबळ असावी. एखादा कोळी किती दुबळ्या धाग्यावरून, या टोकाचा त्या टोकाला जातो, ते आपण पाहिलं असेल. तसं आपलंही काम होऊ शकतं.

साधन दुबळं असलं, कमकुवत असलं तरी कृपेसाठी प्रार्थना तळमळीची, नित्याची आणि सबळ ठेवावी. कारण अखेर, मुक्ती कृपेनंच मिळणार आहे !

८. श्री गोंदवलेकर महाराज एके ठिकाणी म्हणाले आहेत की, ज्यांनी माझी निंदा केली त्यांना मी कळलो नाही, आणि ज्यांनी माझी स्तुती केली त्यांना तर मी नक्कीच कळलो नाही, या वचनांचा अर्थ अवघड वाटतो. तो कसा घ्यावा ?

➢ ही वचनं थोडी गोंधळात टाकणारी, अवघड वाटतात. ते खरंही आहे. पण त्याच्यातल्या खोल अर्थात गेलं, तर ती सुसंगत आहेत. इतकंच नव्हे तर, त्याच्यात आणखी काही सांगायचं आहे, तेही आपल्याला थोडंतरी कळू शकेल.

मनुष्य दुसऱ्याची निंदा का करतो, ते आपण पाहू. पहिलं म्हणजे, त्याला त्या दुसऱ्याचं वागणं पटत नाही. ते त्याच्या मनाप्रमाणं असत नाही. यातून त्याच्यावर मतभेद, मग पुढं टीका या गोष्टी उद्‌भवतात. हे एवढ्यापर्यंत असतं, तोपर्यंतही एकवेळ ठीक आहे. कारण, माणसांच्या मनांच्या ठेवणीतल्या फरकाचा आणि स्वतःची ठेवण बरोबर वाटण्याचा तो परिणाम आहे. अर्थातच, हे आदर्श नाही, हे जरूर लक्षात ठेवावं. कारण, त्यात समजुतीचा अभाव आहे.

हे जेव्हा याच्या पलीकडं जातं आणि स्वतःच्या मनातला हा न पटणारा विषय दुसऱ्याशी किंवा त्यानं समाधान झालं नाही तर, अनेकांशी बोलल्याशिवाय माणसाला राहावत नाही, तेव्हा त्याला निंदेचं स्वरूप येतं. त्यातही आणखी एक कारण निंदेच्या मागं असतं. ते म्हणजे, ज्याची निंदा मनुष्य करतो तो माणूस, त्याचं मोठेपण, त्याला मिळालेला मान - अशा अनेक गोष्टी निंदा करणाऱ्याच्या मत्सराचा विषय असतात. अशी निंदा मत्सरापोटी घडते. ही निंदा करणाऱ्यांना, अशाच तऱ्हेचे मत्सर वाटणारे अजून काही लोक भेटले तर मग त्या निंदेला सामूहिक

स्वरूप येतं. निंदा करण्यात, मत्सर करण्यातसुद्धा एक प्रकारचा आनंद एकमेकांना मिळतो. पण हे पक्कं ओळखून असावं की, असला आनंद आसुरी आहे, तमोगुणी आहे. अर्थातच, तो त्याज्य आहे.

महाराजांसारख्या सत्पुरुषांची जेव्हा निंदा होते, तेव्हा हा विषय आणखीच नीट समजून घ्यावा लागतो. आधी उल्लेख केला, तसला कुठला चूक-बरोबर संस्कार, मनाच्या ठेवणी, त्यांचे आग्रह - अशा सामान्य माणसाच्या सवयीच्या झालेल्या ढाच्याच्या पलीकडं असे सत्पुरुष गेलेले असतात. एरवी, माणसांना अशा ठेवणींनी स्वतःचं, स्वतःच्या कुटुंबाचं, समाजाचं भलं होतं आहे - अशा समजुतीमुळं आपापल्या ठेवणी जपण्याकडं त्यांचा आग्रह असतो.

सत्पुरुष, अशी स्वतःची कुठली मनाच्या ठेवणीची चौकट जपत नाहीत. त्याअर्थानं, ते अशा सामान्य प्रापंचिक ठेवणींना बांधील नसतात. या ठेवणींच्या मर्यादा त्यांच्या कधीच लक्षात आलेल्या असतात. अशा साधूंनी एका अर्थानं सार्वत्रिक कल्याणासाठी स्वतःचं मन मोडून टाकलेलं असतं - निर्मन केलेलं असतं. त्यांच्या समोर फक्त भगवंताची इच्छा, त्याच्या योजना, त्यात आपली भूमिका कोणती - ती पार पाडणं आणि पुन्हा आपल्या मूळ स्वरूपस्थितीत येऊन राहाणं - एवढंच काम असतं. त्यामुळं, त्यांच्या कृती या आपल्या संकुचित मनाच्या, कुटुंबाच्या अशा कुठल्या कक्षेत बसतीलच असं नसतं.

सामान्य माणसांना या विशालतेची कल्पना नसल्यामुळं, त्यांना त्या कृती काहीवेळा समजत नाहीत, दोषास्पद वाटतात. मग मतभेद, टीका आणि शेवटी निंदा अशी वाटचाल ही माणसं करीत राहातात. साधूंचा आनंद हा आपण कुठल्या ठेवणीप्रमाणं काम करतो याच्यावर अवलंबून नसतो, तर तो भगवंताच्या इच्छेचं पालन करण्यावर असतो.

त्यामुळं, ते या साऱ्या निंदेतही आनंदी, शांत राहू शकतात. उलट, या समजुतीनं लहान असलेल्या निंदकांच्याकडं एखाद्या लहान मुलाच्या बालिशपणाच्या बडबडीकडं पाहावं, तसं ते पाहू शकतात. याअर्थानं, अशा सामान्य लोकांचं अज्ञान जाणून इथं म्हटलं आहे की, ज्यांनी माझी निंदा केली त्यांना मी कळलो नाही.

हे लक्षात येईल, पटेल. पण थोडं अवघड वाटतं ते, स्तुती करणाऱ्यांना ते मी नक्कीच कळलो नाही, असं ते कोणत्या अर्थानं म्हणतात ? त्यासाठीही क्षणभर असा विचार करावा की, सामान्य मनुष्य हा जेव्हा एखाद्या सत्पुरुषाची स्तुती करतो, तेव्हा त्या सत्पुरुषाकडं त्याचं जे काम असतं ते तो सत्पुरुष करतो, किंवा त्याच्यामुळं होतं म्हणून. म्हणजे, हा स्वार्थाचाच मामला आहे. आपला स्वार्थ पुरा झाला म्हणून स्तुती. त्याच्याच बरोबर काही लोक हे त्यांची स्तुती करण्यानं स्वतःला मोठेपणा मिळतो, तर काही लोक त्यांच्या सहवासात राहिल्यानं काही लौकिक लाभ होतात म्हणूनही स्तुती करतात.

आता, या सगळ्या बाबतीत सत्पुरुषांची स्थिती कशी असते, ते समजून घेणं आवश्यक आहे. वर उल्लेखलेल्या गोष्टी - स्वार्थाची कामं असोत, लौकिकाची प्राप्ती असो, मोठेपणा असो - या साऱ्याला त्यांच्या दृष्टीनं काहीच महत्त्व नसतं. त्यांच्या दृष्टीनं पुन्हा अशी काही कामं झाली, तरी ती त्यांनी केली असा त्यांना यत्किंचित भाव नसतो. त्या त्या माणसाचं प्रारब्ध असेल किंवा भगवंताची इच्छा असेल म्हणून ते झालं, यांवर ते ठाम असतात.

त्यांच्या लौकिक गोष्टी पुऱ्या करण्याचं ते आपल्याला साधन समजतात आणि त्यासाठी मानतात, स्तुती करतात. याचा अर्थ, त्यांना सत्पुरुषांचं खरं मोठेपण कळलं नाही असाच होतो. कारण, त्यांचं मोठेपण

खरंतर त्यांना भगवंताचं जे अखंड अनुसंधान असतं, त्यात असतं.

हे सारं, असे सत्पुरुष जाणून असल्यामुळं, अशा स्तुती करणाऱ्यांना मी नक्कीच कळलो नाही असं इथं ते का म्हणतात, ते समजू शकेल. कारण, स्तुती करणारा जर त्याच्या स्वार्थाच्या पलीकडं गेला नसेल, त्यांच्या ठिकाणी असलेल्या खऱ्या आत्मलाभाची त्याला जर काहीच ओळख झाली नसेल किंवा ओढ लागली नसेल - तर ते त्याला कळले नाहीत, हेच खरं.

त्यांच्या ठिकाणी जो निर्गुण भगवंत सदैव जागृत असतो, नांदत असतो, तो कळणं म्हणजे सत्पुरुष खरा कळणं. पूज्य श्री केतकर महाराज जे आत्मज्ञान बोलत, ज्याला श्री महाराजांच्या कृपेनं झालेला वाणीचा अवतार असं संबोधलं जातं, त्याबाबतीतसुद्धा महाराज म्हणाले होते की, पूर्वी लोक मला देहात पाहात, आता वाणीत पाहातात. पण ज्यांनी मला नामात पाहिलं त्यांनी मला खरं पाहिलं.

यावरून सत्पुरुष कळून घेणं, हे सामान्य पातळीवर कसं चालतं, खरं कसं असावं लागतं, याची थोडी कल्पना येईल असं वाटतं. ती आली, तर हा प्रश्न सुटणं सोपं होईल. किंबहुना तो पडणारही नाही !

९. अनेकदा बाहेरगावी गेल्यावर उपासनेत खंड पडतो. याबाबतीत काय करावं?

➛ आपल्याला उपासना नित्यनेमानं व्हावी असं वाटणं ही भाग्याची गोष्ट आहे, हे कृपया लक्षात घ्यावं. आता ती सद्‌बुद्धी जपण्यासाठी मनापासून इच्छा ठेवली, तर मार्ग सापडत जातात.

अगदी पहिली व्यावहारिक गोष्ट. बाहेरगावी जाणं हे हौसेचं आहे की गरजेचं, हे प्रथम पाहावं. हौसेचं टाळता येईल. हा प्रश्न तेवढ्या प्रमाणात कमी येईल. जर गरजेचं असेल, तर ते कर्तव्य आहे. मग पुढचे एकेक मार्ग पाहू.

दुसरा मार्ग, आपण रोज घरी जेवतो. परगावी गेलो,तर आपण तिथं जसं जे असेल तसं, त्यानुसार त्यावेळेला जेवतो. तसं कदाचित, ज्या ठिकाणी जाणार तिथंसुद्धा काहीवेळ उपासनेला देणं शक्यही असेल. त्यामुळं काही गैरसोय होत नसली, तर हा मार्ग कितपत शक्य आहे, हे पडताळून पाहावं. काहीवेळा असं होतं की, जिथं जातो त्या घरी त्याला अनुकूल वातावरण असतंही. पण त्यांना काय वाटेल - काय म्हणतील असल्या आपल्याच कल्पना आड येत नाहीत ना, एवढंतरी निदान बघावं. मग ते शक्य असेल, तर करता येईल, खंड टळेल.

तिसरा मार्ग, परगावी जावं लागलं, तरी त्यातही उपासना सांभाळायच्या काही कौशल्याच्या जागा असतात. उदाहरणार्थ, गावी जाण्या-येण्यातला प्रवासातला वेळ, गप्पा न मारता, आपण जपासाठी देऊ शकतो. काही ठिकाणी मुलाखत, पूर्वनियोजित भेट - अशा प्रसंगी त्या त्या ठिकाणी पोचल्यावरचा वेळसुद्धा वेटिंगमध्ये जातो. तोही शांत राहून याकामी वापरता येतो. कसलेल्या खेळाडूचं हेच वैशिष्ट्य असतं

की, अशा प्रतिकूल परिस्थितीत, व्यूहरचनेत अवघड वाटणारी कामगिरी तो त्यांतल्या, इतरांच्या लक्षातही न येणाऱ्या मोकळ्या जागा - गॅप हुडकून धावसंख्या कायम राखतो, पुढंही नेतो. तेच कौशल्य आपल्याला प्रत्येकाला, त्याच्या त्याच्या परिस्थितीतल्या, गावी गेल्यानंतर मिळणाऱ्या अशा मोकळ्या, अनुकूल जागा हुडकून त्या या उपासनेसाठी वापरता येतील. उदा. आपण आठवडाभर कुणाकडं गावी गेलो आहोत. एरवी तिथं घरी उपासना करणं अवघड आहे. त्यावेळी, आपला सकाळी फिरायला जाण्याचा व्यायाम असतो, असं सांगणं पटतं. त्यासाठी बाहेर पडावं आणि तासाभरानं आपला जप पुरा करून परत यावं. यातलाच भाग म्हणजे, काही गावी चांगली उपासना-स्थानं असतात. ती बघायला जाण्याच्या निमित्तानं आपण उपासना करून येऊ शकतो. यांत, त्यात्या ठिकाणचा व्यवहारही सांभाळला जातो आणि आपले खंडही टळतात.

नातेवाईकांकडं गेल्यानंतरचा एकांचा प्रत्यक्ष अनुभव आहे की, त्यांची कल्पना अशा उपासनेला ते प्रतिकूल असतील, अशी होती. पण विषय काढून पाहिला. उलट अनुभव असा की, त्यांचं अशा तऱ्हेनं नामाला बसण्याचं ठरलं होतं, पण घडत नव्हतं. त्यामुळं, हा प्रस्ताव म्हणजे त्यांना मुहूर्त वाटून, यांचीच नव्हे तर त्यांचीही उपासना झाली!

आणखी एक, आपण गावी जाणार असू, तर पूर्वनियोजनानं पुढं करायची कामं, आपण जाण्याआधी पुरी करून घेतो. जाण्याच्या कालावधीची आपल्याला आधी कल्पना असेल, तर उपासनाही आधी करून घेता येणं शक्य आहे.

यासारखे काहीच मार्ग नाहीत, अशीही परिस्थिती उद्‌भवू शकते. त्यावेळी, चुकणाऱ्या उपासनेची नोंद ठेवून ती भरून काढणं, हा मार्ग आहेच !



१०. एखाद्या प्रसंगी आपल्या अत्यंत आप्त व्यक्तीनं कसं वागावं, याबाबत आपण नकळत अपेक्षा करतो आणि ती व्यक्ती त्याप्रमाणं वागली नाही तर स्वतःला दुर्दैवी समजून मनाला उदासीनता येते. तर, अशा परिस्थितीत मनाची समजूत कशी काढावी?

➛ हे कितीही कठीण वाटलं किंवा मान्य करणं अवघड वाटलं, तरी प्रथमच जरूर लक्षात घ्यावं की, या जगात आपले गुरू आणि आपला देव यापेक्षा 'खरं आप्त' कुणीही नसतं. ही वस्तुस्थिती असली तरी, तिची मनाला भ्रमामुळं कल्पना नसते. कुणी सांगितली, तरी सहसा पटत नाही. प्रसंग आल्यावर मात्र त्यातलं सत्यत्व कळतं. तेही पुन्हा प्रसंगानं निघून जाण्याची शक्यता असते. म्हणून,उदास होऊ नये.

याला दुसरी बाजूही आहे. स्वतःला दुर्दैवीही समजू नये, कारण तसं म्हटलं तर सर्वांचं तसंच असतं ! आपणसुद्धा दुसऱ्यांच्या अपेक्षा पुऱ्या करू शकत नाही. त्या अर्थानं विचार केला तर, आपणही कुणाचे तसे 'आप्त' बनू शकत नाही.

मुळात, जगात दुःखाची जी मूलभूत कारणं संतांनी, आचार्यांनी शोधली आहेत, त्यांत 'अपेक्षाकृतम् दुःखम्' एक आहे. अर्थात, अपेक्षा ठेवाल तर अपेक्षाभंगही होईल आणि दुःखही होईल. म्हणून गीतेतही भक्ताची लक्षणं सांगताना तो अनपेक्ष असतो, म्हणजेच त्याच्या कुणाकडून अशा अर्थानं दुःखदायक ठरणाऱ्या अपेक्षा नसतात. तो सर्वस्वी भगवंताच्या इच्छेनं सर्व होतं, हे मानीत असल्यामुळं, त्याला कसंही घडावं वाटलं आणि कसंही घडलं, तरी ते भगवंताच्या इच्छेप्रमाणं असल्यामुळं आपल्या कल्याणाचं आहे,यावर ठाम राहून तो आनंदी राहू शकतो. यावरून बोध

घेऊन निरपेक्षता अंगी बाणवणं, हा समजुतीचा उपाय आहे.

मनाची समजूत घालण्यासाठी संतांचे अनुभवाचे अनेक शब्द आहेत. ते कृपया लक्षात ठेवावेत. उदाहरणार्थ, महाराज प्रपंचाला 'चावरं कुत्रं' म्हणतात. एरवी ते कुत्रं पायाशी घोटाळतं, भोवती घोटाळतं, वेळी आपलं रक्षण करतं, खातं-पितं. पण, कुठल्या क्षणी ते उलटून चावेल हे सांगता येत नाही. अर्थातच, सुखाचा वाटणारा प्रपंच, त्यातली माणसं कधी दुःख देतील ते सांगता येत नाही. हे शाश्वत सत्य मनाला नेहमी बजावीत असावं. शाश्वत सत्यं ही सत्यं असल्यामुळं, आपल्याला ती कडू-गोड वाटण्याशी त्यांचा काही संबंध नाही. आपणच ती समजून घेऊन जेवढी स्वीकारू, तेवढं आपल्याला असं औदासीन्य टाळता येईल, उत्साही राहाता येईल.

यासंबंधी, स्वामी स्वच्छंदानंद यांच्या टीकाग्रंथातल्या खालील संबंधित ओव्या नेहमी वाचनात असाव्यात.

नसे मुळीच वासना । मना नसे कल्पना ।
विषय पाहाता नाना । न इच्छी ।।१२.७.२
अति उत्तम लक्षिले । तरी नाहीच अपेक्षिले ।
उलट ते उपेक्षिले । सहजचि ।।१२.७.३
किती कर्मे जाती वृथा । स्वनिंदेच्या ऐके कथा ।
परी नसे काही व्यथा । गतव्यथ तो ।।१२.७.१८
कोणी करीती रोष । कोणी देती दोष ।
न मोडे ज्याचा संतोष । गतव्यथ तो ।।१२.७.१९
कोणी रचिले जाल । तेणे झाले बहु हाल ।
परी जो राहे खुशाल । गतव्यथ तो ।।१२.७.२०

कोणी रचून पाखंड । करविला यया राजदंड ।
परी सुख ज्याचे अखंड । गतव्यथ तो ।।१२.७.२१
स्वये देह अस्वस्थ । दरिद्रे केला ग्रस्त ।
परी जो स्वसुखे स्वस्थ । गतव्यथ तो ।।१२.७.२२...

आपल्या अपेक्षेप्रमाणे झालं नाही, यात आपण व्यक्ती म्हणून अपेक्षा करतानासुद्धा चुकण्याची शक्यता असते. चुकलो, तर होणाऱ्या परिणामांची गुरूंना काळजी असते. त्यामुळं, ती अपेक्षा पुरी होणार नाही, अशी व्यवस्था करून, ते त्यात आपलं कल्याण साधून देत असतात. हे समजून, मनाला शांत राखावं. कारण, आपल्या मनासारखं होण्यापेक्षा आणि त्यात आपल्या मनाला तात्कालिक सुखाचं आणि पुढं कायमचं दुःखाचं ठरण्यापेक्षा, जे खरं हिताचं आहे, ते होणं हे गरजेचं असतं. हे मनाला बजावणं आपलंच काम असतं.

तसाही विचार केला, तर आप्त म्हणजे लौकिक, रूढ अर्थानं आपले नातेवाईक, आपल्या मदतीला येणारी माणसं अशी कल्पना असते. समजा, ते त्या कल्पनांप्रमाणं वागत गेले आणि आपल्या सुखाचं होतं गेलं, तर यात आपल्याला आप्तांचीसुद्धा आसक्ती निर्माण होण्याची शक्यता असते. शेवटी कुठलीही आसक्ती आपल्याला दुःखात टाकते. आपण उल्लेखलेल्या प्रसंगात आप्तांकडून आपल्या अपेक्षा पुऱ्या झाल्या नाहीत, तर त्यांच्याबद्दल मन नाराज होऊन नकळत त्यांच्याविषयीची आसक्ती कमी होते. अशा प्रसंगांचा आसक्तीच्या पाशातून सुटायला उलट उपयोग करून घ्यावा. ही इष्टापत्ती असली तरी, त्यात आपलंच अंतिम कल्याण आहे.

११. 'ज्याचा जसा अधिकार, तसं त्यानं नाम घ्यावं', असं श्री महाराजांचं वचन आहे. त्यासाठी त्यांनी, वैद्य रोग्याला निरनिराळ्या माध्यमांतून औषध घ्यायला सांगतात, असा दृष्टान्त दिला आहे. याचा कृपया खुलासा करावा.

➛ आपण दिलेल्या वचनात एक महत्त्वाचा शब्द अजून आहे. तो म्हणजे, माध्यम निरनिराळं असलं, तरी औषध एकच घ्यायला, दृष्टान्तात सांगितलं आहे. ते औषध अर्थातच नाम हेच आहे. महाराज व्यवहाराची आणि परमार्थाची सांगड उत्तम जाणतात. त्यांचं हे नामाचं औषधही तसं परिणामकारक असलं, तरी महागडं नाही, सामान्यांनाही परवडणारं आहे.

इथं जो अधिकार शब्द वापरला आहे, तो लौकिक अर्थानं पदाच्या, लोकमान्यतेच्या, पैशाच्या - अशा कुठल्या संदर्भात नाही. नाम घेण्यासाठी ज्या मूलभूत अनुकूलता असतात, त्यासंदर्भात असलेली परिस्थिती, एवढा अधिकाराचा अर्थ घेतला तरी पुरे. नाम घ्यायचं झालं तरी, वेळेची उपलब्धता, मनाची बैठक, संस्कार, घरची साथ, शरीराची अनुकूलता - अशा बाबतीतला अधिकार जसा असेल, जेवढा असेल तसं, तेवढं नाम त्याला घेता येईल. मोकळा वेळ त्याच्या अधिकारात असेल, तर साहजिकच जास्त नाम घेता येईल. मनाला पूर्वीपासून संस्कार नसेल, आतून महत्त्व पटलं नसेल तर प्रथम नाम कमी होईल. पण प्रतिकूल संस्कार दूर करून, मनाला हळूहळू सवय लावून जास्त नाम घेण्याचा अधिकार येऊ शकेल. शरीराचा अनुकूलतेचा अधिकार असेल, शरीरावर हवं तसं नियंत्रण ठेवता येत असेल तर अर्थातच, ठरवल्याप्रमाणं नाम घेता येईल, वेळी ते अधिक घेता येईल.

ही अनुकूलता,म्हणजे एक प्रकारचा अधिकार, असल्यावर मनुष्य

विशिष्ट आसनावर, बैठकीवर नाम घेऊ शकेल. जास्त काळ बैठक करता येईल. नोकरी-धंद्याच्या कारणानं शरीर आणि वेळ स्वाधीन नसतील, तर असं करण्याचा अधिकार उरणार नाही. त्यावेळी जेवढा वेळ शरीर काम करू शकेल, तेवढा वेळ त्यानं नाम घेतलं, तरी ते त्याला पुरेल. त्यानं त्याप्रमाणं नाम घ्यावं.

तीच गोष्ट नाम घेतानासुद्धा वैखरीनं घेण्याची आहे. गळ्याची-घशाची अनुकूलता असेल, तर तो मनुष्य अधिकारानं वैखरीनं नामस्मरण करू शकेल. तसंच ज्यांना शिक्षण आहे, डोळ्यांत, हातांत बळ आहे ते लिखित जपही करू शकतील. पण याच अनुकूलता नसतील, तर काही नामाचा अधिकार जाणार नाही. त्याचा भाव आणि निष्ठा असेल, तर मौन पाळूनसुद्धा तो खूप नामस्मरण करू शकतो.

घरातलं वातावरण जर अनुकूल असेल, शांत असेल, इतर मंडळी त्यात असतील, तर या सर्वच प्रकारांनी त्याला नाम घेता येईल. हीच गोष्ट सत्संगाची उपलब्धता, साधकांचा सहवास, निरुपाधिक वातावरण, स्वतःचं उपासनेतलं - निर्धारातलं सातत्य - अशा बाबतींतही आहे. त्या जशा जेवढ्या अनुकूल असतील, तेवढं अधिक मनाजोगतं नाम घेता येईल.

आता औषध घेण्याच्या माध्यमाविषयी. महाराजांनी तेच औषध गरीब म्हणजे अनुकूलता कमी असलेल्याला तुळशीच्या रसात घ्यायला सांगितलं. मध्यम म्हणजे अशाच पद्धतीनं मध्यम अनुकूलता असलेल्याला केशरातून घ्यायला सांगितलं. जे अशा अर्थानं सर्व मनाप्रमाणं हवं तेवढं नाम घेण्याच्या बाबतीत श्रीमंत आहेत, अनुकूलतेत आहेत, त्यांना ते कस्तुरीतून घ्यायला सांगितलं आहे. परिणाम एकच असला, तरी परिस्थितीचा सुयोग्य वापर नामासाठी करावा, एवढं ओळखावं.

१२. मी एक व्यावसायिक आहे. माझ्या व्यवसायामध्ये खूप स्पर्धा आहे, त्यामुळे व्यवसायात यश मिळालं तर लोकांच्या असूयेचा सामना करावा लागतो. त्यापोटी काहीवेळा वेगवेगळ्या मार्गांनी त्रास देण्याचा प्रयत्नसुद्धा समव्यावसायिकांकडून होतो. अशावेळी, मी काय करावं ?

➛ व्यवसायात स्पर्धा असणं पूर्वीपासून आहे. फक्त अलीकडं, व्यावसायिक स्पर्धांना तीव्रता आली आहे. पैसा हेच ध्येय झाल्यामुळं, तो मिळवण्याचा कुठलाही मार्ग रास्त ठरवण्याची प्रवृत्ती झाली आहे. त्यात पुन्हा स्पर्धा निकोप उरली नाही. इतर व्यावसायिकांशी जीवघेणी - कटथ्रोट कॉम्पिटिशन करण्यात अनेकांना गैर वाटत नाही. ही परिस्थिती त्रासदायक आहे, इष्ट नाही हे खरं.

प्रथम लक्षात घ्यावं की, व्यावसायिक स्पर्धासुद्धा जास्त करून का उद्‌भवतात, याचा विचार करावा. मिळालेल्या पैशांत, फायद्यात संतोष नसण्यानं, असल्या स्पर्धा सुरू होतात. इतरांचा पैसा, फायदा, प्रगती दिसते, तुलना होते. धंद्यात मला किती फायद्याची गरज आहे, हा मूळ विचारच विसरतो. मग, दुसऱ्याकडं बघून धंदा वाढवण्याची प्रवृत्ती होते, हे लक्षात घेण्याची गरज आहे.

ज्याला स्वतःच्या गरजांपुरतं मिळवायचं आहे, त्याच्या पैसा मिळवण्याला, धंदा वाढवण्याला आपोआप मर्यादा येतात. कसल्याही मार्गानं स्पर्धा करून पैसा कमवणाऱ्यांच्या दृष्टीनं, अशी व्यक्ती स्पर्धा करण्यासारखी उरत नाही, हे सत्य आहे. दहा लाख मिळवणारा पाच लाख मिळवणाऱ्याशी स्पर्धा करीत नाही. त्याची स्पर्धा पंधरा आणि वीस लाख मिळवणाऱ्यांशी असते. त्यात्या काळात हे आकडे बदलत

जातील, पण वृत्ती आणि परिणाम तसेच राहतील. उलट, पाच लाखांवर समाधानी असणाऱ्या, थांबणाऱ्या व्यक्तीला असूयेपेक्षा, अशा मोठ्या व्यक्तींकडून तुच्छता, हेटाळणी केला जाते, तीच फारतर सोसावी लागते. स्पर्धा करण्यासारखी परिस्थिती उरत नाही.

आपणसुद्धा अनेकदा, नकळत या पैशाच्या मायाजाळात अडकलेले असतो. मला मिळतो त्याला मी काय करणार - अशी मन नकळत समजूत करून घेत असतं. माझ्या मिळवण्याला मला मर्यादा घालता येते, हे मी सोयीस्करपणे विसरून जात असतो आणि तक्रार मात्र इतरांबद्दल असते. असं काही होत नाही ना, हे आधी पाहावं.

असं होत नसेल आणि तरीही स्पर्धेला किंवा असूयेला सामोरं जावं लागत असेल, तर पुढील विचार करता येईल. कर्माला कर्ता जबाबदार आहे. तसाच असूयेचा त्रास आपल्याला वाटत असला, तरी अंतिमतः तो त्रास असूया करणाऱ्याला होणार आहे, हे लक्षात ठेवावं. आपल्याला क्रियेला प्रतिक्रिया म्हणून जरी स्पर्धा, असूया, तुलना करावी वाटली, तरी आपल्या हितासाठी आपण ती करू नये.

काही असूया किंवा त्रास धंद्यातल्या काही विशिष्ट क्षेत्रांतल्या नफ्यामुळं होत असतात. त्या क्षेत्रांतून बाजूला होता आलं तर पाहावं. अतिवेगानं जाणाऱ्या गाड्या आपण जशा पुढं जाऊ देतो, तसंच व्यवसायातही काही वेळा करावं लागतं. त्याचबरोबर, ज्यांना अशा तऱ्हेनं स्पर्धा करून खूप पैसा मिळाला, अशांच्या प्रगतीत मनापासून आनंद मानावा. कारण, त्या मार्गानं जाण्यात सोसाव्या लागणाऱ्या त्रासापेक्षा असा निकोप आनंद मानणं कमी त्रासाचं असतं. त्यातसुद्धा, अशा अमाप प्रगतीला आपण मनमोकळी दाद द्यावी, त्यामुळं आपण त्या स्पर्धेत नाही,याची त्यांना खात्री होते आणि आपला त्रास वाचतो.

१३. अलीकडं मुलं-मुली तशी चारचौघांसारखी असताना, परिस्थिती बरी असतानासुद्धा उशीरा लग्न करण्याची प्रवृत्ती दिसते. तसंच काहीवेळा अविवाहित राहण्याची प्रवृत्ती वाढताना दिसते. त्यामुळं, अनेक कुटुंबांमध्ये अस्वास्थ्य निर्माण झालेलं दिसतं. याला आजचा काळ, जीवनपद्धती, प्रारब्ध, परिस्थिती की आणखी काही कारणं आहेत ?

➛ कदाचित, हा प्रश्न काही ठिकाणी जास्त प्रमाणात तर काही ठिकाणी कमी प्रमाणात आढळत असेल. पण तसा सार्वत्रिक म्हणण्याइतपत तो प्रश्न मोठा होत चालला आहे, हे मात्र खरं. या प्रश्नाला अनेक बाजू आहेत. इथल्या उत्तराच्या मर्यादेत काही पाहण्याचा प्रयत्न करूया.

या प्रश्नाचं मुख्य कारण विवाहसंस्थेचा, त्याच्याशी निगडीत अशा व्यावहारिक, भावनिक, कर्तव्यात्मक, समाजप्रधान इत्यादी अनेक बाजूंवर मुलांच्या काय किंवा पालकांच्या काय, दोन्ही बाजूंनी गांभीर्यानं विचार केला गेलेला नसतो, हे आहे. मुलं नुसतंच नंतर बघू म्हणतात आणि पालक फक्त वेळेवर व्हावं एवढंच म्हणतात, असं आपल्याला बरेच ठिकाणी आढळून येईल.

त्यातही, आपण म्हणता ते असं असतं. काही कुटुंबांत विशेषतः पालकांना गरज वाटते पण मुलांना वाटत नाही, असं आढळेल. तर काही कुटुंबांत मुलांना ते वेळेवर व्हावं असं वाटतं, त्यामुळं त्यांना अस्वस्थता आहे पण पालकांना ती नाही, कारण ही मुलं अजून शिकायची आहेत, सेटल व्हायची आहेत, अशा पालकांच्या कल्पना आहेत. दोन्ही बाबतीत एकेक बाजू चुकीची आहे, हे उघड आहे.

याबाबतीत,एक महत्त्वाची गोष्ट दुर्लक्षित झाली आहे. ती म्हणजे,

आपला विवाह ही इतकी वैयक्तिक गोष्ट नसून, ती विवाहसंस्थेचा, संस्कारांचा आणि कर्तव्याचा भाग आहे - हा वास्तव दृष्टिकोन अलीकडं विसरला गेला आहे. तो दृष्टिकोन असला की, लवकर-उशीरा हे प्रश्न गौण ठरतात. आपलं कर्तव्य करण्याची गरज आणि योग्य वेळ याचं भान दोन्हींही पिढ्यांना राहातं. मग अर्थातच, हा प्रश्न मध्यम मार्गानं सुटेल. त्याचे तणाव दोघांनाही राहणार नाहीत.

या प्रश्नात प्रारब्धाची बाजू आहे. पण ती खूप कमी आणि व्यक्तिगत स्वरूपाची आहे. मोठी कारणं आहेत, ती आजच्या काळची जीवनपद्धती, त्यावरचे पाश्चात्य संस्कृतीचे वाढते प्रभाव, अवास्तव अपेक्षा - अशी अनेक आहेत. तसं पाहाता, मुलीला अठरा वर्षांनंतर आणि मुलाला एकवीस वर्षांनंतर विवाह करायला योग्य वेळ समजणारा कायदा, हा काही विचार न करता केलेला नाही. त्यामध्ये आरोग्यशास्त्र, शरीरशास्त्र, सुप्रजननशास्त्र, व्यवहार - अशा अनेक प्रकारे रास्त विचार केला गेला आहे, हे लक्षात घ्यावं.

ही विवाहाची किमानं वयं असली, तरी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबन हे त्या साऱ्यांत गृहीत धरलेलं आहे. त्यात, काळानुसार किमान शिक्षण पुरं होण्यासाठी लागणारा वेळ, हा कायद्याचा भाग नसला तरी व्यवहाराच्या दृष्टीनं महत्त्वाचा भाग आहे. अर्थातच, पदवीपर्यंतचं शिक्षण आणि स्वावलंबी होण्याइतपत नोकरी हे व्हायला लागेल तेवढा काळ या किमान काळानंतर गृहीत धरावा, हे रास्त आहे. कारण, शिक्षणाला कमाल मर्यादा नाही तशी ती नोकरी-धंद्यालाही नाही. त्यामुळं, कुटुंब चालवण्याइतपत स्वावलंबी होणं, हा खरा सुवर्णमध्य आहे. तो विवाह अडू देत नाही, सामाजिक प्रश्न निर्माण करीत नाही आणि प्रगतीला वावही ठेवतो.

अवाजवी अपेक्षा हा प्रश्न मुलांबरोबर पालकांचाही आहे. आपल्या स्वतःच्या मुलाचं - मुलीचं, त्यांच्या कुवतीचं, रूपाचं, मर्यादांचं, वयाचं वास्तव भान पालकांनाही अनेकदा आढळून येत नाही. साध्या भाषेत, पालकांना आपला मुलगा इंद्र वाटतो तर मुलगी अप्सरा वाटते. मग इथूनच प्रश्न सुरू होतो. आता हेच आकलन नीट नसल्यानं, मुलांच्याही समजुती आणि अपेक्षा अकारण वाढून बसतात. त्यामुळं, हे विवाह अर्थातच, असं प्रत्यक्षात शक्य नसल्यामुळं, वर्षांनुवर्षं पुढं जात राहातात.

तीच गोष्ट मुलामुलींच्याही बाबतीत घडते. त्यांच्यावर प्रभाव टाकणारे तर असंख्य घटक आहेत आणि विशेषतः त्याबद्दल कुणी सावध नाही किंवा त्यांना जागृतही करत नाहीत. त्यामध्ये, नकली जगाचे सतत आदळणारे आदर्श, त्यात मालिका, स्वयंवरं, सिनेमा, त्यांतले थाटमाट - यांचा नकळत प्रभाव मूळ धरीत असतो. आपला विवाहही असा काही विलक्षण सोहळा झाला पाहिजे, अशी गैरसमजूत होऊन बसते. अर्थात, बाहेरची परिस्थिती तर काही टळत नाही. मग असं काही घडवायचं असलं, तर त्यासाठी अमाप पैशाची गरज निर्माण होते, त्यातून इकडं काळ वर्षांवर्षांनी पुढे सरकत असतो. ते लक्षात येत नाही. शिवाय, बाहेरचं राहणीमान वाढत असल्यामुळं असं पैशाचं स्वप्न कुठं थांबवता येत नाही. आलिशान बंगल्यांची आणि गाड्यांची स्वप्नं पाहात गेल्यामुळं त्यात पाचपाच - दहादहा वर्षं कशी निघून जातात ते कळत नाही. वास्तविक, वेळेत विवाह करून बिऱ्हाडात राहून साध्या दुचाकीवरून प्रपंच सुरू झाला असता आणि मधल्या या पाच वर्षांत तो निदान स्वतःच्या घरात, साध्या चारचाकी गाडीत मुलाबाळांसह नेता आला असता, इतका सरळ विचारही सुचत नाही. कुणी सुचवीत नाही, सुचवलं तर कुणी ऐकण्याच्या मनःस्थितीत असत नाही.

हे सारं होत असताना इकडं वय वाढत असतं, काहीवेळा परिस्थिती प्रतिकूल होत जात असते. आईवडिलांची आजारपणं सुरू होतात. या साऱ्याबरोबर विद्या, रूप, पैसा, उत्तम नोकरी - असल्या बाबतींत खूप अपेक्षा असलेल्या आणि त्यांत तडजोड करायला तयार नसलेल्या मुलांचं एकवेळ कमी तडजोडींत लवकर वयात लग्न होऊ शकतं, पण जसजसं वय वाढत जातं, तसं स्वतःच्या बाबतीतही अशा प्रतिकूलता वाढत जातात. मग, अशा सगळ्या बाबतीत एकेक एकेक अपेक्षा कमी करीत जावं लागतं. त्यात पुन्हा, जरा लहान वयात असलेली स्वभावाच्या बदलाची क्षमतासुद्धा वयाबरोबर कमी होत जाते. मतं, आग्रहं - सारं ठाम बनत जातं. त्याचा परिणाम, शेवटी रोज विसंवाद होण्यात, वेळी तो विकोपाला जाण्यात होतो. स्वास्थ्य हरवतं. म्हणून, या प्रश्नाचा वेळीच विचार करणं उपयोगी ठरेल.

त्याची एक काळाची बाजू आहे. आपल्याकडं शेती आणि घरगुती उद्योगप्रधान असलेली समाजरचना होती. स्वाभाविकच, तिच्यात लौकिक शिक्षण, आर्थिक स्वावलंबन - अशा गोष्टी गौण होत्या. लग्नाचं वय होणं आणि चांगल्या घराण्यांतला मुलगा - मुलगी मिळणं, एवढ्याच अपेक्षा होत्या. घरची शेती किंवा घरगुती उद्योग हे लहानपणापासून येत असल्यामुळं आणि तेवढ्यावर अशा वाढणाऱ्या जबाबदाऱ्याही पेलल्या जाऊ शकत असल्यामुळं, त्याची फारशी काळजीही नव्हती. परिस्थितीत थोडा फरक पडला, शेतीवाडी थोडी मागं पडली. नोकरीधंद्याला प्राधान्य आलं, तरी साधेपणानं राहणाऱ्यांना आणि स्वास्थ्य महत्त्वाचं वाटणाऱ्यांना आजही पंचविशीत विवाह करणं शक्य आहे, हिताचं आहे. ते जाणणारे आजही ते करतात, हे लक्षात घ्यावं.

काळानं आणलेली आणि आपण ज्या बाबतीत बेसावध आहोत,

अशी परिस्थिती म्हणजे शिक्षण, सेटलमेंट, उच्च राहणीमानाच्या सुरुवातीपासूनच्या अपेक्षा - अशा गोष्टी होत. आज जरी अगदी मेडिकलला गेलं,तरी पूर्वी ग्रॅज्युएशन पुरं वाटत असे,आता पी.जी. सुद्धा पुरेसं वाटत नाही. स्पेशलायझेशनच नाही, तर सुपर स्पेशलायझेशनसुद्धा खात्रीचं वाटत नाही. तोपर्यंत इकडं तिशी येते. अपेक्षा आणखी वाढतात आणि पुऱ्या होण्याची शक्यता आणखी कमी होते. मध्यमवर्गीय माणसाच्या दृष्टीनं तरी हे सगळं करताना कर्जाची ओझी वाढत गेलेली असतात. शिवाय, पुढं उद्योगासाठी सेटअपचं कर्ज डोळ्यांसमोर दिसत असतं. या सगळ्यांत विवाह लांबणीवर पडतात. तीच गोष्ट, अशा जास्त पैसा मिळेल, या आशेनं घेतलेल्या इंजिनिअरिंगसारख्या क्षेत्रांची असते. वेळेत, आहे त्या नोकरीवर विवाह शक्य असतो. केला तर स्वास्थ्य मिळू शकतं. पण थांबलं, तर पैशाच्या अपेक्षा पुऱ्या होत जातातही. पण त्या क्षेत्रातल्या अनिश्चिततेचा सामना करीत राहावं लागतं. अतिरिक्त कामांचे तणाव सहन करीत असताना त्यात आणखी ही लग्नाची जबाबदारी नको, असं म्हणण्याकडं कल होत जातो. यात वय निघून गेलं असलं, लग्न करावं वाटलं किंवा इतरांचा तसा दबाव यायला लागला, तर तडजोडींना सामोरं जावं लागतं. त्या तडजोडीही अस्वस्थ करीत राहतात.

पाश्चात्य संस्कृतीनं खूप पैसा, स्वतंत्र राहण्यासाठी आधीपासून मनोवृत्ती, घरच्या मोठ्या माणसांची जबाबदारी नको असण्याची वृत्ती, भविष्यकाळासाठी आणि आत्ताच्या उच्च राहणीमानासाठी भरपूर पैसा मिळवण्याकडचा कल, त्यात त्यामुळं उशीरा विवाह करण्याला मिळालेली अयोग्य प्रतिष्ठा, स्पिन्स्टर्स क्लब सारख्या संस्था - असल्या संस्कृतीच्या प्रभावानं विवाहसंस्थेच्या मूळ साध्या, सरळ, नैसर्गिक, स्वास्थ्याच्या पायावरच आघात केला आहे. हे लक्षात येईल तो सुदिन !

असल्या संस्कृतीनंच मुळात उशीरा लग्न करताना निर्माण होणारे अनेक प्रश्न अनेकांच्या वाट्याला आणले आहेत. उशीरा लग्नामुळं उशीरा होणारी मुलं, पालकांच्या कार्यक्षमता संपण्यापूर्वी ती हाताशी न येणं, त्यामुळं पालक निवृत्त - मुलांची शिक्षणं अपूर्ण - आर्थिक क्षमता घटलेल्या - वयामुळं सहनशीलता कमी झालेली - या साऱ्यामुळं अस्वास्थ्य निर्माण होतं. दोनही पिढ्या एकमेकांवर चिडचिड करतात. अनेकदा उशीरा होणाऱ्या विवाहांमुळं मुलं न होणं किंवा आता ती नकोतच, असं मानण्याकडं प्रवृत्ती होत जाते. असे अनेक दुष्परिणाम आहेत, याकडं वेळेत लक्ष द्यावं, हे हिताचं आहे.

त्यात पुन्हा अविचारी अनुकरणांमुळं, वेगवेगळ्या व्यसनांना या आयुष्यातल्या वीस ते पंचविशीतल्या काळात नकळत सुरुवात होते. त्याला आजच्या तथाकथित कार्पोरेट कल्चरनं आणखीच प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. पूर्वीही असे पदार्थ, व्यसनं नव्हती असं नाही. पण, त्यांना आज दिली जाणारी प्रतिष्ठा नव्हती आणि ती सर्रास झाली नव्हती. आता त्याचं प्रमाण आणि त्याला मिळालेली प्रतिष्ठा दुर्दैवानं इतकी वाढलेली दिसेल, की त्यापोटी निर्व्यसनी किंवा शाकाहारी राहू इच्छिणाऱ्यांचेच विवाह अकारण लांबलेले आढळून येतील. कारण, असे राहणारे हे जरी अगदी खात्रीनं बरोबर व जाणीवपूर्वक जगत असलेले दिसले, तरी या इतर दुष्प्रभांवात अडकलेल्या विवाहेच्छूंच्या मानानं नगण्य आणि मागासलेले ठरतात. त्यामुळं चांगल्या वातावरणात, कुटुंबांतही विवाह पुढं जातात, नैराश्य येतं.

यांत कुठं प्रारब्धाचा भाग नाही. त्यामुळं लांबलेले किंवा न झालेले विवाह हे केवळ अपवादभूत असतात. बहुसंख्य कारणं आहेत ती मागं दिलेली. त्यांवर विचार केला तर हा प्रश्न कमी होईल !

१४. आजकाल जीवन रोज अधिकाधिक गतिमान होत चाललेलं आहे. काही क्षेत्रांतली गती तर कल्पनेच्या पलीकडची आहे. त्यामुळं येणाऱ्या यंत्रांनी-साधनांनी जीवन सुखाचं झालं आहे. तसंच इकडं जीवनात कोरडेपणा, संवादांचा अभाव, वैफल्य, मानसिक आजारांचं वाढतं प्रमाण - अशी अनेक दुःखंही समोर येत आहेत. याबाबतीत काय करावं?

➢ आपल्याला शांतपणे, आवश्यक वेळ देऊन हे प्रश्न आणि त्याची उत्तरं शोधणं, ती अमलात आणणं एवढं स्वास्थ्यसुद्धा या गतिमानतेनं ठेवलेलं नाही, हे प्रथम लक्षात घ्यावं. आत्ता निदान ज्या मुद्द्यांचा आपण विचार करीत आहोत, त्यांना देण्याइतपत वेळ तरी आपण कृपया द्यावा, अशी मी विनंती करतो.

प्रथम हे समजून घ्यावं की, ही बरीचशी गतिमानता ही विविध क्षेत्रांतल्या वैज्ञानिक शोधांनी, त्यामुळं निर्माण झालेल्या साधनांनी आलेली आहे. संपर्काच्या, दळणवळणाच्या, शस्त्रास्त्रांच्या, मुद्रणाच्या, मनोरंजनाच्या, यंत्रांच्या, वैद्यकाच्या, संगणकांच्या - अशा काही महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये झालेल्या संशोधनांनी ही गतिमानता आलेली दिसेल. ही क्षेत्रं महत्त्वाची असल्यामुळं आपली त्यासंबंधी कामं जलद होऊन आपल्या 'संपूर्ण जीवनाला' गतिमानता आली आहे, अशी आपली समजूत झाली आहे, हे लक्षात घ्यावं.

वस्तुतः किचकट गणित सोडवायला लागणारा वेळ कॅल्युलेटरमुळं कमी झाला, जात्यावर दळायला लागणारा वेळ गिरणीच्या संशोधनामुळं कमी झाला, चालत किंवा बैलगाडीनं जाण्याऐवजी दुचाकी-चारचाकी-विमान यांमुळं प्रवासाला लागणारा वेळ कमी झाला - अशा अर्थाची ही

गतिमानता आहे.

हे अत्यंत महत्त्वाचं आहे की, ज्याला आपण गतिमानता म्हणतो आहोत, ती म्हणजे फक्त काही क्षेत्रांतली कामं अत्यंत जलद गतीनं होणं, हे आहे. त्यामुळं 'जीवनाची गती' वाढत नसते. कामांचा वेळ वाचतो, कष्ट वाचतात. खरंतर हे नीट समजून घेतलं, तर अशा संशोधनांमुळं - साधनांमुळं आपली शरीरशक्ती वाचणार, वेळ वाचणार, त्याचा उपयोग आपण काय करणार - हा खरा प्रश्न निर्माण झाला आहे!

हाच गतीचा प्रश्न आपण आणखी नीट समजून घेऊ. आपल्या विश्वाला एक मूळ गती आहे. तिला स्वतःची लय आहे. तिच्यात होणारे बदल निश्चित स्वरूपाचे असतात. कोणत्याही दिवशी किती वाजता सूर्य उजाडणार - मावळणार किंवा पृथ्वीची स्वतःभोवतीची प्रदक्षिणा किती तासांत होणार हे ठरलेलं आहे. आपण जी प्रगती म्हणतो, त्यातली गती याला लागू होत नाही. तीच गोष्ट पृथ्वीबरोबरच सूर्य, इतर ग्रह, तारे, आकाशगंगा, त्यांची आकारमानं, अंतरं, भ्रमणाच्या विशिष्ट गती, त्याला लागणारा वेळ - अशा असंख्य गोष्टींवर आपल्या या तथाकथित गतिमानतेचा परिणाम होत नसतो.

हीच गोष्ट आपल्या व्यवहारातल्या अनेक गोष्टींची पाहावी. समजा, इथून पाचशे किलोमीटर अंतरावर जायला पूर्वी पाच दिवस लागत असतील, तर आजच्या गतिमान वाहनानं पाच तासांतसुद्धा जाता येईल. यामुळं जीवन गतिमान झालं आहे, असं आपल्याला उगीचच वाटण्याची शक्यता आहे. जे गाव इथून पाचशे किलोमीटरवर आहे ते पाच किलोमीटरवर आलेलं नाही. फक्त जाण्यायेण्याचा वेळ, चालण्याचे - बैलगाडीचे कष्ट वाचले. त्यामुळं, एखादं काम करून मी जलद परत येऊ शकतो. पण उरलेले साडेचार दिवस मोकळे होणार.

त्याचा मी कोणता विधायक उपयोग करणार आहे, याचा विचार जर माझ्याजवळ नसेल, तर तो वाचलेला वेळ मी आळसात, अधिक कामं करण्यात, मनोरंजनात किंवा उपद्रवकारक गोष्टी करण्यांत - असा कसाही घालवू शकतो. हा वेळ मी जर अशा तऱ्हेनं स्वतःच्यासाठी घालवला, तर मी अधिकाधिक आत्मकेंद्रित होत जाणार, हे उघड आहे. हळूहळू ही प्रवृत्ती पूर्ण स्वार्थाकडं नेणारी ठरते.

अजूनही काही विचार करण्याची गरज आहे. या गतीनं नेमक्या काय गोष्टी झाल्या, त्याचे लाभ कोणते, हानी कोणती आणि मर्यादा कोणत्या, याचं आकलन होणं गरजेचं आहे. गतीनं जशी भौगोलिक अंतरं कमी करता आलेली नाहीत, तशीच निसर्गाची असंख्य क्षेत्रांतली गतीसुद्धा त्यामुळं बदललेली नाही. माणसाला मिळणारा चोवीस तासांचा दिवस तसाच आहे. विशिष्ट झाडाची, एका वर्षानं - पाच वर्षांनी होणारी वाढ तशीच आहे. सर्व प्राण्यांचं - मनुष्याचं प्रजनन तेवढ्याच महिन्यांनी होत आहे. मेंदूच्या किंवा तशा हृदयासारख्या यंत्रणांच्या वाढींची गतीही तशीच आहे. निसर्गातल्या मूळ पीक-पाण्याची गतीही नैसर्गिक व तीच आहे. साध्या शब्दांत सांगायचं तर, असल्या गतिमानतेनं आठ दिवसांत आंबा येत नाही की पंधरा दिवसांत मूल होत नाही. मग जीवनाला गतिमानता आली म्हणजे काय, यावर विचार करायला नको का ?

उलटपक्षी असं आहे की, आपण गतीनं एका ठिकाणहून दुसऱ्या ठिकाणी गेलो म्हणून एका बाजूनं जग जवळ आल्याच्या वल्गना करतो आहोत - वास्तविक भौगोलिक अंतरं तशीच असताना ! याच भ्रमात राहून आपण दुसऱ्या बाजूनं पुढं कुठलंही पीक तंत्रज्ञानानं लवकर आणता येईल का, जमिनीची पीकं देण्याची नैसर्गिक गती आणि प्रमाण यांना गती देऊन आपण जास्त पीक काढू शकू का, कुठल्याही मोसमात कुठलंही

फळ पिकवू शकू का - असल्या प्रयोगांत पडलो. यांत फक्त लोभ आणि आमच्या सोयीनं सर्व सुख सर्व काळ आणण्याचा आपला हा गतिमानतेचा प्रयोग, हा भ्रम ठरला आहे. त्यामुळं, उलट अनेक प्रकारच्या नैसर्गिक गतींत बिघाड उत्पन्न होऊन त्याचे परिणाम शरीरात बिघाड व आजार उत्पन्न होण्यात झाले आहेत. त्यामुळं आजारांच्या आणि औषधांच्या दुष्टचक्रात आपण अडकलो आहोत. जमिनीची उत्पादनशक्ती, उत्पादनातला कस यांची दुरवस्था अशीच झाली आहे.

खरंतर, गतीला प्रगती समजण्याचे आणि गतीच्या मर्यादा आणि तिचं स्थान न ओळखण्याचे दुष्परिणाम आपल्या मानवी जीवनाच्या स्वास्थ्यावर झाले आहेत. त्याच्यातलीसुद्धा नैसर्गिक गती आणि त्याच्यामुळं स्वास्थ्य आणि आनंद आपण गमावून बसलो आहोत, हे आता तरी लक्षात घेण्याची गरज आहे. आज वाढत चाललेल्या नव्यानव्या शारीरिक व्याधींचं आणि मानसिक अस्वास्थ्याचं कारण यात आहे. ते कसं आहे ते पाहावं.

एकतर यंत्रांमुळं माणसाचे शारीरिक कष्ट कमी झाले. त्या कष्टांनी त्याचं शरीर तंदुरुस्त राहात होतं. यंत्र वाईट नाहीत, पण असा वाचलेला वेळ आता आपल्याला व्यायामाला द्यावा लागेल किंवा दुसरे उत्पादक, शरीरश्रम किंवा सेवा यांना द्यायला हवा होता. अनवधानानं ते लक्षात न आल्यानं, शरीरकष्ट नसल्यानं व्याधींना आमंत्रण मिळालं. वाचलेला वेळ योग्य ठिकाणी न लागल्यानं तो रंजनं, संपर्कमाध्यमं, मोबाईल, नेटवर अकारण वेळ जाणं, महत्त्व नसलेल्या अनेक गोष्टी उदा. लहानसहान गोष्टींबद्दल ट्विट करणं, हजारो प्रतिक्रिया ओढवून घेणं, मग त्याचे खुलासे करीत बसणं, दरम्यान असंख्य प्रक्षोभक घटनांना आणि सामाजिक नुकसानीला कारणीभूत होणं, अनेक वेबसाइट्सना

वेळ आहे म्हणून भेटी देत राहाणं-अशा बाबतीत ही वाचलेली शरीरशक्ती आणि वेळ यांचा अपव्यय होत गेलेला आपण पाहात असाल.

याच तंत्रज्ञानानं जीवनातल्या ज्या अनेक मानवी भावना आणि गरजा असतात, त्या अक्षरशः निकालात निघाल्या आहेत. साधे लँडलाईनचे फोन होते तेव्हा गरज भागत होतीच, पण फोन येण्यात एक उत्सुकता होती. त्या एका फोनभोवती साऱ्या कुटुंबाचं नातं होतं. कधी रिंग वाजली की, कुणाचा फोन आहे याची एक उत्सुकता होती. कुणाचाही फोन असला, तरी तो कुणीही घेत होतं, सर्वांना कळत होतं. त्यामुळं प्रायव्हसीच्या घातक कल्पनांना प्रोत्साहन नव्हतं. उलट कुणासाठीही फोन असेल, तरी ज्याला शक्य असेल तो फोन घेत होता. त्याचाही त्या व्यक्तीशी संपर्क राहात होता, ज्याच्याकडे काम असेल त्याला तो हाक मारून दिला जात होता. फोन आलेला माहीत असल्यामुळं त्याविषयाची चौकशी होत होती, एकमेकांना त्यामुळं घडामोडी कळत होत्या, एकमेकांत संवाद राहात होता.

यात तंत्रज्ञानानं प्रगती करून, या एका साध्या बाबतीतसुद्धा आमच्या मानवी आयुष्यातल्या गोष्टींना किती विघातक वळण दिलं, किती नैसर्गिक भावना गमावल्या. एकतर फोनऐवजी मोबाईल आले. ते प्रत्येकाचे स्वतंत्र झाले. त्यात कॉलर आयडी आले. त्यामुळं कुणाचा फोन ही उत्सुकताच निघून गेली.

फोन स्वतंत्र असल्यामुळं सहजतेनं कुणाचा फोन आला, कोणती घडामोड झाली, हे कळणंही अशक्य झालं. एकमेकांच्यात आधीच कमी होत चाललेला संवाद आणखी कमी झाला. सर्वांना एकत्र आणणारं, घडामोडीत सहभागी करून घेणारं माध्यम गेलं.

त्यामुळं एकमेकांच्या आणि ज्यांचा फोन येतो त्यांच्याही

सुखदुःखातला साधा सहानुभूतीचा, आनंदाचा, दुःखाचा, कधी उत्साहाचा - सहभाग अंतरला. माणसं आणखी दुरावली. त्यात पुन्हा, या सुविधा देणाऱ्या कंपन्यांची मायाजाळं अवतरली. ती थेट त्याच्या त्याच्या हातात, त्याच्या त्याच्या कानाला आणि डोळ्यांना. हे कृत्रिम जग आपल्या एका हातात वागवताना गंमत वाटते आहे खरी, पण डोंगरात मैलोन्‌मैल चालून घाम गाळून मग डोंगरमाथ्यावरचा प्रसन्न आणि उल्हसित करणारा गार वारा आणि तिथलं एखादं शांत देवदर्शन - अशा असंख्य आनंदित करणाऱ्या, नैराश्य - मरगळ दूर करणाऱ्या गोष्टींना आपण मुकलो.

आपल्या मुठीत मावणाऱ्या मोबाईलमधलं हे कृत्रिम जग आपल्याला यांतलं काहीही खरं, नैसर्गिक देऊ शकणार नाही, याची अनेकांना जाणीव होत नाही. खऱ्याखुऱ्या जिवंत माणसांचा संवाद आणि किंमत गेली. तिची जाणीवही राहिली नाही. शेवटी, संवाद ही माणसाची मूलभूत, प्रेरक, नैसर्गिक गरज पूर्ण होणं तर आवश्यक आहे. तिचे हे नैसर्गिक मार्ग बेसावधपणे गमावल्यामुळं हे संवाद करण्यासाठी मनुष्य पडद्यावरच्या असंख्य ओळखीच्या-बिनओळखीच्या माणसांशी वेळीअवेळी संवाद साधण्यासाठी धडपडू लागला.

चांगल्या भावना या घातक गतिमानतेनं अनेक क्षेत्रांत गमावल्याच. त्याचबरोबर,अनेक नकारात्मक आणि वाईट गोष्टींनाही या साऱ्या संपर्कातल्या गतिमानतेनं अकल्पित प्रोत्साहन दिलं. फोन घरांत होते,जमिनीवर होते तोपर्यंत माणूस त्याच्या घरातून बोलतो आहे, घरी आहे,या म्हणण्यात नकळत खरेपणा होता. त्यामुळं, खरेपणाच्या गुणाचं संवर्धनच होत होतं.पण आता त्यानं मोबाईलवर मी कुठंही आहे असं सांगितलं, तरी ते खरं धरता येणं अवघड झालं. कारण, त्यात सहजपणे खोटेपणा करता यायला लागला. माणूस एक गुण गमावून बसला. उलट

आतल्या असत्याला, दुर्गुणाला प्रोत्साहन आणि सुरक्षितता मिळाली. तीच गोष्ट ईमेलची, साइटवरच्या माहितीची, इतकंच काय स्वतःच्या दिलेल्या फोटोची. या माध्यमात काहीही पुरवण्यात फसवणूक करणं याची जणू सोयच झाली. तथाकथित गतिमान देशांनी पैशासारखे महत्त्वाचे विषय हाताळणाऱ्या बँकांतला मानवी व्यवहार संपवत आणला. आता कागद, हस्ताक्षर, सही, अधिकाऱ्याची तपासणीची सही - काही नाही. त्यातलं कुठलं ठोस-फिजिकल रेकॉर्ड नाही. पैसे इकडून तिकडं जाण्याची गती वाढली. पण सर्व संपर्कमाध्यमांशी ते जोडलेलं आहे, त्यामुळं ते कुठूनही पाहाता येणं, हाताळणं शक्य होतं. त्यात दुष्प्रवृत्तींना रान मोकळं होतं. आपल्याच राजधानीत परराष्ट्रातला एक प्रभावी संगणक एखाद्या खोलीत बसवून आपली थेट संरक्षण खात्यातली गोपनीय माहितीही अलगद दुसऱ्या देशात पोचवतो, ती त्याच गतीनं. विनाश होतो तोही त्याच गतीनं! आजही एका राष्ट्रातला सर्वांत मोठा सायबर क्राइम जंगजंग पछाडून शोधून काढल्यावर निघाला तो एका साध्या खोलीतून होणारा आणि करणारा निघाला तो अशा अतिवेगवान संगणकात घुसू शकणारा व्हायरस बनवणारा तज्ज्ञ, तोही फक्त चौदा वर्षांचा मुलगा !

सारांशानं, या विविध क्षेत्रांतल्या गतिमानतेचा उपयोग करून घ्यावा, पण मर्यादित. त्याची मानवी स्वास्थ्य घालवण्याची क्षमता ओळखून, आपलं आणि निसर्गाचं सहज स्वाभाविक जीवन त्यापासून सुरक्षित ठेवण्याचे उपाय आपणच करणं आवश्यक आहे. गतीनं प्रगती न होता मानवी स्वास्थ्याची अधोगती होत असेल, तर कमी किंवा नैसर्गिक गती परवडेल. शरीरकष्टांत थोडं सुख कमी असेल पण जगण्यात नैसर्गिकता असेल, स्वास्थ्य असेल आणि असल्या शारीरिक आणि मानसिक आजारांना सामोरं जावं लागणार नाही !

१५. कोणतंही कर्म करताना फळाची अपेक्षा ठेवायची नाही आणि कर्म केल्यावर ते अर्पण करायचं. त्यामुळं आपण मुक्त होतो, हे कळतं. पण तसं ठरवलं तरी कर्माच्या फळाचे विचार मनातून जात नसल्यामुळं फळाविषयीच्या चिंता उद्‌भवतात. फळाच्या अपेक्षेतूनही सुटका होत नाही. तेव्हा या अपेक्षा आणि अर्पण करणं, यात येणाऱ्या अडचणींच्या चिंतनातून कसं मोकळं व्हावं, हे कृपया स्पष्ट करावं.

➛ आपल्याला जे मूळ तत्त्व कळलं आहे, ते मुक्ततेला उपयोगी आहे. ते अमलात आणताना ज्या अडचणी येतात त्या इतरांनाही येत असतात. त्याअर्थानं, कळणं आणि तसं प्रत्यक्ष करायला जमणं हे सहसा अवघडच असतं.

त्याची सामान्य कारणं अशी आहेत. पहिलं म्हणजे, आपलं मन नकळत फळ येणार असेल तरच कर्म करायला तयार होतं. त्याची तशी समजूत आहे. ते फळसुद्धा विशिष्ट प्रकारचं यावं, विशिष्ट प्रमाणात यावं असं मनाला वाटतं. जणू ते फळासाठीच कर्म करीत असतं. साध्या परीक्षेतसुद्धा अमुक एक गुण मिळावेत असं वाटत असेल, तर त्यासाठी किती तास अभ्यास करावा लागेल, अशी मनाची विचारणा असते. किंबहुना, आपलीही मनःस्थिती तशीच असते. या पद्धतीनं काम करण्याची मनाला लहानपणापासून आजतागायत सवय आहे. आपण जरी नुसता एवढा विचार केला की, कितीही मार्क मिळूदेत, मी भरपूर अभ्यास करणार. मला मार्क कमी पडले तरी चालतील. असा विचार एखाद्या मुलानं केला तर ते त्याच्याद्दष्टीनं योग्य नाही, असं पालकही त्याला सांगतील आणि ते स्वतःही तसाच विचार करतील.

या पद्धतीनं जगण्याची आपली वर्षांनुवर्षांची सवय नाही का ? त्यामुळं अशा सवयीच्या विरोधात फळाची अपेक्षा न करणं आणि प्रयत्न मात्र करीत राहाणं हा मार्ग मन एकदम कसा स्वीकारणार ? त्यात पुन्हा बुद्धीही आड येते. ती म्हणते की अमुक एक कार्याचा अमुक एक परिणाम होतो, असा जर कार्यकारण संबंध सगळ्या जगात आहे, तर तो या कुठल्या बाबतीत लागू कसा नसेल ? आणि फळाची अपेक्षाच ठेवायची नसली तर मग कर्म कशासाठी करायचं ? अनेक कार्यशील, रजोगुणी माणसांना तर विशिष्ट फळाचं उद्दिष्ट ठेवूनच काम करणं शक्य आहे, असं वाटतं. ते एकवेळ फलत्याग करतील, पण फळाच्या अपेक्षेशिवाय काम करणं त्यांना शक्य होत नाही.

यासाठी, कर्मफळाची 'अपेक्षा न ठेवणं' आणि कर्मांना 'उद्दिष्ट नसणं' यांतला फरक लक्षात ठेवावा. एकदा एखाद्या पदवीसाठी अभ्यास सुरू केला की, पदवी हे त्या अभ्यासाचं उद्दिष्ट झालं. पण फळ नव्हे. म्हणजे असं की, त्या उद्दिष्टामुळं आपल्या अभ्यासाची, दिनक्रमाची, मार्गदर्शन घेण्याची रूपरेषा ठरते. त्यासाठी उद्दिष्ट आवश्यक आहे.

पण हे नीट समजून घेतलं पाहिजे की, अमुक एका पद्धतीनं उद्दिष्ट साध्य करायचे प्रयत्न केले, तरी येणारं फळ हे केवळ त्यावर अवलंबून नसतं. परीक्षेसाठी दिशाबद्ध अभ्यास लागेल. पण तोच करणाऱ्या दोघांना ते आणि तेवढेच मार्क पडतील असं नाही. कारण, प्रयत्नांव्यतिरिक्त फळांवर परिणाम करणारे अनेक घटक असतात.

उत्तम अभ्यास केलेल्या धड्यांवर प्रश्न न येणं, परीक्षेच्या आदल्या दिवशी अचानक अकारण आजारी पडणं, घरात जवळच्या व्यक्तीची काही गंभीर दुर्घटना-अपघात घडणं, जरी परीक्षक न्यायी असले तरी नेमका आपला पेपर तपासताना त्यांच्या काही घरगुती कारणांमुळं ते योग्य

मनःस्थितीत नसणं, त्याचा परिणाम होऊ द्यायचा नाही असं ठरवलेलं असलं आणि त्यावर पुन्हा फेरतपासणीची यंत्रणा असली तरीही त्याक्षणी मानवी मन म्हणून झालेली चूक तशीच राहून जाणं, परीक्षेला सगळं वेळापत्रक सांभाळून जात असताना आणि आपली काही चूक नसताना दुसऱ्या कुणाच्या वाहनचालकाच्या चुकीमुळं आपल्याला अपघाताला सामोरं जावं लागणं - त्यामुळं तो पेपर चुकणं किंवा नीट देता न येणं - अशा असंख्य घटना या कर्मफळावर काम करीत असतात. त्या आपल्या हातातही नसतात.

त्यामुळं विशिष्ट पद्धतीनं सारखाच अभ्यास करूनसुद्धा दोघांच्या कर्मफळात-मार्कांत फरक पडू शकतो, हे आपल्या अनुभवाला येणारं आहे. तीच गोष्ट वाट्याला येणाऱ्या माणसांमध्ये, शेजाऱ्यांमध्ये, विशिष्ट गावी बदल्या होण्यामध्ये, एखाद्या ठिकाणी कमीजास्त काळ राहण्यामध्ये, दुकानात गिऱ्हाईक कमीजास्त होण्यामध्ये, बढतीमध्ये-बदलीमध्ये असते. म्हणून उद्दिष्ट असावं, पण त्याला फळही समजू नये आणि विशिष्ट फळाची अपेक्षाही धरू नये. उद्दिष्टाप्रमाणं उत्तमात उत्तम अभ्यास करणं हेच खरं आवश्यक आणि योग्य काम आहे, हे आता लक्षात येऊ शकेल. इतके घटक ते फळ ठरवीत असतात, हे कळलं तर आपल्या मनातले त्याबद्दलचे विचार आणि अपेक्षाही कमी होतील.

उलट हा विचार करावा की, खरा आनंद एकदा उद्दिष्ट ठरलं,की त्याप्रमाणं कर्मं करण्यात असतो. मुळात कर्मं अपरिहार्य असतातच. ती करण्यात एकदा फळाची अपेक्षा सुटली की, कर्मांवरचे यशप्राप्तीचे ताण उलट निघून जातात. आपण अनेकदा हे पाहिलं असेल की, तुला अमुक एक मार्क पडले पाहिजेत असं म्हटल्यावर मुलाला येणारा ताण- परफॉर्मन्स प्रेशर, त्या मुलाची अभ्यासाची कामगिरी बिघडवतं, तणावामुळं खाली

आणतं. त्याऐवजी, तू उत्तमात उत्तम अभ्यास कर, तुला मिळतील त्या मार्कांत आम्हांला आनंद आहे. अशी भूमिका घेणाऱ्या पालकांची मुलं अभ्यासात अधिक चांगली कामगिरी करू शकतात. तीच अवस्था आपण जर फळाची अपेक्षा सोडली, तर आपल्या आयुष्यातल्या कामगिरीच्या बाबतीत होऊ शकते.

याही पुढं जाऊन, आपल्या संतांनी, ऋषींनी, शास्त्रकर्त्यांनी विचार केला आहे. त्यांना तर कर्मं अशी बिनताणाची, आनंदाची आणि उत्कृष्ट करणं हवंच आहे. पण त्याचबरोबर या पद्धतीनं येईल त्या फळाचासुद्धा स्वीकार नको आहे. फळ तर येईल, पण पुन्हा त्यात नवीन कर्माचं बीज घेऊन येईल. म्हणून, ते कर्मफळही अर्पण करायला त्यांनी सांगितलं आहे. त्यांतलं दुसरं कारण, ही कर्मांची साखळी थांबवून आपल्याला मुक्त करण्याबरोबरच जे फळ असेल त्याचा अहंकार होऊन आपल्या मुक्तीच्या आड तो येऊ नये. कर्म सात्त्विक असलं, फळ सात्त्विक असलं तरी शेवटी साखळी लोखंडाची काय, सोन्याची काय माणसाला बांधणारच. मुक्तीच्या आड येणारच. त्यांना तर आपल्याला या जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्त करायचं आहे. अर्थात, याच देही दैवी, निरुपाधिक आनंदात ठेवायचं आहे. म्हणून त्यांनी फळ अर्पण करण्याचा मार्ग दिला.

पदवी हे फळ झालं. त्यानुसार कामही करता येईल. पण ती पदवी, तिचं मोठेपण डोक्यात शिरणं हा अहंकार झाला. तो पुढं बद्ध करणाऱ्या चुकीच्या मार्गानं नेईल आणि नुकसान करीलच. आता फळ अर्पण करणं म्हणजे, याच उदाहरणानं पाहायचं झालं तर, पदवीचा वापर न करणं किंवा ती टाकून देणं नव्हे. ती भगवंताची कृपा आहे, अनेक घटक अनुकूल होते म्हणून ती मिळाली, असं भगवंताचं अनुसंधान ठेवून

त्या फळाचा, पदवीचा रास्त वापर करणं, म्हणजे ते अर्पण करणं होय. दुसऱ्यानं दिलेली आपल्या गरजेची वस्तू आपण वापरतो पण त्याची म्हणून आणि सर्वांच्या कामासाठी. त्या वृत्तीनं राहील, तर आता कर्मफळही माणसाला बाधू शकणार नाही, मुक्तीच्या आड येणार नाही.

अगदी साध्या प्रपंचातल्या उदाहरणानं पाहायचं झालं, तर मुलाला योग्य शिक्षण मिळावं म्हणून प्रयत्न करणं, खर्च करणं, त्यासाठी स्वतः वेळ पडली तर जादा काम करणं, त्याच्या संगोपनात-संस्कांरात उणीव न ठेवणं आणि त्याच वेळेला पुढं तो आमच्या मनासारखं वागेल अशी अपेक्षा न ठेवणं, हे निरपेक्ष कर्तव्य होय. त्यामुळं पुढं तो कसाही वागला तरी आपला आनंद टिकून राहतो. तेच, एकदा तो स्वावलंबी झाल्यावर आता त्यानं विवाह करावा की नाही, कुणाशी करावा हे त्याचं त्यानं ठरवावं, अशी मनाची तयारी ठेवणं म्हणजे हे फळ भगवंताला अर्पण करण्यासारखं आहे. ते अर्पण नाही केलं, तर आपले किती हाल होतात, याची आपल्याला कल्पना आहे. पण तेच अर्पण केलं, तर तो जे करील त्यात आनंद राहतो. अर्थातच, आपण मुक्त होतो.

हे सारे विचार जर आपण समजून घेतले, तर त्या मार्गानं जाण्यासारखा आनंदाचा-मुक्तीचा सोपा मार्ग नाही, हे मनाला सतत बजावावं लागेल. आजूबाजूच्या अनुभवानं ते मनाला पटेल. आधीच्या मनाच्या सवयी मोडेपर्यंत थोडी सबुरी आणि गुरू करतील ते कल्याणाचं आहे, यावरची निष्ठा आपल्याला उपयोगी पडेल.

हे कठीण आहे हे खरंच, पण अशक्य नाही, असाध्य नाही, हेही तितकंच खरं ! तुकोबांचे अनुभवाचे बोल सतत समोर असावेत, 'असाध्य ते साध्य करिता सायास । कारण अभ्यास तुका म्हणे !' आता निर्धारानं आणि श्रद्धेनं अभ्यासाला लागणं आपलं काम आहे !

१६. आम्ही अनेक कुटुंबांत, नातेवाईकांत, समाजात आणि वेगवेगळ्या काळातही पाहातो की, काही नात्यांत विशेषतः सासू-सुनांच्यामध्ये असलेले संघर्ष, वर्षांनुवर्षं अनेक ठिकाणी तसेच आहेत. उलट, अलीकडं त्यांना अधिक तीव्रता आलेली दिसते. कुटुंब विभक्त झालेली दिसली तरी, या नात्यातले संघर्ष त्यामुळं कमी झालेले आढळत नाहीत. असं का होतं, याला काही मार्ग आहेत की हे असंच राहणार ?

➛ आपलं निरीक्षण बरोबर आहे. हा अनुभव अनेक लोकांचा आहे. त्यात एक गमतीचं वैशिष्ट्यही आपल्याला आढळलं असेल. जिथं आपण दोन - तीन पिढ्या पाहिल्या असतील तर तिथं संघर्ष करणाऱ्या सुना यथाकाल सासू झाल्या आहेत. तरी त्यांचे, त्यांच्या आत्ताच्या सुनांशी तसेच संघर्ष होत आहेत. हेच नातं आणखी एक पिढी पुढं सरकलं तरी, संघर्ष कायमच आहेत !

वास्तविक, ज्या कारणांसाठी आपल्याला त्रास झाला, संघर्ष घडला ती कारणं आपल्याला माहिती आहेत. मग निदान आपल्या सुनेशी वागताना अशा स्वरूपाचा संघर्ष टाळणं, आता सासू झालेल्या सुनांना, का शक्य नसावं ? पण तसं क्वचित घडताना दिसेल.

उलट, संघर्ष मागल्या पानावरून पुढल्या पानावर तसेच सुरू असताना दिसतील. बदलेल काय, तर परिस्थितीप्रमाणं संघर्षांचे विषय. उदाहरणानं बघायचं झालं तर, साधी वेशभूषा घ्या. शंभर वर्षांपूर्वी नऊवारी साड्या नेसणाऱ्या सासूंनी सुनांच्या पाचवारी साड्यांना थेर-उथळपणा म्हटलं. आपापल्या मुलांना त्याबद्दल नावं ठेवली. नंतरच्या पाचवारी साड्या नेसणाऱ्या आताच्या सासूंनी, ड्रेस घालणाऱ्या पुढच्या

पिढीच्या सुनांना नावं ठेवली. मुलांना दोष दिले. आता यापुढं सांगायचं म्हणजे न संपणारी कापूसकोंड्याची गोष्ट होईल !

आता आपण याच्या कारणांकडे वळू. पहिलं एक कारण आहे, ते वयातल्या, पिढीतल्या अंतराचं आहे. साधारणतः पंचवीस पंचवीस वर्षांचं दोघींच्यातलं वयाचं अंतर ही वस्तुस्थिती आहे. पंचवीस तीस वर्षांपूर्वीचा काळ, त्यावेळचं राहणीमान, घरंदारं, गरीबी- श्रीमंती - या साऱ्या गोष्टी तीस वर्षांनंतरच्या सुनेच्या काळात तशाच कशा असतील? जग तर सारखं बदलत राहणार. राज्य बदलणार, कायदा बदलणार, विचार बदलणार, नोकरीचाकरी, शेतीवाडीचं स्वरूप बदलणार. त्याप्रमाणं या तीस वर्षांनंतरच्या माणसांवरचे संस्कार, त्यांची मतं हेही बदलणार. त्यानुसार ते वागणार. मग या वागण्यातला फरक हा काळाचा, परिस्थितीचा असून तो तसाच राहणार ना ?

अडचण कुठं आहे, तर हा बदल आम्हाला कळत नाही, असंही ही मोठी माणसं म्हणणार नाहीत आणि कळल्याप्रमाणं तसं समजुतीनं वागणारही नाहीत. मग संघर्ष होतात. काही लोक हे समजून घेत नाहीत, ते जुन्याचा आग्रह धरणार. ते नव्या पिढीला शक्य राहणार नाही. म्हणून पुन्हा संघर्ष होणार. म्हणजे लक्षात ठेवावं की, दोन्ही बाजूंनी हे जे परिस्थितीतलं, काळातलं अंतर आहे, ते समजून घेण्यानं ते टळू शकेल. अंतर तर कमी करता येणं शक्य नाही. त्यावेळचं वातावरण आज निर्माण करता येणार नाही किंवा आजच्या काळातल्या वातावरणाचे संस्कार काळ मागं नेऊन त्यांच्यावर करता येणार नाहीत. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली, तर या संघर्षाला पर्याय आहेत. संघर्ष टळू शकतात, अन्यथा या अपरिहार्य अंतरांवर ते घडत राहणार. आणि त्या अर्थानं, ते स्वीकारून पुढं जात राहावं लागणार.

यात संघर्षाचं दुसरं कारण महत्त्वाचंच आहे. ते म्हणजे गीतेसारख्या सन्मान्य ग्रंथातल्या शिकवणीपासून आपली माणसं दूर आहेत. गीतेचा एखादा अध्यायच काय, सबंध गीता पाठ करून बक्षीसं मिळवलेल्या सासू - सुना आहेत. पण त्याचा आपल्या जीवनाशी जो निकटचा संबंध आहे, तो जाणून त्याप्रमाणं त्या किती वागतात? यात त्या पिढीचा दोष नाही, जर असंच घडत गेलं, तर पुढच्या पिढीतही संघर्ष असेच राहणार.

उदाहरणार्थ, 'कर्मण्येवाधिकारस्ते...' हे सगळ्यांनाच पाठ आहे. पण, मुलाचं संगोपन, शिक्षण हे आपलं कर्म होतं. त्यानंतर नोकरी, लग्नात मुलीची निवड हे सारे त्या कर्मफळाचे विषय आहेत. त्यात अमुक व्हावं किंवा होऊ नये अशी आपली अपेक्षा नाही, हे निरपेक्ष कर्तव्याचरण. त्याचबरोबर, आपल्या त्या काळच्या प्रपंचकर्माला - वेलीला आलेलं ते फळ आहे. त्यावर आता आपला अधिकार नाही. ते आता भगवंताचं समजून जिची निवड केली तिच्या स्वाधीन करणं, हे फळ भगवंताला अर्पण करण्यासारखं आहे. हा कर्मयोग जो आचरील, तो संघर्षमुक्त आणि अर्थातच आनंदी राहू शकेल. पण हे आचरणात आणायला कोण तयार आहे ? तसा तयार झाला तर संघर्ष होणार नाहीत. तयार नाही झाला तर आधी म्हटल्याप्रमाणं पुढच्या पिढीचे संघर्ष सुरू होतील.

त्यात तिसरं म्हणजे, पुन्हा एक नकळत प्राणिज प्रवृत्ती असलेली स्वामित्वाची भावना. एकच मुलगा, एकीला मुलगा म्हणून आणि एकीला पती म्हणून आपल्या स्वामित्वाचा विषय वाटतो. कुणाचं तरी स्वामित्व वरचढ ठरतं. त्यात कधी सासू सुखाच्या आभासात राहते तर कधी सून जिंकल्याच्या आभासात राहते. स्वामित्व फक्त सुखाचे आभास निर्माण करतं. सुख नव्हे ! स्वामित्वाची भावना त्याज्य आहे हे पटलं आणि ती सोडली तर या संघर्षाला पर्याय आहे. अन्यथा संघर्ष पुन्हा सुरू.

यात चौथं कारण आहे की, श्री रामकृष्ण परमहंस म्हणत तसं प्रत्येकाला आपलं घड्याळ बरोबर वाटतं. तसं झालं आहे. सासूला तिचं म्हणणं, मतं, विचार बरोबर वाटतात. अर्थातच, सुनेचं घड्याळ चुकीचं वाटतं. तेच सुनेला तिचं म्हणणं, मतं, विचार, निर्णय बरोबर वाटतात. ते आधी सांगितलेल्या कारणांसाठी जुळत नाहीत. त्यामुळं दोन घड्याळांत फरक राहतो. तो कधीच निकाली होत नाही. पुरुष एकदा तुझं बरोबर, एकदा तिचं बरोबर असं करीत मध्यम मार्ग काढून दिवस ढकलतात. कुणीतरी कायम असंतुष्ट राहणार हे ते ओळखून असतात. आपल्या घड्याळात कधी काही चूक असू शकेल, दुसऱ्याचं बरोबर असू शकेल, त्याप्रमाणं आपलं घड्याळ लावून घ्यावं लागेल तर दोन्ही घड्याळं सुसंगतपणे चालतील. म्हटलं तर हा संघर्षमुक्तीचा सोपा मार्ग आहे. पण अडतं ते कुणाचं घड्याळ बरोबर धरायचं आणि कुणी आपलं त्याप्रमाणं लावून घ्यायचं - यावर. असं अडतं आहे तोपर्यंत, अर्थात याला मार्ग नाही.

शेवट, सारांशानं लक्षात घेण्यासारखं आहे की, काळाचं अंतर तर तसंच राहणार. त्यामुळं निर्माण होणारे भेदही तसेच राहणार. तेव्हा मूळ प्रश्न मनाचा आहे. काळाचं अंतर मनानं समजून घ्यायचं ठरलं तर, याही प्रश्नाला मार्ग आहे. कालांतली अंतर कालांत पुसता येणार नाहीत पण मनानं पुसता येतात. इतर प्रश्नसुद्धा मन निर्माण करू शकतं आणि सोडवूही शकतं. म्हटलं तर स्वामित्व गाजवताही येतं आणि सोडून देताही येतं. कर्मयोग समजून घेताही येतो, फलत्याग करताही येतो. प्रश्न मनं किती विकसित आहेत, विशाल आहेत, वस्तुनिष्ठ आहेत - हा आहे. मनाच्या विशालतेला कुठलाच प्रश्न, प्रश्न नाही आणि कुठलाच विषय संघर्षाचा नाही !

१७. आपल्याला माणसाचा जन्म देव मिळवण्यासाठी येतो. मग आपण मागच्या जन्मीच देव का नाही मिळवला ?

➛ हा एका लहान मुलाचा प्रांजळ प्रश्न आहे. कदाचित त्याचं उत्तर इतरांनाही लागू असेल, विचार करण्यासारखं असेल.

आपल्याला माणसाचा जन्म देव मिळवण्यासाठी आला आहे, हे आत्ता आपल्याला कळलं असं समजू. तरीसुद्धा देव मिळवण्यासाठी काहीतरी करावं लागेल ना ? त्यासाठी, खरा देव म्हणजे काय, तो मिळवण्याचा मार्ग कोणता, तो मार्ग आपल्याला कोण दाखवील, तो मार्ग दाखवणारे अनुभवी गुरू आपल्याला कुठं भेटतील, त्यांनी आपल्याला सांगितलेल्या गोष्टी - साधनं आपण समजून घेऊन निष्ठेनं करू का - हे सगळे प्रश्न आपल्याला आज पडले आणि आपण आज सोडवले तरी, आपण हा खरा देव मिळवून माणसाच्या जन्माचं सार्थक करू शकू, हे पटतं ना ? मग आज या जन्मी तेवढं केलं तरी खूप आहे.

याचा अर्थच असा आहे की, एकतर मागच्या जन्मी आपल्याला हे कळलं नाही, कळलं असलं तरी ते पटलं नाही आणि त्यामुळं आपण आत्ता जे वर पाहिलं, ते सारं आपण तेव्हा केलं नाही. म्हणून आपल्याला मनुष्याच्या जन्माची ही संधी पुन्हा दिली गेली आहे, हे उघड आहे.

साध्या परीक्षेत पास व्हायलासुद्धा अभ्यास करावा लागतो. नाही झाला, तर आपण नापास होतो. त्याच वर्गात राहतो. तसं हे झालं आहे. पण नापास झालं तरी, पुन्हा पास होण्याएवढा अभ्यास करून आपल्याला पुढच्या वर्गात जाता येतं ना, तसंच आपण आत्ता जरी हा अभ्यास केला तरी, आपल्याला पुढच्या वर्गात जाता येईल म्हणजे देव मिळवता येईल !

१८. अलीकडं दहावी-बारावी किंवा त्याबरोबर येणाऱ्या विविध प्रकारच्या सीईटीज् यांचं प्रस्थ खूप वाढलं आहे. त्या परीक्षांमुळं घरोघरी तणाव निर्माण होताना दिसतात. आम्हाला पालकांनाही ते सहन करावे लागतात. एवढे तणाव का निर्माण होतात आणि ते कसे दूर करावेत ?

➛ याची काही कारणं, पार्श्वभूमी आणि उपाय आपण पाहू. परीक्षार्थींच्या वाढत्या संख्येमुळं विद्यार्थी किंवा पालकच नव्हे तर इतर असंख्य यंत्रणांच्यावरही वेगवेगळ्या प्रकारचे ताण दोन दोन महिने येतात. उदाहरणार्थ, परीक्षा घेणारं बोर्ड, त्याचा स्टाफ, प्रश्नपत्रिका काढण्यापासून त्यांची गुप्तता राखून त्या विद्यार्थ्यांच्या हातात पडेपर्यंत काम करणाऱ्या यंत्रणा, पुन्हा उत्तरपत्रिका परत निघाल्यापासून तपासणी, फेरतपासणी, गुणपत्रकांचं संगणकीय काम, त्याची लाखो प्रकारची छपाई, त्यांत हॉलतिकिटापासून बारकोड, होलोग्राम्स्, लॅमिनेशन - अशा असंख्य यंत्रणा लाखोंच्या संख्येनं राबतात.

यांत पुन्हा शिक्षक, परीक्षकच नव्हे तर विद्यापीठं, पोलीस यंत्रणा, जिल्हाधिकारी, त्यांच्या हाताखालचा महत्त्वाचा अधिकारी वर्ग - अशा अनेक शासकीय यंत्रणासुद्धा या कामाला अक्षरशः जुंपल्या जातात. ही सगळी प्रक्रिया पार पडेपर्यंत अनेकांची झोप उडते. आपण पालक म्हणून किंवा एक त्रयस्थ म्हणून विचार करावा की, या साऱ्या यंत्रणांवरसुद्धा ताण येण्यासारखं या परीक्षेत काही तथ्य आहे काय?

आता ताणाची कारणं पाहू. ताण येण्याचं एक सर्वांत महत्त्वाचं, साधं पण विसरलं जाणारं कारण म्हणजे, ती परीक्षा त्या विद्यार्थ्याच्या आजवरच्या शैक्षणिक वाटचालीतली 'दहावी' परीक्षा आहे. अनेकदा हे

विसरायला होतं की, आजवर नऊ परीक्षा देण्याचा पुरेसा अनुभव त्याला आहे. आठवीनंतर जशी नववी परीक्षा झाली तशीच नववीनंतर दहावी, असं मुळातच त्याच्या पालकांनाही वाटत नाही आणि त्यामुळं मुलांनाही वाटत नाही. खरंतर, जो पहिल्यापासून एकेक करीत नऊ परीक्षा देत आला आहे, त्याला दहावी वेगळी नाही, नवीन नाही. हे लक्षात घेतलं तर, मुळातच अवाजवी ताण घेण्याची गरज नाही, हे लक्षात येईल.

दुसरं कारण असं की, नववीपासूनच असं वातावरण निर्माण केलं जातं की, ती परीक्षा आत्ताच्या परीक्षांसारखी नाही. तिच्यावर मुलाच्या आयुष्याची जणू दिशा ठरणार आहे. वास्तविक, आपल्याला माहिती असतं की, या परीक्षेनंतर त्यानं कुठल्या क्षेत्रात पुढचं शिक्षण घ्यावं, ते ठरवायची एक संधी या परीक्षेच्या निमित्तानं येणार आहे.

तिसरा मुद्दा असा की, आजच्या बदलत्या काळात असं कुठल्या क्षेत्रातलं शिक्षण घ्यायचं ठरवलं तरी, पुन्हा एकदा ते क्षेत्र बदलण्याची संधी आपल्याला मधल्या काळात मिळू शकते. त्यातही पुन्हा एखाद्या क्षेत्रात आपण शिकत गेलो तरी, प्रत्यक्ष आयुष्यात त्याच क्षेत्रात काम करू, अशी परिस्थिती आता उरली नाही. विशिष्ट क्षेत्रातल्या शिक्षणाला विशिष्ट क्षेत्रातल्या संधी असंही गणित आता उरलं नाही. सुशिक्षितांची संख्या आणि त्या क्षेत्रांतल्या संधींची संख्या यांच्यातही काही निश्चित प्रमाण, संबंध उरलेला नाही. हे लक्षात घेतलं, तर इतका ताण आत्ताच घेण्याची गरज नाही.

त्यातली पहिली ताणाची दहावीची परीक्षा. ती जणू काही शिक्षणातली अंतिम परीक्षा आहे, असं मानलं जातं. मग तिच्यासाठी आटापिटा केला जातो. विचार केला तर लक्षात येईल की, हा आटापिटा रास्त नाही कारण ही शिक्षणातली अंतिम परीक्षा नाही. आपल्याला

माहीतच आहे की, बारावीचे मार्क हातात पडले की दहावीचे कुणी विचारीत नाही. आपल्यालाही विसरायला लागतात. अंतिम मानण्यावर हा ताण निर्माण होतो. तो अवास्तव आहे, हे लक्षात घ्यावं.

जे याबाबतीत खरं आहे, तेच पुढं ताणाच्या दुसऱ्या बारावीच्या परीक्षेच्या बाबतीतही खरं आहे. तिथंही पुन्हा त्या परीक्षेतले मार्क, विशिष्ट ठिकाणी जायला उपयोगी पडतीलच याची कुठली शाश्वती नसते. अनेकदा ते पूर्ण बाजूला ठेवले जातात. वेगळ्या प्रवेशपरीक्षा होतात आणि त्यावर प्रवेश मिळतो. कधी ह्या मार्कांचं विशिष्ट प्रमाणात एकत्रीकरण केलं जातं. त्यामुळं, ही परीक्षाही त्या दृष्टीनं शिक्षणातली अंतिम परीक्षा ठरत नाही. ती तशी मानली, तर मात्र मग ताणतणावाला तोंड द्यावं लागतं. हे लक्षात घेतलं, तर असे ताण येणारही नाहीत.

जाताजाता एक मुद्दा लक्षात घेऊन पुढं जाऊ. मुळात, पहिलीच्या परीक्षेपासूनच त्या त्या वेळच्या विषयांची आवड लागणं, अभ्यास करावासा वाटणं, त्यामुळं ज्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणं त्याला उत्तम मार्क मिळणं - ही शिक्षणाची खरी विधायक दिशा आहे. कार्य आहे. अशा आठवी नववीपर्यंतच्या पायाभूत शिक्षणातल्या दर्जाची परिस्थिती पाहावी. ती अनेकदा दयनीय असल्यामुळं, सर्व पास करण्याच्या धोरणाप्रमाणं पाया कच्चा राहिलेले विद्यार्थीही चांगले मार्क मिळवून नववीपर्यंत पुढं सरकत असतात. त्यामुळं, त्या परीक्षा एकदा बाहेरच्या बोर्डाकडं गेल्या की, ताण येतो. तो बोर्डाच्या परीक्षेचा नसून आधी कच्च्या राहिलेल्या अभ्यासाचा असतो. हा ताण आधीपासून दूर करणं, लक्ष घातलं तर शक्य आहे. ताण घेण्यापेक्षा आधीपासून पायाभूत शिक्षणाच्या दर्जासाठी प्रयत्न करणं, हा खरा मार्ग आहे.

दुर्दैवानं, या खऱ्या कामाच्या वेळेला आपण शाळेकडून मिळणाऱ्या

मार्कांवर विसंबून असतो. त्यावेळी अभ्यासाचा दरवर्षी कस पाहात नाही. उलट, तो काळ मुलांच्या मनाप्रमाणं करण्यात, लाड- मनोरंजन, टी.व्ही, मोबाईल, सिनेमा, टूर्स, ट्रॅव्हल्स, वीकएन्डस् - असल्या अभ्यासेतर कामांत घालवतो. म्हणून, हा शिक्षणातला कस कमी असण्याचा ताण साठत जाऊन दहावीला त्याचं ओझं वाढतं. त्या त्या वर्षाला पेलण्यासारखं ओझं न उचलल्यामुळं दुसऱ्या वर्षीपासूनच ते दुप्पट व्हायला लागेल तर नऊ वर्षांनी काय परिस्थिती असेल ? शिवाय, आताचा निकाल हा सार्वत्रिक असल्यामुळं त्याचं दडपण पालकांवरही येतं आणि ते दडपण अधिक वाढून मुलांच्यावरही येतं. यावरचा उपाय उघड आहे. तो पालकांच्याही हातात आहे आणि विद्यार्थ्यांच्याही !

त्यात पुढलं कारण म्हणजे, प्रत्येकाला आपलं मूल जास्तीत जास्त पैसा, प्रतिष्ठा देणाऱ्या क्षेत्रात घालता यावं अशी सुप्त इच्छा असते. मग एखाद्या डॉक्टरांच्या मुलाला नववीपर्यंत साहित्याची, कलेची गोडी असते आणि एकदम दहावीत, बारावीत त्याला बायो आवडायला लागतं. असं पालकही सांगायला सुरुवात करतात आणि मुलंही. तीच गोष्ट इंजिनिअरिंगची - सी.ए.ची आहे. हेतू सुप्त असला, तरी तो सर्वांच्यात प्रभावीपणे काम करीत असतो. त्यामुळं बाहेर पालक सांगतात की, आमचं कुठलं प्रेशर नाही. त्याला त्याच्या आवडीचं करू देत. आता तोच म्हणतो आहे, तर त्याला आपण इंजिनिअरिंगला घालायचं. हेतू सुप्त अशासाठी म्हणायचा की, उद्या इंजिनिअर झाल्यावर नोकरी मिळणार नाही किंवा मिळालीच तर पाच हजारावर काम करावं लागेल. असा सरकारचा, त्या क्षेत्राचा निर्णय झाला तर त्याच्या आवडीचं आता काय होईल, हे आपण ओळखू शकू.

यात कुठल्या क्षेत्राचा प्रश्न नाही. त्या क्षेत्रात जाण्यासाठी जो

मानसिक दबाव आहे, त्याचा प्रश्न आहे. ज्याची त्याची जी कुवत असेल, आवड असेल, कल असेल त्याला त्या त्या क्षेत्रात जरूर जाऊ द्या. पण, या पैसा आणि त्यामुळं मिळणारी प्रतिष्ठा यासाठी त्याला जावं लागू नये. तसं जावं लागलं की मग, हे परीक्षांचे अवाजवी ताण निर्माण होतात, नुकसान होतं. ते टाळण्याचा हा प्रश्न आहे. त्याच्या आवडीच्या कामात मनुष्य अत्यंत तणावरहितपणे, आनंदानं आणि उत्तम कामगिरी करू शकतो.

या परीक्षांचे तणाव वाढण्याचं आणखी एक महत्त्वाचं कारण आहे. आपल्याला साईडसाठी जास्तीत जास्त मार्क हवे असतात. पाया कच्चा आणि परीक्षेचा दर्जा जास्त असतो. त्यामुळं ते भरून काढण्यासाठी खासगी क्लासेस आपल्याला पूर्वतयारी करून घेण्याचं आश्वासन देतात. दहावी सुरू होण्यापूर्वीच सुटीत त्यानं जादा अभ्यास करणं, हे एकवेळ ठीक आहे. पण, या कामाची कुणी असे खासगी तज्ज्ञ जबाबदारी घेत असतील तर पालकांना ते अधिक सुरक्षित वाटतं. त्यातून ही व्हेकेशन बॅच खासगीत सुरू झाली. त्यात आपल्या शाळेतली मुलं जातात म्हणून स्पर्धात्मक पद्धतीनं शाळांनीही आपले सुटीतले क्लास सुरू केले. जादा अभ्यास होण्यात अडचण नाही. पण, इतक्या जलद गतीनं नववीच्या सुटीची विश्रांती न देता दोन्ही पातळ्यांवर अभ्यासाची वेळेपूर्वी अकारण घोडदौड चालू झाल्यामुळं अभ्यासाची पळापळ अलीकडं डिसेंबरलाच संपू लागली आहे. अभ्यास, सराव तरी किती करणार ? त्यामुळं धड अभ्यासाला काही नवीन नाही आणि दोन दोन महिने परीक्षाही नाही. त्यात पुन्हा पूर्वी चार दिवसांत संपणारी अकरावीची परीक्षा, आता दहावी आणि बारावी दोनही वेळा एकेक महिना चालते. हे दोन महिने आणि मधले हे अनेक मोकळे दिवस आधीपासूनचा वर्षभराचा सारा

ताण अगदी टोकाला नेऊन ठेवतात.

वास्तविक, नववी किंवा अकरावीनंतर नेहमीची विश्रांती घेऊन जूनमध्ये सुरू केलेला अभ्यास शांतपणे जानेवारीपर्यंत चालेल. थोडा आवश्यक सराव मधल्या काळात मिळेल आणि लगेच परीक्षा होऊन मुलं मोकळी होतील. आधीपासून सुरू केलेले अभ्यास, नंतरचे क्लास, शाळा, गृहपाठ असे सारे ताणदायक सहा महिने, पुढं एकदम परीक्षा दोन महिने लांब टांगती ठेवून मोकळे आणि हताशपणा आणणारे दोन महिने, विद्यार्थ्यांवर अकारण अतिपूर्वतयारीचा आणि पुढं सक्तीच्या पूर्वपरीक्षांचा दोन महिन्यांचा ताण देतात. त्यावर विचार करणं आपल्याच हाती आहे. अजून तरी, क्लास ही सक्तीची गोष्ट झालेली नाही. विद्यार्थ्यांना अभ्यासात स्वावलंबी होण्यावर अजूनही बंदी नाही, तोपर्यंत तरी विद्यार्थी आणि पालक शांतपणे या दोन्ही परीक्षा चांगल्या तऱ्हेनं, जबाबदारीनं ताणरहितपणे पार पाडू शकतात.

आज असं म्हणण्यामध्ये थोडं वेगळं वाटलं तरी, तसं मानायचं कारण नाही. आपल्या बाजूनं पूर्वी मार्क, मेरिट लिस्टमधला नंबर यांना किती महत्त्व होतं, त्याची कल्पना आपल्याला आहे. स्पर्धेच्या युगाच्या अवास्तव कल्पनांचा तो परिणाम होता. तो नैसर्गिक नव्हता. त्यामधून अनेक मार्गांनी, मेरिटमध्ये स्थान मिळवण्यासाठी बऱ्याच जणांनी प्रयत्न केले. ते इतक्या तणावाचे ठरले की, शेवटी त्यातून वैयक्तिक संघर्ष आणि काही बाबतीत तर विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांपर्यंत परिस्थिती गेली. तेव्हा असल्या स्पर्धा, मेरिट लिस्ट यांना कायद्याची मनाई आलीच ना ? तसंच, या दोन्ही परीक्षांमधल्या अवाजवी स्पर्धात्मकतेवर आणि त्यामुळं निर्माण होणाऱ्या ताणावर काही सामाजिक उपाय होईलच.

याला असे काही उपाय निघणं याला खरंतर मूळ तणावाच्या

प्रश्नावर केलेल्या तात्पुरत्या मलमपट्ट्यांचं स्वरूप आहे. सखोल विचार केला तर,मूळ तणावाची कारणं ही आपल्या स्वतःमध्ये आहेत. आपल्याला अतिरिक्त पैशाचा असलेला लोभ, प्रतिष्ठेची असलेली ओढ, स्पर्धेत कुणाला तरी मागं टाकून जिंकण्याची खुमखुमी, भवितव्याबद्दल वाटणारी काळजी, हानिकारक तुलनांची सवय, असुरक्षिततेची भावना - अशी अनेक कारणं स्वतःमध्ये आहेत. ती असतील तोपर्यंत तणाव राहतीलच.

त्यामुळं, नुसत्या दहावी बारावीचाच नव्हे तर सबंध आयुष्यभर स्पर्धात्मक जगण्याचा तणाव दूर व्हायचा असेल, तर अशी तणावाची मूळ कारणं शोधून काढून ती दूर करणं, हा खरा मूलभूत उपाय आहे. तो हेच नव्हे तर, आयुष्यातले इतर सर्व तणावही दूर करणारा आहे. ते आपण करू शकलो, तर दहा-दोन-तीन काय, अकरा-चार काय, पुढच्या आयआयटी-जेईई काय, जीआरई काय किंवा या शिक्षणाचे स्टेट बोर्ड, सीबीएसई असे कुठले पॅटर्न काय - आपल्याला कशाचाच ताण राहणार नाही.

जर वर म्हटलं तसं, मूळ कारणं दूर करण्याचं पालकांनी स्वतः ठरवलं, मुलांच्यात रुजवलं तर हे शक्य आहे. कुठल्याही परीक्षा असोत, कुठलेही पॅटर्न असोत, भविष्यात नोकरीतले कुठले बढतीचे प्रश्न असोत, ते त्यांच्यावर ताणतणाव निर्माण करणार नाहीत. कुठल्याही उपलब्ध क्षेत्रातलं शिक्षण घेता येईल, पुढची प्रगती करता येईल. हे जमलं नाही तर मात्र प्रत्येक वर्षी, प्रत्येक टप्प्यावर निर्माण होणाऱ्या परीक्षांच्या बदलामुळं येणाऱ्या तणावांना तोंड देत राहावं लागेल.

त्यासाठी वर दिलेले मूलभूत उपाय करू शकलो, तर आपण सर्वच तणावरहित राहू शकू. कारण तणाव देणारे आपल्या मनातले घटकच नसतील !

१९. आमच्या सुनांची माहेरं गावातच आहेत. पहिल्यांदा त्यामुळं एकमेकांना सोपं होईल असं वाटलं. पण प्रत्यक्षात मात्र त्यामुळं उलट अनेक प्रकारचे त्रास वाढले आहेत, असा अनुभव येतो. असं का व्हावं ?

➛ सासर - माहेर या ज्या बाजूनं बघू, त्या बाजूनं वाटणाऱ्या संकल्पना आहेत. मुलीच्या घराकडून पाहिलं तर त्यांच्या दृष्टीनं हे सासर आहे. पण आपल्या मुलाकडून पाहिलं तर मुलीचं घर हेही त्याचं सासर आहे. त्यात पुन्हा याच्याहीपेक्षा वेगळ्या दृष्टीनं पाहिलं तर, माहेर ही थोडी जिव्हाळ्याची गोष्ट असते. असावीही. त्याही दृष्टीनं पाहिलं, तर तुमचं घर मुलाचं माहेर आहे तर सुनेचं घर तिचं माहेर आहे. चांगल्या अर्थानं, दोघांनाही गावात माहेर आहेच. म्हणजे, दोघांनाही जिव्हाळ्याची घरं आहेतच. फक्त खरा जिव्हाळा अशा ठिकाणी असतो की, तिथं आल्यावर आलेल्या माणसाला जिव्हाळा मिळतो. मग आपल्या लक्षात येईल की, या कल्पना सापेक्ष आहेत आणि त्या आपण जितक्या चांगल्या पद्धतीनं अमलात आणू शकू, तितका तो प्रश्न, प्रश्न उरणार नाही.

मुळात, आपण उल्लेख केली ती तुमचं घर आणि सुनेचं माहेर ही दोन इतरांसारखीच कुटुंबं आहेत. साधारणपणे त्यांचं जीवनमान,पद्धत ही एकाच गावात राहिल्यामुळं फारशी वेगळीही नसते. अगदी वंशपरंपरागत किंवा पूर्ण कौटुंबिक संस्कार एवढाच फरक त्यात असू शकतो. तेही अगदी पूर्ण परस्परविरोधी असतात, असंही नाही.

तसे तर फरक शेजारी राहणाऱ्यांच्यात किंवा आपल्या परगावच्या नातेवाईकांच्यातही असतातच. फरक हे फरकच असतात. ही वस्तुस्थिती आहे. फक्त जुळवून घेता येण्यासारखे फरक म्हणजे फार फरक नाहीत,

असं समजायला हरकत नाही. जसं माणूस म्हणजे मत असणार आणि माणूस वेगळा असणार म्हणजे मतांत भेद असणार. तो गृहीत धरला की, भेद नाही. पण अमान्य केला की, मग मतभेद होतात.

आता आपल्या मूळ प्रश्नाकडं वळू. गावातली मुलगी पाहताना किंवा गावातला मुलगा पाहताना अनेक वेळा एकमेकांना जाणं-येणं सोयीचं व्हावं, त्यासाठी वेळ - खर्च पडू नयेत, एकमेकांच्या घरादारांची, नातेवाईकांची माहिती व्यवस्थित मिळावी, इतर कार्य-प्रस्थ, आजारपणं-प्रसंग अशा वेळी एकमेकांना एकमेकांचा पटकन उपयोग व्हावा - अशा अनेक सोयी होतील, असा विचार केलेला असतो. जसा तो आपणही केला असेल. या सोयी आपल्याला प्रत्यक्षात उपयोगी पडल्या असतील, पुढंही उपयोगी पडतील.

असं असताना, हे गावात असण्यामुळं त्रासाचं होण्याचा अनुभव का आला असावा किंवा इतरांनाही तसा का येतो ? त्याची कारणं पाहू. पहिलं म्हणजे, जी गोष्ट आपल्याला सोयीची होईल असं वाटतं, ती त्याच कारणासाठी गैरसोयीचीसुद्धा होऊ शकते, असं आपण गृहीत धरीत नाही. तशी मनाची तयारी ठेवीत नाही.

तसं पाहिलं तर, व्यवहारातल्या प्रत्येक गोष्टीबरोबर थोडी गैरसोय ही नेहमी येतच असते. नुसत्या छापाचं नाणं मिळत नाही. समजा, आपण अर्ध्या मैलावरच्या ऑफिसला पायी चालत जात असू. तर त्यात आपल्याला कुठला खर्च न होणं, जरुरीचा व्यायाम होणं, जाणं-येणं आपल्या हाती राहणं - अशा अनेक सोयी होतात.पण त्याचबरोबर, जायला वेळ जास्त लागणं, चालताना गर्दीचा त्रास होणं, बरोबर जातायेता डबा-मंडई-किराणा असल्या गोष्टी असल्यास त्याच्या ओझ्याचा त्रास होणं इत्यादी गैरसोयीसुद्धा वाट्याला येतात.

आता त्या टाळाव्या म्हणून वाहन घेतलं, तर गैरसोयी टळतात. वेळ वाचतो, वेळेत पोचता येतं. जाता येता अशी ओझी वाहावी लागत नाहीत. इतर कामांना आपल्याबरोबर घरच्यांनाही येता येतं. या सोयी झाल्या खऱ्या. पण म्हणून ते नुसतंच सोयीचं होत नाही. गाडीसाठी कर्ज काढावं लागतं, व्याज जातं, पेट्रोलचा नवा खर्च सुरू होतो. गाडीसाठी सर्व्हिसिंग, दुरुस्त्या, स्पेअरपार्टस् असे अनेक खर्च येतात. त्याचबरोबर अपघाताची एक नवीन शक्यताही त्यात गृहीत धरावी लागते. जीवनाचं स्वरूप हे असं आहे.

माहेर गावात असल्यामुळं जशी प्रसंगाला माणसं पटकन येणार, तशीच सूनसुद्धा मनात आलं की पटकन माहेरी जाऊन येणार. असं तिचं जाणं परगावी असल्यावर कधी वर्ष सहा महिन्यांनी झालं असतं. पण, एक सोय झाली आहे, त्याबरोबर ही गैरसोय स्वीकारणं भाग आहे.

आपल्याला त्रास, तक्रार कुठं उद्‌भवते, तर जवळ असल्यामुळं, जाणंयेणं सोयीचं झाल्यामुळं सून वारंवार माहेरी जाते. ती तिथं काही नुसतं आईवडिलांना नमस्कार करून येणार आहे का ? ती सहज म्हणून का होईना, गप्पांत तुमच्या घरातल्या चार बऱ्यावाईट गोष्टी तिकडं बोलून येणारच. ते त्यांच्या कानावर गेल्याचा आपल्याला त्रास वाटतो. त्यात पुन्हा आपल्याला असा सारखा संशय येत असला की, त्यावर अकारण लक्ष ठेवलं जातं. त्याबद्दल विचारणा केली जाते. अशानं आपले आपापसांतले संबंध बिघडतात. त्यातून मग सून अबोला धरील, पतीच्या कानावर घालील, चिडचिड करील - हे सांगता येत नाही.

त्यात आपण सावध आणि समजूतदार नसू, तर आपल्या बाजूनीसुद्धा आणखी भर पडते. इकडचे सगळे 'रिपोर्टस्' तिकडं जातात. अशा काही कॉमेन्टस् आपल्याकडून केल्या गेल्या, तर आधी निर्माण

झालेल्या गैरसमजात आणखी भर पडते. मग आपल्यालाच नव्हे तर तिला, घरातल्या इतरांनाही त्याचा त्रास वाटतो.

त्यात जास्त त्रासाचा आणखी एक मुद्दा म्हणजे, आपल्या घरात वेगवेगळ्या बाबतीत घेतल्या जाणाऱ्या निर्णयांत माहेरची माणसं सुनेमार्फत हस्तक्षेप करतात. कधी तसं घडतंही. सुनेच्या रोजच्या संपर्कामुळं, घरात वस्तू घेणं, कार्यप्रसंगाला हजर राहणं - न राहणं, आपल्या दोन्ही बाजूंच्या विशेषतः गावात असलेल्या नातेवाईकांशी कमी - जास्त संपर्क ठेवणं, गाडी-घर घेणं, बदलणं - असल्या अनेक लहान - मोठ्या गोष्टींत त्यांच्याकडून हस्तक्षेप होतो आहे, असं आपल्याला वाटत राहातं. त्याचा त्रास होत राहतो.

खरंतर, वस्तुस्थिती नेहमी अशीच असते असं नाही. अनेकदा, माहेरच्या घरच्या संपर्कामुळं, निर्णयांमुळं, ओळखीमुळं आपले लाभही होत असतात, हे लक्षात घ्यावं. आपण लाभ लक्षात ठेवीत नाही आणि कधीतरी होणारा हस्तक्षेप लक्षात ठेवतो, हा आपल्या मनाचा दोष आहे, हे ओळखावं. शिवाय ज्याला आपण हस्तक्षेप समजतो, ढवळाढवळ समजतो ती त्यांनी तशी हेतूपूर्वक केलेली नसते. विषय निघाला म्हणून, त्यांच्या अनुभवाप्रमाणं त्यांनी दिलेला सल्लाही असू शकतो.

हे सारं समजून घ्यायला, आपल्या मनाला तेवढी शांती, समजूत, मोठेपणा हवा ना? तो दाखवला तर, याच नव्हे तर अनेक बाबतींत सुरुवातीला उल्लेख केला तशी मदतही गावात असल्यामुळं आपल्यालाही होईल आणि आपण त्यांनाही करू शकू. त्यासाठी, पूर्वग्रह बाजूला ठेवून प्रत्येक गोष्टीकडं पाहाणं, एकमेकांच्या हिताच्या झालेल्या गोष्टी न विसरणं, एखादी न पटणारी गोष्ट सोडून द्यायची मनाची तयारी ठेवणं - एवढं केलं तर आपला त्रास अवश्य कमी होईल !

२०. मी एक वयोवृद्ध गृहस्थ आहे. आता माझ्या आयुष्याचे शेवटचे दिवस आले आहेत. आयुष्यभर मी सचोटीनं राहण्याचा प्रयत्न केला. आता आयुष्याच्या शेवटी मागं पाहिल्यावर लक्षात आलं की, माझी काही ज्ञात-अज्ञात अशी देणी राहिली आहेत. काही लक्षात आहेत. ती सुमारे दहा हजारांची आहेत. पण ती ज्यांची आहेत असं आठवतं, ती माणसं कुठं आहेत किंवा आहेत की नाहीत, हेही मला माहीत नाही. त्यामुळं ती देता येत नाहीत. शिवाय अनवधानानं माझ्याकडून अजूनही काही राहिली असतील, तर आता मी ती फेडून कशी संपवावी? जेणेकरून मला त्यासाठी पुन्हा जन्म घ्यावा लागू नये किंवा त्याची अपराधी भावना मला जाताना राहू नये.

➢ आपण चित्तशुद्धीच्या दृष्टीनं एक अत्यंत सात्त्विक विचार मनापासून मांडला आहे. त्याबद्दल धन्यवाद. खरं सांगायचं, तर शुद्धतेसाठी इतपत तीव्र इच्छाच आपल्याला शुद्ध करायला पुरेशी आहे. कारण, मुळात कर्मानं किंवा व्यवहारानं मनुष्य पूर्ण शुद्ध होणं अवघड आहे, अशक्य आहे. व्यवहाराला ज्योतीसारखी काजळी लागलेली आहे. त्यामुळं, शुद्धीसाठी भावच अधिक उपयोगी पडतो.

तरीसुद्धा, आपल्याला काही कृती करता येतील. त्यांचा म्हणून काही उपयोग आहेच. पण त्याचबरोबर, त्या करण्यामागच्या आपल्या कृतज्ञतेच्या भावाचा उपयोग शुद्धीकरणासाठी मात्र नक्की होईल. एक करता येईल, जे काही आठ दहा हजार आपल्याला देणं म्हणून आठवतात ते आणि जे आठवत नाहीत त्याप्रीत्यर्थ क्षमापूर्वक आणखी तेवढेच आपल्या आजच्या शक्यतेप्रमाणं दान करावेत.

विस्मरण, तेही आताच्या आपल्या ऐंशीच्या घरातल्या वयामुळं, एकवेळ क्षम्य आहे. मुळात, विस्मरण क्षम्य असतं. पण आठवल्यावर स्मरणपूर्वक न करणं, अपराध असतो. तो टाळण्यासाठी काही प्रायश्चित्ताची, परिहाराचीही तरतूद असते. तशी याबाबतीत, या विस्मरणाप्रीत्यर्थ आधी म्हटलेल्या एकूण दानाच्या दहा टक्के दान प्रायश्चित्तार्थ म्हणून जादा करावं. ते शक्यतो गुप्ततेनं आणि योग्य सत्कार्याला करावं. ते करताना, आठवलेलं अधिक न आठवणारं आणि न झाल्याचं प्रायश्चित्त म्हणून मी हे करतो आहे, अशी भगवंताला मनःपूर्वक प्रार्थना करावी. संकल्पानं त्या गोष्टीला निश्चितता येऊन त्याचा हेतू साध्य होईल.

हे सर्व झाल्यानंतर यातूनही काही त्रुटी, उणीव राहून गेली असेल, तर त्यासाठी आपल्या उपास्य दैवताकडं क्षमाप्रार्थना करावी. अनुताप हा तीर्थासारखा आहे. त्यानं कसलंच पाप-दोष उरत नाही. त्याचबरोबर या क्षमाप्रार्थनेला कुठलंही वैगुण्य दूर करणारं नाम विशिष्ट संख्येनं संकल्पपूर्वक घ्यावं. त्याची संख्या आपल्या आत्ताच्या परिस्थितीतल्या अनुकूलतेप्रमाणं कितीही ठरवली तरी चालेल. फक्त ती अशी ठरवून आणि मनापासून लगेच पूर्ण करावी.

एवढं केल्यावर पुढचा काळ आपण असं देणं पुन्हा होणार नाही व मागं राहणार नाही, याची काळजी घ्यावी. म्हणजे, काही देणं नवीन निर्माण झाल्यास ते तिथल्या तिथं देऊन घ्यावं.

एवढं जर सद्भावनेनं आपण केलं आणि उरलेला काळ नामाला दिला तर आपल्या मुक्तीच्या आड भगवंताच्या कृपेनं काहीही येणार नाही. कारण एवढी जाणीव ठेवणाऱ्याला आणि चित्तशुद्धीचे प्रयत्न करणाऱ्याला मुक्त करणं, हे त्यांनाच आनंद देणारं काम आहे आणि ते, ते काम करतातच !

२१. आजकाल पुढच्या करिअरच्या दृष्टीनं मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांत घालण्याची प्रवृत्ती आहे, वेळी तसा दबावही येतो. आपण अनेकदा मराठी माध्यमाच्या गरजेचा उल्लेख करता. तेही पटतं. अशावेळी काय करावं ?

➛ प्रथम कृपया एक लक्षात घ्यावं की, माझा मराठी माध्यमावर भर आहे, तो मराठी भाषा म्हणून मुळात नसून, मातृभाषा म्हणून भर आहे. उद्या एखादा लंडनला जन्मलेला असेल तर इंग्रजी भाषेचा माध्यम म्हणून आग्रह धरावा.आपण समजून येण्यासाठी मराठीपुरता विचार करू.

आपली सर्वांची मातृभाषा मराठी आहे. मूल जन्माला आल्यापासून त्याच्यावर मराठीतले शब्द कानांवर पडत असतात. खरंतर त्यापूर्वीच्या गर्भाच्या अवस्थतेसुद्धा त्याच्यावर मराठी भाषेत श्रवण करण्याचे संस्कार घडत असतात. मुलं अगदी काही महिन्यांची असल्यापासून आजूबाजूची, कुटुंबातली, येणाऱ्या जाणाऱ्यांची संभाषणं मराठीत नकळत आणि सहजपणे ऐकत असतात.

त्याचप्रमाणं ती बोलायला शिकतात ते शब्दही प्रथम आई-बाबा-दादा-काका-मामा-मामी, असे मराठीतले. त्याचबरोबर त्यांच्याबाजूनं बोलताना मुलंही असे ऐकलेले आणि नकळत घरात वापरात असलेले हेच बाबा-काका-आई असे क्रमानं उच्चारायला सोपे शब्द सहजपणे न शिकता उच्चारतात. त्यांना स्वतःला काही हवं असल्यास तेही दूध-पाणी अशा मराठी शब्दांतूनच सांगतात. त्यांना कडेवर घ्यावं, त्यांना चालायचं आहे, त्यांना खेळणं हवं, त्यांना काही होतं आहे - अशा साऱ्या गोष्टीही ती मुलं आजूबाजूच्या वातावरणात वापरले जाणारे मराठीतले शब्द ऐकून, अगदी सहज लक्षात ठेवून, बरोबर वापरतात.

चालणं-बोलणं-उड्या मारणं-खेळणं- पळणं अशा साऱ्या आनंदाच्या मूलभूत क्रियासुद्धा ती मुलं मराठीतूनच शिकतात आणि त्यानुसार करायचं असल्यास तसं मराठीतूनच सांगतात. मोठ्यांचे एकमेकांच्यात चाललेले वेगवेगळ्या विषयांवरचे संवाद कधी विवाद हेही त्यांच्या कानावर पडतात, तेही मराठीमधूनच !

जरा मोठी झाल्यावर हीच मुलं हे हवं-नको, आवडतं- आवडत नाही, काही करायचं आहे-करायचं नाही - असल्या अनेक गोष्टी व्यक्त करायला लागणाऱ्या शब्दांची वाक्यं बनवतात, तीही मराठीतूनच. ती वाक्यं अनेकदा कुठलंही व्याकरण न शिकता वचन, विभक्ती,प्रत्यय,आदरार्थीबहुवचन,विशेषण,क्रियापद- अशा शिकायला अवघड असलेल्या गोष्टीसुद्धा अगदी दुसऱ्या - तिसऱ्या वर्षाला सहजपणे आणि बरोबर तयार करतात, वापरतात, तीही मराठीतूनच !

त्यांच्या कानावर पडणारे, संस्कार घडवणारे अनेक श्लोक, सुभाषितं, वचनं, पसायदान, अभंग - अशा अनेक गोष्टी कानावर पडून पडून पाठ होतात, पुढं कळतात, त्याही मराठीतूनच. त्यात त्यांच्या वयाला साजेसा एखादा खेळ, हिशेब, आसपासची झाडं-फुलं-फळं-वस्तू-घरंदारं-रस्ते, दुकानं यासारखी अनेक प्रकारची माहिती - अशा अनेक गोष्टी ती घरात किंवा कुणाकडून ऐकतात, शिकतात,वेळेला त्याचा वापर करतात - तोही मराठीतूनच.

आत्तापर्यंत सांगितलेल्या साऱ्या गोष्टी मराठीत घडून आतूनही त्यांचा प्रतिसाद, शब्द, वाक्य, अधिक लक्षात घ्यायचं असेल तर विचारसुद्धा - नकळत मराठीतच घडत असतो. या आणि अशा अर्थानं, मी इथं मराठीला मातृभाषा म्हणतो.

या पार्श्वभूमीवर आपणच विचार करावा की, लहानांच्या ठिकाणी

जन्माच्याही आधीपासून शिक्षणाच्या अगदी मधल्या टप्प्यापर्यंत जी महत्त्वाची भाषेची तयारी आहे, ती सहजपणे इथं मराठीमध्ये आहे. त्यामुळं त्यांना पुढचं कुठलंही शिक्षण घ्यायला जर अंगभूत, सहज आणि चटकन जमणारं माध्यम काय असेल, हे वेगळं सांगायलाच नको! शिक्षणाच्या माध्यमाचा प्रश्न आपणच इतर वेगवेगळ्या कारणांसाठी 'प्रश्न' बनवला आहे ! ज्यातून शिक्षण घेणं सहज शक्य आहे, सोपं आहे ते माध्यम इथंतरी मराठी आहे, हे वेगळं सांगायला नको. अशा स्वतःच्या अंगभूत असलेल्या माध्यमात मुलंही अत्यंत तणावविरहितपणे शिकत असतात. त्यांना त्याच माध्यमात शिकवलं गेलं तर ते कळतंही लवकर आणि पुढं टिकवताही येतं चांगलं.

यामध्ये शिक्षण देणाऱ्यांच्या माध्यमाचाही विचार सहजपणे येऊन गेला आहे. त्यांनाही इंग्रजीतून शिकवणं खरंतर कसरत होते. एकवेळ ते मोठे असल्यानं, तसा सराव करून ती वेळ कशीतरी निभावून नेतील. पण जी सहजता तेही या मराठीत लहानपणापासून वाढले, मोठे झाले, शिकवू शकतात,मुलांना मराठीत सहजतेनं आणि लवकर शिकता येतं, ती सहजता दुसऱ्या माध्यमातून शिकण्यात येत नाही, हे आज आपण बाहेर अनुभवानं पाहावं.

या माध्यमाचा प्रश्न इतका मर्यादित नाही. मनुष्य समाजशील आहे. त्यालासुद्धा परस्पर - संवादाचा मोठा आधार आहे. हा संवाद मुख्यतः एकमेकांच्या भाषेवर अवलंबून आहे. तीच गोष्ट लहान मुलांचीही असते. त्यांनासुद्धा त्यांचं हवं नको, राग लोभ, प्रेम - साऱ्या भावभावना आणि स्वतःचे विचार व्यक्त करणं मातृभाषेतून अगदी सहज शक्य होतं. तेच जर आपण मुळात तोडून टाकलं, तर त्या मुलांचा संवादाचा पूलच आपण उद्ध्वस्त करीत असतो. हे कदाचित आपल्या लक्षात येत

नसेल, तर त्यासाठी आपण आधी आपल्याला दुसऱ्याशी संवाद करताना मराठीत जी सहजता असते आणि स्वाभाविकपणे इतर भाषेत जी असहजता जाणवते, त्यामुळं येणाऱ्या मर्यादा जाणवतात, त्यांच्याकडे लक्ष देऊन पाहावं. त्यावरून मुलांना संवादात त्यांची मराठी भाषा काढून घेतल्यामुळं किती कोंडमारा होत असतो, याची आपण कल्पना करू शकू. अशावेळी त्यांना इंग्रजीची सक्ती करणं म्हणजे लागलेली, वाढलेली, फळं-फुलं आलेली रोपं उपटून टाकून, त्या जागी बाहेरून आणलेली रोपं लावण्याचे प्रयत्न करण्यासारखं आहे.

मग मुलांचा जो कोंडमारा होतो, त्यामध्ये त्यांचा आधी घरातल्यांशी, मित्रांशी, शाळेत शिक्षकांशी आणि समाजात इतरांशी संवाद, सहजता गेल्यामुळं तुटतो आणि फार मोठ्या समृद्ध करणाऱ्या संवादाच्या विश्वाला मुलं मुकतात. अशी मुलं शक्यतो बोलणं टाळतात. फक्त होय-नाही किंवा हसण्याच्या प्रतिक्रिया देतात. कारण, त्यांना काय म्हणायचं आहे,ते म्हणायला त्यांच्याकडं सहजपणे असलेली त्यांची भाषा बोलायला, बंदी झाली आहे. त्यामुळं ती मोकळेपणानं संवाद करू शकत नाहीत, मिसळू शकत नाहीत. हळूहळू आत्मकेंद्रित होत जातात. मग पुढं आपण घरात संवाद हरवल्याच्या तक्रारी करतो, दुःख सोसतो!

यात मुळातच कुठल्या भाषेचा दुराग्रह नसून ज्या मातीत जे पीक सहजपणानं येतं, ते मनमोकळेपणानं, सहजतेनं घेण्याचा प्रश्न आहे. या मराठी माध्यमाविषयी इतरही खूप सांगण्यासारखं आहे, पण मी ते अन्यत्र सांगितलेलं आहे. एखादा लंडनला जन्माला आला असता तर तिथं ब्रिटिश इंग्लिश हे माध्यम जितकं सहज समजलो असतो किंवा वॉशिंग्टनला जन्मलेल्याला अमेरिकन इंग्लिश हे माध्यम जितकं सहज आणि आवश्यक समजलो असतो, तितकंच इथं मराठी माध्यमाबद्दल

समजून घेतलं तरी पुरे आहे.

जागतिक संपर्क भाषा म्हणून इंग्रजीचं महत्त्व आपण जरूर लक्षात ठेवू. शिक्षणात पुढच्या टप्प्यावर योग्य वेळी काही शास्त्रं इंग्रजीत शिकण्याची गरज आहे. तीही समजून घेऊ, त्याप्रमाणं करू. पण त्यासाठी बालवाडीपासून आपण जन्मतः पाहिलेलं, लक्षात असलेलं सफरचंदच लक्षात ठेवू. त्याचं ॲपल करणार नाही. लहानपणी पाहिलेला, खाल्लेला आंबा, आंबा म्हणूनच लक्षात ठेवू, त्याचा मँगो करणार नाही. कारण उघड आहे की, मला सफरचंद किंवा आंबा लक्षात ठेवावाच लागत नाही! उलट ॲपल आणि मँगो मात्र जिकीरीनं आणि कष्टानं डोक्यात लावावे लागतात. अकारण घोटावे, पाठ करावे लागतात !

आपण तरी या माध्यमाच्या आकर्षणात अधिकाधिक का सापडत गेलो, त्याला पुन्हा आपल्या पुढच्या - पैसा, नोकरी, परदेश - अशा स्वप्नांचे लोभ आणि राज्यकर्त्यांनी जाताना मागं हेतुपूर्वक ठेवून दिलेली सार्वत्रिक फोल प्रतिष्ठा आणि शिक्षणपद्धती कारणीभूत आहे, हे आपण ओळखून राहावं. खरंतर, मातृभाषा उत्तम येणाऱ्याला इतर कुठलीही भाषा लवकर आणि चांगली शिकता येते, हे तत्त्व आहे. इंग्रजांना वेगवेगळ्या परिषदा, वाटाघाटी यांत हरवणारे आपले नेते इंग्रजी माध्यमात शिकलेले नव्हते, हे ध्यानी घ्यावं !

यात आता अशा माध्यमाच्या शाळा मिळत नाहीत वगैरे तक्रारी करण्यात येतात, त्यात तथ्य आहे. पण त्यांचे विद्यार्थी बंद झाले, त्याला जबाबदार आपण मराठी माध्यम टाकलं हेच नाही का ? पुन्हा जर कटाक्षानं आपण ते माध्यम लावून धरलं तर आपल्याच मातीतल्या या शाळा पुन्हा उभ्या राहतील, टिकतील. ते कर्तव्यही आपलंच आहे. यापेक्षा या उत्तराच्या मर्यादेत अधिक काय सांगणार !

२२. आपण अनेकवेळा शुद्धीकरणाचा, विशेषतः पैसा, इस्टेट इत्यादीबद्दलच्या संदर्भात उल्लेख केला आहे. त्याचा अधिक खुलासा करता येईल का ?

➛ शुद्धीकरणाचा प्रश्न हा मुळात तसा खूप मूलभूत प्रश्न आहे. आपल्या सध्याच्या अधिक पैसा, चैन, प्लॉट, घरे खरेदी, गुंतवणुकी, संपर्क, माध्यमं, मनोरंजनं - असल्या आपण रमून गेलेल्या जगात तो दूर गेला आहे, अनेकांचा विसरूनही गेला आहे.

खरंतर, तो व्यवहारालाही लागू आहे आणि परमार्थालाही. 'स्वार्थापुढती सुचे न काही, पटेलसा व्यवहार करा !' इथून सुरुवात केली तरी पुढचा मार्ग का गरजेचा आहे ते सापडेल आणि अखेर त्याचा संबंध माणसाच्या जन्माचं सार्थक करणाऱ्या मुक्तीपर्यंत कसा पोचतो तेही लक्षात येऊ शकेल.

मुळात कोणत्याही शुद्धीची गरज का निर्माण होते? तर कुठल्याही व्यवहारात अशुद्धी नकळत शिरते म्हणून. त्याला परमार्थही अपवाद नाही. आपण रोजचं उदाहरण पाहा. गावोगावी पिण्याचं पाणी वेगवेगळ्या मार्गांनी, वेगवेगळ्या साठ्यांतून पुरवलं जातं. वाहती नदी असेल, तिच्यात आपण गटारं, रसायनं, मळी - अशा गोष्टी मिसळत नसू, तर तिचं पाणी प्यायला शुद्ध राहतं. हे चित्र आता आढळणं अनेक कारणांसाठी कठीण आहे, हे आपण जाणतोच.

आता खरंतर नळातनं घरी येणारं पाणी कुठूनही येवो, ते प्यायला काय हरकत आहे, ते पाणीच आहे ना, असं आपण म्हणतो का? तर ते निदान प्यायला योग्य आहे ना बघा, एवढंतरी म्हणतो, पाहातो. याचाच अर्थ त्यात अशुद्धी असते. ते पाणी तसंच प्यालं तर

आपलं पोट बिघडतं, आजार होऊ शकतात. हे आपल्याला जर माहिती आहे, त्यानुसार ज्याच्या त्याच्या शक्यतेप्रमाणं गाळून, उकळून, फिल्टर करून म्हणजेच शुद्ध करून ते प्यायचा आपण आग्रह धरतो. कारण, ते शुद्ध न केल्याचे दुष्परिणाम आपल्याला लगेच भोगावे लागतात. शुद्धीकरण हे असं साध्या व्यवहारापासून आपल्याला माहिती आहे.

पण या साध्या व्यवहारातसुद्धा आपण कधी असा खोल विचार करतो का, की या येणाऱ्या पाण्याचं उत्पादन होत नसतं. पाण्याची पट्टी भरली म्हणजे आपलं काम संपलं, असं कुणाला वाटत असेल. पण ती पाण्याची किंमत झाली. ती तरी प्रामाणिकपणे, शुद्धपणे पिण्याच्या-शेतीच्या, सर्व पाण्याची सर्वांकडून मोजली जात असेल का ? याची उत्तरं आपल्याला माहिती आहेत. म्हणजे येणाऱ्या पाण्याची किंमतसुद्धा मोजण्यात शुद्धी नाही.

मुळात, पाणी आपण फक्त साठ्यावरून उचलतो. निर्माण करीत नाही. असं असेल तर पाणी निर्माण करणाऱ्या निसर्गाच्या दैवी यंत्रणेबद्दल आपण उपकारांची कोणती जाणीव ठेवतो, व्यक्त करतो, त्यासाठी कोणती किंमत मोजतो ? कारण मुळातच, अशा मिळणाऱ्या पाण्याची किंमत मोजली जाऊच शकत नाही...!

व्यवहारात एखाद्या गोष्टीची किंमत करता येईल पण निसर्गाच्या, देवाच्या कृपेची किंमत करता येत नाही. जी गोष्ट आपण अशी आयुष्यभर वापरतो आहोत, त्यातल्या मूळ कृपेबद्दल आपण काहीच केलं नसेल तर ती अशुद्धी सर्वांत मोठी नाही का ? आता हे लक्षात येणं आणि त्यासाठी काय करायचं हे ठरणं, यावर विचार करून ते केलं तर त्या पाण्याचं खरं शुद्धीकरण होऊ शकेल, हे उघड आहे. अन्यथा, अशुद्ध पाण्यासारखाच त्याचाही त्रास होणार, हे सांगायला नको !

अशा जगवणाऱ्या पाणी,हवा,प्रकाश - अशा असंख्य गोष्टींच्या शुद्धीची गरज आहे. आपण या गोष्टी कशा शुद्ध करू शकू, तर थोडक्यात निदान आपण त्या अशुद्ध करणार नाही, त्या मिळाल्या याची जाणीव ठेवू. प्रार्थना-आरती अशा मार्गानं ती व्यक्त करू आणि निदान कृतज्ञता बाळगून तरी त्यांचं शुद्धीकरण करू, मग त्या वापरू.

शुद्धीकरण करून न वापरल्या तर, अशा बाबतीत काय त्रास होईल असं काहींना वाटण्याची शक्यता आहे. पण स्थूल पाण्यातल्या अशुद्धीचे जंतू स्थूल शरीरावर दुष्परिणाम करतात, तसे कृतज्ञतेचं सूक्ष्म शुद्धीकरण न झाल्यास सूक्ष्म अशुद्धीचे परिणाम सूक्ष्मावर म्हणजे मनावर होतात, हे समजून घ्यावं.

आपण रोज जेवतो. ते अन्नधान्य आपण विकत आणलेलं असतं. पण तेही आपण तसंच्या तसं शिजवायला घेत नाही. तांदुळात खडे निघतात. त्यांना पावडर लावलेल्या असतात. अनेक फळांना, भाज्यांना, मुळातच घातक रसायनं, खतं घातलेली असतात. शिवाय वरून पिकवण्याच्या अनैसर्गिक प्रक्रिया केलेल्या असतात. काही भाज्यांना तर बाहेरून मेणापासून पावडरपर्यंत अनेक गोष्टी फासलेल्या असतात. ताजी दिसावी, तुकतुकीत दिसावी म्हणून अशा गोष्टी केल्या जातात.

आता हे ज्याला माहीत नाही, तो कदाचित तांदूळ,डाळ, भाज्या, फळं - तसंच्या तसं खात राहील, शिजवीत राहील. कालांतरानं त्याचे आतड्यांवर, पचनावर झालेले परिणाम त्याच्या वाट्याला आजारपण देतील. हे सारं ज्याला माहिती असेल, तो तांदूळ, गहू, डाळ,भाज्या, फळं सारं निवडून, धुऊन म्हणजे शक्य त्या मार्गानं शुद्ध करून घेईल. मग शिजवील, वापरील. अर्थातच, या साध्या शुद्धीकरणानंसुद्धा त्याचा संभाव्य आजार, नुकसान टळेल.

हे साधं शुद्धीकरण आपल्या व्यवहारात आधीच आहे. नसेल तर ते आणण्याची गरज आहे, हे आपल्याला पटतं. पण त्याचबरोबर आपल्यापर्यंत आलेल्या या शेतीतल्या घटकांचं शुद्धीकरण एवढ्यापुरतंच मर्यादित नाही, हे थोडा पुढं जाऊन विचार केला तर लक्षात येऊ शकेल. क्षणभर विचार करावा की, बाजारात आपण त्या वस्तूंची दिलेली किंमत तिथं ठरल्याप्रमाणं असते. पण याचा अर्थ, नुसत्या किंमतीच्या बाबतीतसुद्धा ती किंमत रास्त असेल असं नाही, अनेकदा नसतेच. कारण मूळ जो शेतकरी ते पिकवतो त्याच्याकडं राबणाऱ्या मजुरांवर अन्याय झाला असेल, अडतबाजारात शेतकऱ्यावर अन्याय झाला असेल. अनेकांच्या श्रमांचं रास्त मूल्य त्यांना दिलं गेलं नसेल. आपल्याला आपण केलेल्या कामाचं रास्त मूल्य मिळालं नाही तर आपण काम सोडीत नाही, पण ते मूल्य न देणाऱ्याला आणि पिळवणूक करणाऱ्याला मात्र मनातून दोष देतोच. अन्नाच्या बाबतीत अशा अनेक टप्प्यावर बाजारभाव पाडून, साठेबाजी करून, मजुरांना - शेतकऱ्यांना नाडून, आपल्यापर्यंत आलेल्या अन्नाबरोबर इतक्यांचे शिव्याशापही येत असतात. ते अशुद्धी आणल्याशिवाय कसे राहतील ?

बरं, आपल्याला त्यात नक्की कुणावरच्या अन्यायानं किती अशुद्धी झाली याची कल्पनाही येत नाही. म्हणून रोजच्या अन्नातलंसुद्धा अन्न अतिथीला देण्यानं, पक्ष्यांना देण्यानं, मूठभिक्षा घालण्यानं - या अशुद्धीचा काही प्रमाणात परिहार होतो. मग शुद्ध अन्न, वासना शुद्ध करायला मदत करू शकतं. यांतलं काहीच केलं नाही, तर मग अन्नवासनाच नव्हे तर इतर वासनांच्या रूपानंसुद्धा ही अशुद्धी येते. म्हणून, 'त्यक्तेन भुंजीथाः' असं म्हटलेलं आहे. शुद्धीकरण ही एक प्रकारची व्यक्तीला मुक्त करणारी आणि सामाजिक संतुलन साधणारी यंत्रणा आहे.

आणखी एक विचार जाता जाता करावा. आपल्या उत्पन्नाच्या प्रमाणात आपल्याला कर भरावा लागतो, याची आपल्याला कल्पना आहे. सर्व सामाजिक यंत्रणा उत्पादक नसतात. शिवाय अनेक घटकांना उत्पन्नच नसतं. या सर्वांसाठी हा कर घेऊन एक प्रकारे सरकार आपली शुद्धीच करीत असतं. ती शुद्धी मर्यादित आहे, कायद्याची आहे. पण आपण विचार करीत आहोत ती शुद्धी मात्र व्यावहारिक आहे, संतुलनात्मक आहे आणि पारमार्थिक कल्याणाचीही आहे.

आता इतर काही शुद्धींचा विचार करू. आपल्या घरात पाणी येतं. तसाच नोकरीधंद्यातून पैसाही येतो. पाण्यातल्या अशुद्धीनं पोट बिघडतं म्हणून आपण ते शुद्धीकरण करून वापरतो. पण या पैशाच्या पाण्याचं शुद्धीकरण करण्याचं, त्याच्या प्रमाणाचं फारसं कुणाच्या मनात येत नाही. अनेकांची समजूत तर आपण कष्ट करून पैसा मिळवतो, मग त्याच्या शुद्धीकरणाचा प्रश्न कुठं येतो, अशी आहे.

वास्तविक, जिथं ज्यांची नोकरी करतो तिथले व्यवसाय, त्यांतल्या नफ्याच्या पद्धती, गैरमार्गांतला त्यांतला पैसा, तिथं मुळातच असलेली अशुद्धी, शुद्धीकरणाचा अभाव, काहीवेळा अनेकांचे शिव्याशाप घेऊन जमा केलेली संपत्ती, मिळणाऱ्या पैशाच्या मानानं आपण केलेल्या कष्टांतले दोष, तफावत - यांतूनच आपला पगाराचा पैसा येतो. मूळ टाकीतच पाणी गढूळ असावं आणि ते आपण कष्टाचं समजून का होईना, तसंच प्यावं, तसा हा प्रकार आहे. गढूळपणाचा त्रास हा होणारच. ज्याठिकाणी मुळातच सट्टेबाजी, फसवणुकी, लॉटरीसारखा बिनकष्टाचा पैसा - असल्या अशुद्धी आहेत, तिथं तर या अशुद्धींचं प्रमाण किती असेल याची कल्पनाच करावी.

पैसा हा स्थूलही आहे आणि संकल्पना म्हणून सूक्ष्मही आहे.

त्यामुळं, त्याच्या अशुद्धीचे परिणाम व्यसनं-आजारपणं-अकारण पैसा जाणं-फसवणुकी होणं, इत्यादी स्थूल मार्गांनी दिसतील. तर त्याच्या सूक्ष्मतेचे परिणामही पुढची पिढी नसणं, असल्यास अकार्यक्षम होणं, असाध्य व्याधी जडणं, मन सतत अस्वस्थ राहणं, डिप्रेशन येणं - अशा मेंदूच्या, खरंतर मूळ मनाच्या, बिघाडांनी झालेले दिसतील. म्हणून, पैशाच्या शुद्धीकरणाच्या बाबतीत सावध राहणं आपल्याच स्वास्थ्याचं आहे, शिवाय त्यात कुटंबाचं, समाजाचं स्वास्थ्यही राहतं.

तीच गोष्ट अधिक जास्त प्रमाणात स्थावराच्या बाबतीत आहे. त्यात इनाम जमिनी वाट्याला येणं, एका घराची गरज असताना पैशाच्या लोभानं प्लॉट-घरं, गुंतवणुकी म्हणून घेऊन ताब्यात ठेवणं, हे म्हणजे मूलतः कुणाच्याच नसलेल्या निसर्गसंपत्तीवरचं अतिक्रमण आहे. संचयानं संचय वाढतो. लोभानं लोभ. यांतली अशुद्धी तर खूपच असून ती माणसाला वर उल्लेखलेले धक्के विशेषतः उत्तरायुष्यात फार देत राहते. शेती वडिलोपार्जित असेल, मुलगा ती तशीच कसत असेल तर त्याला पुढं मिळणाऱ्या उत्पन्नाच्या प्रमाणात शुद्धीकरण पुरे.

यांतल्या शुद्धीकरणाची गरज ज्यांना पटलेली आहे आणि ज्यांनी ते केलं आहे, त्यांना अर्थातच त्याचे चांगले परिणामही अनुभवाला येत असतात. त्यांतला सर्वांत मोठा लाभ म्हणजे शांत, निश्चिंत, समाधानी जीवन. म्हणून, जरी प्रत्यक्ष व्यक्ती आणि विषयपरत्वे शुद्धीकरणाचं प्रमाण बदलत असलं तरी सर्वसाधारण म्हणून काही अनुभवसिद्ध प्रमाण पुढं दिलं आहे. उदा. कमी म्हणजे आजच्या दहा हजाराच्या पगाराला पाच टक्के, त्यापुढ्च्या पगाराला दहा टक्के. बिनकष्टाच्या प्रारब्धातल्या पैशाला पंचवीस ते पन्नास टक्के.

अनेकदा, देवस्थानचे पुजारी, सेवेकरी म्हणून जमिनी इनाम

मिळतात. एकदोन पिढ्या ते काम करतात. त्यांना त्या व्यतिरिक्त उत्पन्न नसतं, म्हणून त्या काळी सेवा करता यावी म्हणून केलेली ती सोय असते. अनेकदा पुढची पिढी त्यात नसते. ती पिढी अनेकदा गाव सोडून जाऊन दुसऱ्या गावी चांगल्या नोकऱ्या करून घरं बांधून राहिलेली असते.जमिनीही कुणीतरी दुसरंच कसत असतं. अनेकजण फक्त वार्षिक उत्सवापुरते जाऊन येतात, आपली वहिवाट-हक्क कायम ठेवतात.

खरंतर आपण जे काम करीत नाही, त्याचं संपूर्ण मूल्यच अशुद्ध आहे. त्यामुळं जो कोणी सेवा करीत असेल, जमीन कसत असेल, त्याची त्याला ती देऊन टाकणं हीच शुद्धी ! पूर्वी उत्पन्न वापरलं असेल तर, त्याच्या शुद्धिप्रीत्यर्थ दान करावं लागेल ते वेगळंच.

अशी ही शुद्धीकरणाची वस्तुस्थिती आपल्या जीवनाच्या सर्व अंगांना लागू आहे. काळ बदलला म्हणून शाश्वत सत्यं बदलत नाहीत. आपण शेती करा, नोकरी करा, उद्योग करा, सिनेमात काम करा,कलाकार असा, पौरोहित्य करा, परमार्थ करा - प्रत्येक ठिकाणी त्या त्या पद्धतीनं शुद्धीकरण लागूच आहे. काळानुसार कसं, किती, कोणत्या पद्धतीनं करावं या तपशिलांत काही फरक पडतीलही. पण मूळ शुद्धीकरणाच्या गरजेचं शाश्वत सत्य बदलत नाही. ते न केल्याचे स्थूल, सूक्ष्म परिणामही बदलत नाहीत. आपण आपला अनुभव पाहावा, इतरांचे अनुभव पाहावेत, म्हणजे आपल्याला याची सत्यता अधिक कळून येईल.

प्रपंच असो, परमार्थ असो, दोन्हींतही आपल्याला शांती हवी असेल, खरं समाधान हवं असेल, तर हा शुद्धीकरणाचा मार्ग विचारपूर्वक गांभीर्यानं घ्यावा, चालावा. आपलं ऐहिक आणि पारलौकिक कल्याण आपणच साधावं, ही शेवटी नम्र प्रार्थना !



परिशिष्ट

प्रश्नोत्तरांच्या जिज्ञासूंसाठी
'उत्तरायण'च्या पूर्वीच्या दोन भागांतील प्रश्न

उत्तरायण - भाग :१

प्रश्नानुक्रम...

१. साधनेची ओढ लागलेली आहे, पण प्रापंचिक जबाबदाऱ्याही आहेत. जोडीदाराचा विरोध नसला तरी अनुकूलताही नाहीये.या प्रसंगाचा कसा सामना करावा, जेणेकरून दोन्ही गोष्टी साध्य होऊ शकतील ? ...१३

२. मुलांनी जप करणं योग्य आहे का ? या वयात त्याची गरज आहे का ? ...१४

३. जगात दु:ख का दिसतं ? सगळे प्रापंचिक लोक त्याबद्दल तक्रारी का करीत असतात ? परमेश्वरानं एवढं दु:खमय जग का निर्माण केलं आहे ? प्रपंच नाही केला तर चालेल का? परमार्थात भाव हा शॉर्टकट आहे का ? ...१५

४. परमार्थाला लागल्यावर प्रपंचातली काही माणसं, संबंध दुरावतात हे का व कसं ? ...२१

५. भगवंताचा शोध घेताना अनेक मार्ग सांगितले जातात. त्या मार्गांपैकी एक मार्ग म्हणजे मीचा शोध (आत्मशोध) हा आहे का ? त्या मार्गात कोणकोणत्या पायऱ्या आहेत ? सर्वसाधारण साधकाला या पायऱ्यांवरून जाता येईल का ? येत असल्यास कसं जाता येईल ? साधक बरोबर मार्गावरून जातो आहे याच्या खुणा त्याला पडताळून पाहाता येतात का ? ...२९

६. लहानपणापासून देवाची आवड आहे, श्री महाराजांचं वाचायची आवड आहे. पण माझे माझ्या बाबतीतले सर्व निर्णय चुकीचे झाले याला काय कारण असावं ? ..३१

७. सद्‌गुरू कृपा करतात म्हणजे काय करतात ? ..३३

८. देवांच्या जुन्या फ्रेमचं काय करावं ? त्या खराबही होतात व टाकण्याचीही भीती वाटते. ..३४

९. आजवरचं आयुष्य मी चुकीच्या पद्धतीनं घालवलं. आता वय झालं आहे. उरलेल्या थोड्या आयुष्यात उद्धार होईल का व कसा होईल, याची चिंता लागते. काय करावं ? ..३५

१०. आत्मज्ञान झाल्यावर माणसाच्या जीवनात कोणते बदल होतात ? ध्येय, कार्य, बुद्धीच्या विविध क्षमतांत काय बदल होतो ? देहबुद्धी नाहीशी झाल्यामुळं झोपेची गरज किती असते ? भूक लागते का ?..३६

११. संसारातील खरेदीकडं बघण्याचा दृष्टिकोन काय असावा ? ..३८

१२. ईश्वराच्या इच्छेनं सर्व घडत असतं, आपला हात लागतो इतकंच. अशा स्वरूपाचंही श्री महाराजांचं वचन आहे. या वचनाशी आपल्या दैनंदिन कर्तृत्वाचा मेळ कसा घालावा ? ..३९

१३. माझा जप संतछायेत आल्यावर होतो, पण घरी होत नाही, ही मानसिकता कशी बदलेल ? ..४०

१४. कृपा झाली हे कसं समजावं ? ..४०

१५. श्री महाराजांनी श्री दत्तगुरूंचं मंदिर बांधलं, त्याच्या शेजारी नृसिंहाची स्थापना केली याचा उद्देश काय असावा ? ...४१

१६. ईश्वरी कृपा होणं म्हणजे नक्की काय ? ती कोणावर होते ? पारमार्थिक वाटचालीत मानवी प्रयत्नांचं महत्त्व किती ? ...४३

१७. आणीबाणीचे प्रसंग, युद्ध, बाँबस्फोट इ. प्रसंगी साधकाची भूमिका काय असावी ? ...४५

१८. मृत्यूची भीती काढून टाकायला नामस्मरणाचा कसा उपयोग करून घ्यावा ? ...४७

१९. जोपर्यंत एखादी गोष्ट अमुक तऱ्हेनं घडून यावी असं वाटतं आहे तोपर्यंत व्यवहारानं योग्य प्रयत्न करणं जरूर आहे. या महाराजांच्या वचनाचा अर्थ कसा लावावा व त्यात कोणतं कर्तृत्व अभिप्रेत आहे? ...४९

२०. विद्यार्थ्यांना अभ्यास करताना नेहमी एकाग्रतेविषयी सांगितलं जातं. मग तसंच नाम घेणाऱ्याला जपाच्या गुणवत्तेबद्दल का सांगितलं जात नाही ? ...५०

२१. सत्याचा मार्ग धरून जर चाललं तर व्यवहाराशी सांगड घालणं अवघड जातं. यासाठी काय करावं ? ...५२

२२. साधना कशासाठी करायची असते ? ...५४

२३. जगामध्ये चांगली स्थिती येणं हे कधी होणारच नाही का ? हे अशक्य आहे का ? ...५५

२४. जर असं असेल तर सामाजिक कार्याला काही महत्त्व आहे का ? ...५५

२५. आपल्याला कुणी नमस्कार करीत असेल तर काय करावं ? ...५६

२६. विकारांचं आपल्या जीवनातलं स्थान काय ? ...५७

२७. श्री गोंदवलेकर महाराजांचं नामाचं प्रेम प्रचंड असतानाही त्यांनी त्यांचा एका शब्दातला परमार्थ 'सावधानता'असा का सांगितला ?...५९

२८. एकच नाम घेतल्यानं ते खोलवर जातं व मुरतं असं म्हटलं जातं. मग संतछायेतील उपासनेच्या वेळी आपण वेगवेगळी नामं घेण्याचा हेतू स्पष्ट करावा. ...६०

२९. योगमार्ग, भक्तिमार्ग सर्व मार्ग परमेश्वराकडंच नेतात. योगमार्गात दिवसेंदिवस शरीर बळकट होत जातं. पण भक्तिमार्ग हा प्रभावी असूनही कुठल्यातरी कारणानं भक्तिमार्गात देहभोग सोसावे लागतात. या देहभोगांना भक्तिमार्गात काही संरक्षण नाही का ? ...६१

३०. परमार्थमार्गावर अर्ध्यावर गेल्यावर पुढं जाणारे साधक फार थोडे असतात, असं श्री महाराजांनी म्हटलं आहे. यामध्ये अर्धा टप्पा कुठला आणि त्यापुढं जाण्यामध्ये कोणते अडथळे असतात ? ...६४

३१. प्रार्थनेला मोठं महत्त्व आहे असं म्हणतात. दुसऱ्याचे आजार बरे व्हावे म्हणून, व्यसन सुटावं म्हणून प्रार्थना करावी का ? अशी दुसऱ्यासाठी प्रार्थना केल्यानं नामसाधना करणाऱ्या व्यक्तीची नामसाधना खर्ची पडते का ? ...६५

३२. साधनेत प्रगती होते की नाही हे कसं कळतं ? ...६६

३३. शिक्षणपद्धतीची सद्य:स्थिती लक्षात घेता शिक्षणाबद्दल
विद्यार्थ्यांची व पालकांची भूमिका काय असावी ? ...६७

३४. भावाचा भावनिकतेशी कितपत संबंध आहे ? ...६८

३५. प्रपंच हा मोठा प्रश्न असून त्याचं निश्चित उत्तर कधीच सापडत नाही
व सोडूनही देता येत नाही. प्रपंचाच्या अशा उत्तर न मिळालेल्या
प्रश्नामुळंच आपण अपयशी ठरतो. अशा वेळी काय करावं ? ...६९

३६. मी काही दिवस एक नाम घेतो त्यानंतर नाम बदलतो. पुन्हा काही
दिवस ते नाम घेतो. त्यानंतर पुन्हा दुसरं नाम घ्यावं असं वाटतं.
हे योग्य आहे काय ? ...७०

३७. नामस्मरण करीत असताना नाम चालू आहे हे जाणवतं. पण
त्याचवेळी मनोव्यापारही चालू असतो, असं जाणवतं. या दोन्ही
गोष्टी मनाच्या कोणत्या स्तरावर चालू असतात आणि हे
मनोव्यापार क्षीण होण्यासाठी काय करावं ? ...७१

३८. आम्हाला आपल्यासारखं होता येईल का ? त्यासाठी काय करावं ?
काय करू नये ? ...७२

३९. अनेक वर्षं सत्संगात राहूनही साधनेशिवाय, नामाशिवाय माझं अडतंय,
असं वाटत नाही. कल्पनेत मात्र नाम म्हणजे सर्वस्व असावं असं वाटतं.
पण तशी कृती घडत नाही. यासाठी काय करावं ? ...७३

४०. प्रपंचात नेहमी न केलेल्या उपासनेशी निगडित अपराधीपणाची
भावना असते. त्यासाठी काय करावं ? काय करू नये ? ...७६

४१. नामस्मरण काही वेळा खूप चांगलं होतं, काही वेळा ते चांगलं होत नाही.करणारे आपणच असूनही असं का होतं ? ते चांगलं व्हावं म्हणून काय करावं? ...७७

४२. प्रत्येकाला जीवनात अध्यात्माची गरज आहे काय ? असल्यास ती का आहे ? ...७८

४३. साधन करताना येणारे अनुभव खरे असतात का ? ...८०

४४. समाजात व्यवहार करताना प्रत्येकाचं व्यक्तित्व जाणण्याची गरज आहे का ? ...८१

४५. संतनमनमालेमध्ये पाचव्या ओवीत महाभूते आणि जाणीव एकचि आहे असं म्हटलं आहे, त्याचा अर्थ स्पष्ट करावा. ...८२

४६. बहुसंख्य बुद्धिमान व्यक्तींनी आत्मज्ञान करून घेतल्याचे दाखले इतिहासात सापडतात. उदा. विवेकानंद, समर्थ, ज्ञानेश्वर माउली, गुरुदेव रानडे, श्री महाराज इ. असं असूनही अडाणी माणसाला परमार्थ सोपा असं श्री महाराज का म्हणतात ? ...८३

४७. देव किंवा गुरू यांच्या फोटोकडं पाय करून झोपू नये असं म्हणतात, ते खरं आहे का ? ...८४

४८. झाडांना भावना असतात हे विज्ञानानं सिद्ध केलेलं आहे. त्यांच्यात भावना विकसित झालेली आहे का ? जर भावना विकसित झालेली नसेल तर त्यांच्यात स्पर्धा, द्वेष अशा गोष्टी कशा असतील ? व मग आपण 'सृष्टिसंदेश'मध्ये म्हणतो तसे संदेश ती कसे देऊ शकतील ?...८५

४९. उपासनेत किंवा वृत्तीत स्थिर होणं म्हणजे काय ?
स्थिर झाल्याची लक्षणं कोणती ? ...८६

५०. कृमी, कीटक, मुंग्या, डास आपल्याकडून अजाणतेपणी मरतात
याबद्दल काय करावं ? ...८७

५१. देहबुद्धी कमी करण्यासाठी नेमकं काय करायला हवं ? ...८९

५२. प्रपंच आणि परमार्थ विरोधी आहेत काय ?
सामान्य प्रापंचिकांचा परमार्थाला विरोध का असतो ?
त्यांनी ती म्हातारपणची गोष्ट का ठरवली आहे ? ...९०

५३. जीवनात प्रपंच आणि परमार्थाची सांगड का व कशी घालावी ? ...९४

५४. सृष्टीची, गुरुपदाची, विश्वात्मकाची इ. नव्या विविध आरत्या
करण्यात काही विशेष कारण आहे का ?
उपासनेसाठी त्याचा उपयोग कसा करता येईल ? ...९५

५५. शरीराला दुखापत झाल्यामुळं सारखा त्रास होऊ लागला. त्यावेळेला
एकदम 'देहेदु:ख ते सुख मानीत जावे' हा मनाचा श्लोक आठवला.
तर अशा देहदु:खाच्या वेळेला सुख कसं मानावं ? ...९६

५६. साधना करीत असताना सुटलेल्या वासना पुन्हा
चिकटण्याची शक्यता असते का ? ...१००

५७. आपल्या इथले संस्कार पाहाता, बाहेरील चंगळवादी,
भोगवादी परिस्थितीशी आम्ही कसं ॲडजेस्ट व्हावं ? ...१०१

५८. मंदिराची गरज आहे की नाही ?
आणि मंदिरांमुळं एवढे गोंधळ का दिसतात ? ...११३

५९. आत्मज्ञानासाठी सद्‌गुरूंची आवश्यकता आहे की नाही ? ...११५

६०. गुरुकृपा हा प्रयत्नाचा विषय की प्रारब्धाचा ? ...११६

६१. वृद्धत्वाची तयारी कशी करावी ? ...११७

६२. दुश्चित्तपणा म्हणजे काय ? ...११८

६३. घरात अनेक देव झाले असल्यानं त्यांची पूजाअर्चा नीट
होत नाही. रुखरुखही वाटते. अशा वेळी काय करावं ? ...१२१

६४. मुलांनी उपासना करावी का ? असल्यास का ?
व तिचं प्रमाण किती असावं ? ...१२२

६५. इच्छा नसताना अनेक गोष्टी कराव्या लागतात,
अशा वेळी मनाची भूमिका काय ठेवावी ? ...१२४

उत्तरायण - भाग : २

प्रश्नानुक्रम...

१. स्वत:च्या तसंच इतरांच्या आजारपणाकडे कसं बघावं ? त्याचा आपल्या परमार्थाला अनेकदा अडथळा वाटतो हे बरोबर आहे का ? आजारपणाचा परमार्थाला काही उपयोग करून घेता येईल का ? ..१३

२. उपाधी म्हणजे काय?आपण जसजसे सगुणाची उपाधी वाढवीत जातो तशी आपली उपाधी कमी कमी होत जाते,असं महाराजांचं एक वचनआहे, त्याचा अर्थ काय ? ..२२

३. साधना करण्याचं महत्त्व पटलं असूनही ते करताना त्यात सातत्य रहात नाही, त्यासाठी काही उपाययोजना करावी का ? कोणती करावी ? ..२७

४. आपल्या साधनेची चर्चा पूर्णपणे टाळावी का ? ..३३

५. प्रपंचात मुलाचा आजार बरा व्हावा,नोकरी लागावी, घर व्हावं, लग्न व्हावं असे अनेक नवस आपण करतो. बऱ्याच वेळा देव त्या गोष्टी देतोही. पण परमार्थात माझा मीपणा कमी व्हावा, माझी वृत्ती आवरली जावी, माझा अहंकार कमी व्हावा, तुमच्या पायी रहावं अशा रीतीनं भगवंताला मागितलं असता ते मात्र या मानानं होताना दिसत नाही किंवा त्याला फार वेळ लागताना दिसतो. असा फरक आहे का ? ..३५

६. मोक्षप्राप्तीच्या परीक्षेचा निकाल किती कडक लागतो ? त्याचं पासिंग पर्सेंटेज किती आहे ? ..३७

७. एखाद्या ग्रंथाची साधकानं हस्तलिखित प्रत केली असेल तर त्याची पुढील व्यवस्था काय करावी ? तो समाधिस्थळी अर्पण करावा का ? त्यावर आपला नामोल्लेख करावा का ? ..३८

८. चांगल्या चांगल्या गोष्टी, विचार वाचनात आले की, ते मला लोकांना सारखे सांगावेसे वाटतात, हे योग्य आहे का ? अशा वेळी काय करावं ? ..३९

९. हे सर्व जग हे मायाजाळ आहे, हे सर्व कळतं, ते सोडून संन्यास घ्यावा वाटतो. पण पुढं याची जाणीव होते की, आपली कर्तव्यं आपल्याला पार पाडायची आहेत.विषयातून पूर्ण बाहेर पडणं हेही हेही अशक्य वाटतं. अशा अवस्थेत काय करावं ? ..४०

१०. संत मोक्षप्राप्त असतात. त्या संदर्भात पुनर्जन्म, अवतार, अंश असणं, संतत्व येणं यांतला फरक कोणता ? ..४२

११. मृत्यू ही अटळ बाब आहे. आपल्या बरोबरच इतर संबंधित सर्वांचाही मृत्यू अटळ आहे, हे लक्षात येतं.पण हे केवळ शाब्दिक आकलन न रहाता ते पचावं व टिकावं यासाठी कोणत्या प्रकारे अभ्यास करावा ? ..४३

१२. सामान्य माणसाच्या हृदयात नेहमी भगवंत नसतो का ? की फक्त नाम घेतानाच असतो किंवा त्यावेळेला हृदयात येतो ? ..४७

१३. आपल्याला असं दिसतं की, शनीची साडेसाती असताना माणसाला बऱ्याच गोष्टी सहन कराव्या लागतात, नुकसान होतं. विज्ञान तर यांतलं काहीच मानत नाही. मग खरं काय आणि पारमार्थिकदृष्ट्या आपण साडेसाती व ग्रहदशा यांच्याकडं कसं बघावं ? ..४९

१४. सद्‌गुरूंची आपल्यावर कृपादृष्टी आहे, हे आपण कसं ओळखायचं? आपण त्याला पात्र कसं व्हायचं ? ..५४

१५. जीवनात अयशस्वी झालेली किंवा कुणाशी विशेष न पटणारी माणसं बऱ्याच वेळा देवस्थानं किंवा संस्थानं अशा ठिकाणी आढळतात. काही वेळा स्थानं प्रसिद्ध असूनही तिथं गेल्यावर प्रसन्नता, पावित्र्य किंवा भाव न वाढता उलट कमी होऊन, इथं आपण उगीच आलो असं वाटतं. असं का होत असावं ? ..५५

१६. आई-वडिलांच्या मृत्यूनंतर संपत्तीच्या वाटणीत मुलांची-मुलींची भूमिका काय असावी ? ..६१

१७. आजच्या काळानुसार ज्येष्ठ नागरिकांना परदेशी किंवा परप्रांतात मुलांकडं तीन-चार महिने किंवा काही वेळा दीर्घकाळही रहायला जावं लागतं. त्यावेळी याकडं त्यांनी कसं पहावं व साधनेचं रूटीन कसं ठेवावं ? ..६३

१८. मला साधनेचं महत्त्व पटलेलं आहे. माझं वय पंचेचाळीस वर्षं आहे. माझी सांपत्तिक स्थितीही बऱ्यापैकी आहे. आमच्याकडं स्वेच्छा निवृत्ती योजनाही आहे. मी निवृत्ती घ्यावी का किंवा याचा विचार कसा करावा ? ..६५

१९. मी उपासना नियमितपणे करतो. पण पैसा, व्यवसाय, विवाह इत्यादी गोष्टींची मला काळजी लागते. कधीकधी यांतल्या काही गोष्टी उदाहरणार्थ अपेक्षेप्रमाणं काही वेळा व्यवसाय चालूनही काळजी कमी होत नाही. याला काय करावं ? ..६९

२०. धर्म, कट्टरता, कर्मकांडं, विज्ञान यांना मुक्तीच्या प्रवासात किती स्थान आहे ? ..७५

२१. माणसाच्या जीवनात आणि उपासनेत विशिष्ट काल, विशेषतः संधिकाल यांचं महत्त्व काय आहे ? ..७९

२२. आळसामुळं होणारं नुकसान कळतं. तो कमी व्हावा असंही वाटतं. पण तो नाहीसा करायला काही सोपे व्यावहारिक उपाय आहेत काय ? ..९१

२३. अनेकदा निरूपणं, बोधवचनं, विवरणं यांतून काय करायला हवं, हे लक्षात येतं. पण आता वय झाल्यामुळं त्यांतल्या अनेक गोष्टी करणं अवघड झालं आहे. अशा वेळी काय करावं ? ..९५

२४. आपल्याकडं मुलगा असणं, मुलगी असणं किंवा मूलबाळ नसणं, याबाबतीत त्यात्या पालकांच्या पाप-पुण्याचा अर्थ लावला जातो. सामाजिकदृष्ट्याही अनेक प्रतिक्रियांना सामोरं जावं लागतं. याबाबतीत पारमार्थिकदृष्ट्या कोणता विचार करणं योग्य आहे ? ..९६

२५. मला कधीकधी माझ्या गुरूंचं स्वप्नामध्ये दर्शन होतं. त्याचा अर्थ कसा घ्यावा ? ..१०१

२६. मुलांनी परदेशी नोकरी स्वीकारावी काय ? अशावेळी आईवडिलांची भूमिका काय असावी ? अशावेळी मुलांची कर्तव्यं कोणती ? ..१०३

२७. जग संतांशिवाय असणं शक्य नाही, असं महाराज तसंच अनेक संतही म्हणतात . आजही अनेक संतांची माहिती कळून त्यांच्याकडं अनेक साधक, श्रोते लोक जातात पण कधी पदरात काही पडत नाही, अनेकदा फसगत होते मग खरे संत हयात आहेत का ? आणि त्यांना कसं ओळखावं ? ..१०९

२८. नामासारखा परमार्थाच्या साधनेचा कुठला मार्ग स्वीकारला की, नेहमीचं आयुष्य जगताना उदाहरणार्थ शॉपिंग, ट्रीप, वैवाहिक जीवन, मनोरंजन, खाणं, गप्पा, नातेवाईकांची फंक्शन्स - अशा गोष्टी अपरिहार्य असल्या तरी त्या करताना अपराधीपणाची भावना वाटते. हे बरोबर आहे का ? वासना, विकार व अहंकार यांचं या मार्गात स्थान कोणतं ? या साऱ्या बाबतीत परमार्थात काय अपेक्षित असतं ? ..१११

२९. मृत व्यक्तींचे फोटो घरात लावणं अशुभ असतं, असं म्हणतात. ते खरं आहे का ? त्याबाबतीत काय करावं ? ..११६

३०. विवाह करण्यापूर्वी विवाहाकडं बघण्याचा आमचा (मुलाचा-मुलीचा) दृष्टिकोन काय असावा ? ..११७

३१. एका बाजूला 'देव भेटे याचि देही' ही तळमळ आणि ध्येय बाळगणं आणि 'मोक्ष देई का घाली संसारी' अशी कृपेसाठी अनंत काळ वाट पहाण्याची तयारीही ठेवणं, यांत ध्येय असणं आणि अधीरता तर नसणं, यांचा मेळ कसा घालावा ? ..११९

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :** श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. प्रसादकण : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. ठेवा : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. संतबोध : भाग १ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. संतबोध : भाग २ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. संतबोध : भाग ३ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. वृत्त्यंतरप्रकाश : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. नाम : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती) : चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. उपासनेची नोंदवही : विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. उत्तरायण - भाग १ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. शोध : जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. दिशा : वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. उत्तरायण - भाग २ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी : मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. बासरी : जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. उपासना : खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी : श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. कृपापदावली भाग : १ : भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. कृपापदावली भाग : २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. साधनपदावली भाग १ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. सारविस्तार भाग : १ : चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) : डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)

श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

***

उत्तरायण

ही उत्तरं म्हणजे मी अंतिम शब्द किंवा निकाल समजत नाही. अनेकदा उत्तरांना वेळेच्या व सामूहिकतेच्या मर्यादा असतात. त्यामुळं अनेक मुद्यांचा समावेश उत्तरांत होऊ शकला नाही, हे वाचकांनी कृपा करून समजून घ्यावं अशी प्रार्थना आहे. माझी भूमिकाही कुणा मार्गदर्शकाची नाही. शोधकाची आहे. शोधताना, जाताना सापडलं ते समोर ठेवलं आहे. म्हणून याला शंकानिरसन म्हटलं असलं तरी काहींचं पूर्ण निरसन कदाचित होणार नाही, पण उत्तराच्या दिशेनं विचारसूर्याचा प्रवास – उत्तरायण – तरी सुरू व्हावं, एवढी नम्र भूमिका आहे.